पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in
स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक १७ वा । मूल्य : रु. ३० । दिनांक : १६ ते ३० एप्रिल २०२२




# समग्र परिवर्तनाचे महानायक

पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ ।
अंक १७ । मूल्य : रु. ३० । दिनांक : १६ ते ३० एप्रिल २०२२

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्, नाशिक

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट
8888541822

• **जाहिरात विभाग संपर्क**
९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ६००/– रुपये फक्त

• **द पीपल्स पोस्ट बँक अकाउंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय :** काश्मीर फाइल्स : चित्रपट की धर्मास्त्र? – ३ / मानवी हक्कांसाठीचा लढाऊ महानायक – **प्रा. नागार्जुन वाडेकर** – ६ / बाबासाहेबांमुळेच कामगार जीवनात क्रांती – **ज.वि. पवार** – १३ / आंबेडकरोत्तर दलित राजकारण – **बी.व्ही. जोंधळे** – १६ / गोलमेज परिषदेमध्ये डॉ. आंबेडकर – **प्रा. अर्जुन पगारे** – २० / महाडच्या सत्याग्रहातील सुरबा टिपणीसांचे योगदान – **प्रा. रामचंद्र गायकवाड** – २२ / डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि 'भारतीय रुपया'ची समस्या – **डॉ. गौतम कांबळे** – २७ / मेरे मन पंछी रे तेरा भवसागर में डेरा! – **बी.जी. वाघ** – ३० / भारत 'तटस्थ'! का, कशासाठी?– **प्रा. एच.एम. देसरडा** – ३२ / भटके विमुक्तांची सद्यःस्थिती, आव्हाने व उपाययोजना – **ॲड. डॉ. अरुण हौसराव जाधव** – ३५ / **ग्रंथपरिचय** – डॉ. आंबेडकरांचे लोकसंख्या धोरण सदासर्वकाळ महत्त्वाचे – **डॉ. प्रदीप आगलावे** – ३८ / **आज–कालचे प्रश्न** – ४० / **कविता** – **श्रीपाद भालचंद्र जोशी** / – **डी के शेख** / – **देविदास सौदागर** – ४३

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

## संपादकीय

# काश्मीर फाइल्स : चित्रपट की धर्मास्त्र ?

प्रसिद्ध दिग्दर्शक विवेक रंजन अग्निहोत्रीचा 'द काश्मीर फाइल्स' हा हिंदी चित्रपट प्रचंड गाजणार, हे या चित्रपटाच्या निर्मितीवेळीच सिद्ध झाले होते. ते खरेही ठरले. गेल्या काही वर्षांत गाजणारे चित्रपट आणि त्यांच्या विषयावर नजर टाकल्यास एक लक्षात येईल, की इतिहासात राष्ट्रवादी, धर्मवादी ठरलेल्या अनेक विषयांवर वा व्यक्तींवर चित्रपट येत आहेत. लोकांना इतिहास पाहायला आणि त्यात रमायला आवडते. त्यांना तेथेच अधिक काळ राहता येईल यासाठी प्रयत्न करणाऱ्यांमध्ये चित्रपटही महत्त्वाची भूमिका बजावतात. आपली जात, आपला नेता इतिहासात महानायक कसा होता, याचा आनंद घेता येतो. प्रत्येक जाती-धर्मात आता इतिहासामध्ये डोकावण्याची चढाओढ सुरू झाली आहे. 'द काश्मीर फाइल्स' तर पृथ्वीवरील भूदेवाचा विषय. म्हणजे काश्मीर पंडितांचा विषय. हिंदुत्ववाद टिकवणाऱ्यांचा आणि त्याचा पुरस्कार करणाऱ्यांच्या विषय. हिंदुत्वाची लाट सुरू असल्याच्या काळात शहाणा-व्यावसायिक दिग्दर्शक अशा विषयांना हात न घातल्यास नवलं! तसा त्याने तो घातला आणि चित्रपट प्रदर्शित करणाऱ्या चित्रगृहांना जणू एखाद्या प्रचार सभेचे, निषेध सभेचे स्वरूप प्राप्त झाले. स्वतः पंतप्रधान मोदी यांनी चित्रपट पाहून कलाकारांचे कौतुक केले होते. तसे पंतप्रधानांनी करणे योग्य की अयोग्य, असा प्रश्न विचारण्यासारखी सध्याची स्थिती नाही. अनेक ठिकाणी चित्रपट करमुक्त झाला. शंभर हिंदुत्ववादी संघटना जे करू शकणार नाहीत ते 'द काश्मीर फाइल्स'ने करून दाखवले. सर्वच पातळ्यांवर चित्रपट हिट ठरला. विक्रमाचे, प्रसिद्धीचे, कौतुकाचे विक्रम त्याच्या नावावर जमा झाले. कुणी सांगावे उद्या अग्निहोत्रीही पद्मश्री, पद्मभूषण पुरस्काराचे धनी होतील, तर मूळ अग्निहोत्री ब्राह्मणांमधील एका उच्च जातीचे. त्यांचा संबंध पवित्र अग्नीशी म्हणजे यज्ञाशी येतो. पृथ्वी आणि स्वर्ग, माणूस आणि देव यांना जोडणारा, त्यागाचे प्रतीक म्हणून अग्नीत काही तरी टाकणारा हा विधी म्हणजे यज्ञ. तो आपला धर्म, कर्म आणि संस्कृतीशी जोडला गेला आहे.

या लेखाला सुरुवात करण्यापूर्वी कोणत्याही कलाकाराला असलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आदर ठेवला पाहिजे. कलाकाराने म्हणजे निर्माता आणि दिग्दर्शकाने काय करावे आणि काय करू नये, हा त्याचा हक्क आहे. त्याविषयी कोणाचाच हस्तक्षेप असता कामा नये, हे गृहीत धरले आहे. मान्य केले आहे. तरीही कलाकृती जेव्हा प्रेक्षकांसमोर येते तेव्हा तोही कलाकृतीचा मालक बनतो आणि तिची चिकित्सा करण्याचा हक्क त्याला लाभतो. खूप वर्षांपूर्वी 'फायर' नावाचा चित्रपट आला होता. विशिष्ट समाजातील विधवांवर, मुंडण करणाऱ्या विधवांवर, आत्मभान राहणाऱ्या विधवांवर हा चित्रपट बेतला होता. या चित्रपटाला विरोध करण्यासाठी अनेक धार्मिक संघटना पुढे आल्या होत्या, कोर्टात गेल्या होत्या. आज त्या संघटना 'द काश्मीर फाइल्स'चा उदोउदो करताना दिसत आहेत.




'फायर' चित्रपटात धर्माच्या अंगाने होणारी महिलांची पिळवणूक दाखवली होती आणि 'द काश्मीर फाइल्स' (के एफ)मध्ये धर्मातील उच्च घटकाची पिळवणूक दाखवली आहे. एखादी कलाकृती सामान्यांच्या मनावर चौफेर परिणाम करू शकते. या परिणामाचे स्वरूप विधायक की द्वेषमूलक हेही ठरत असते. 'समाज को बदल डालो' हा चित्रपट आला तेव्हा देशभर संपांना प्रोत्साहन मिळाले आणि संतोषी मातेवर म्हणजे आपल्याकडे नसलेल्या देवीवर चित्रपट आला तेव्हा देशभर तिची मंदिरे उभी राहिली. कलेचा परिणाम कसा असतो, हे अनेकदा समाजाने पाहिले आहे. असा एखादा चित्रपट का तयार करावा, हा त्या-त्या निर्मात्याचा प्रश्न असतो; पण ही कलाकृती कशा प्रकारचा संदेश देऊ पाहते, काय परिणाम घडवू शकते, धार्मिक-सामाजिक-राजकीय असा कोणता

परिणाम घडवते हेही आपण पाहतच असतो.

पल्लवी जोशी या मराठी नटीचा असलेला पती अग्निहोत्रीने २००५ पासून ते २०२२ पर्यंत म्हणजे सतरा-अठरा वर्षांत चित्रपटसृष्टीत आपले चांगले स्थान निर्माण केले आहे. शहरी नक्षलवादालाही त्याने हात घातला होता. चॉकलेट (२००९), धन धना धन गोल (२००७), हेट स्टोरी (२०१२), जिद (२०१४), बुद्धा इन ए ट्रॅफिक जॅम (२०१४), जुनूनियत (२०१६), द तास्कंद फाइल्स (२०१९) आणि आता 'द काश्मीर फाइल्स' असा त्याचा प्रवास आहे.

फाइल्स म्हणजे इतिहास आहे. जो दुर्लक्षित झालेला असतो. इतिहासाच्या गुहेत शिरणे जसे आनंददायी असते, तसेच ते जोखमीचेही असते. इतिहास मुका असतो. गुहेत शिरणारा त्याला शब्द देतो. हालचालीसाठी स्वतःची शक्ती देतो. बहुतेक वेळा काही तरी गृहीत धरून, काही तरी वेगळा अर्थ लावायचा, असे समजून एखादा गुहेत प्रवेश करतो. इतिहासाला स्वतःच्या भाषेत बोलायला लावतो. इतिहासाच्या फायलीत घटना-घडामोडींची नोंद असते; पण घटना का घडली, याची चिकित्सा नसते. इतिहासाच्या गुहेत शिरणारा आपल्या सोयीने चिकित्सा करतो. त्याची कलाकृती करतो. काश्मिरी पंडित म्हणजे काश्मिरी ब्राह्मणांवर बनलेल्या या चित्रपटाचे तसेच आहे. विशेष म्हणजे, काश्मिरी पंडितांचा नरसंहार करण्याचा प्रयत्न नव्वदीच्या दशकात मुस्लिमांच्या अतिरेकी संघटनांनी केला, हे सिद्ध करण्यात आले आहे आणि एएनयू (म्हणजे जेएनयू) विद्यापीठातील डाव्या विचारांच्या विद्यार्थ्यांनीही ते शेवटी मान्य केले आहे.

काश्मिरी पंडित म्हणजे काश्मीरमधील विद्वान. ते सर्वच क्षेत्रांत विद्वान आहेत. त्यांना प्रचंड मानसन्मान आहे, कारण ते भूदेव आहेत. ते करमुक्त होते, त्यांचे राजे होते, त्यांचे प्रधान होते. अगदी काश्मीर भारताचा अविभाज्य घटक होईपर्यंत तेथे अनेक हिंदू राजे होऊन गेले; पण लोहारा राजाच्या राजवटीत या पंडितांचा समावेश करण्यात आला. पंडित नाराज होते. पुढे तुर्की, अरब आणि मुस्लिमांच्या हल्ल्यांत सर्व देशच जसा अडचणीत आला आणि गुलाम झाला, तसे हे पंडितही अडचणीत आले. त्यांचा खूप छळ झाला, शस्त्रांच्या जोरावर धर्मांतरे घडली, कत्तली झाल्या, जशा त्या देशात इतरत्रही झाल्या. एक मजेशीर गोष्ट आहे आणि ती म्हणजे, भारतात अडीच-तीन हजार वर्षांपासून मनुस्मृतीच्या नावाने सत्तर-ऐंशी टक्के लोकांचा छळ होत होता. त्यातील अनके अस्पृश्य ठरले होते. नियम मोडणाऱ्यांच्या किंवा हक्क मागणाऱ्यांच्या कत्तली झाल्या होत्या; पण हे इतिहासाच्या कोणत्या फायलीत कोणी लिहून ठेवले नाही. ज्यांना लिहिता वाचता येत होते, ज्यांचा तो हक्क होता, त्यांना तसे लिहिण्याची गरज नव्हती. कारण पिळवणुकीचा हक्क त्यांच्याकडेच होता. महाडमध्ये डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती जाळेपर्यंत मनुच्या फायलीकडे कोणाचे लक्ष नव्हते, तर काश्मीर पंडितांबाबत तसे झाले नव्हते. या समाजात खूप मोठ्या व्यक्ती होऊन गेल्या. देशाचे सत्ताधीश होणाऱ्या या व्यक्ती होत्या. मोतीलाल नेहरू, त्यांचे पुत्र जवाहरलाल नेहरू, त्यांची कन्या इंदिरा गांधी, बीना काक (केंद्रात मंत्री), पी.एन. हकसर, तेज बहाद्दूर सप्रू, तपेस्वर सिन्हा (लष्करप्रमुख), जीवन (हिंदी नट), एम.के. रैना, मणी कौल, अनुपम खेर, कुणाल खेमू, मोहित रैना, मानव कौल, पल्लवी शारदा (सर्व चित्रपट क्षेत्रातील), सुरेश रैना (क्रिकेट), समय रैना (कॉमेडियन) याशिवाय जुनी आणि नवी, अशी अनेक नावे देता येतील. देशात आणि देशाबाहेर, पडद्यावर आणि पडद्याबाहेर त्यांच्या पावलांच्या खुणा दाखवता येतात. अनुपम खेरसारखे अनेक नट हिंदुत्ववादाचा गजर करत संसदेत शिरले. भाजपाने त्यांना आपलेसे केले, तर हा सारा पंडिती समाज अडचणीत आला तो नव्वदीच्या दशकात. ज्या काळात देशात आणि सीमेवर अनेक हालचाली गतिमान झाल्या होत्या. अतिरेक वाढला होता. पंजाबमध्ये खलिस्तानची चळवळ चालू होती. त्यात काश्मिरी पंडिताचा म्हणजे इंदिरा गांधींचा बळी गेला. त्यानंतर काही वर्षांत त्यांच्या मुलाचा म्हणजे राजीव गांधींचा बळी गेला. धर्म समर्थन आणि धर्म सुधारणा अशा दोन्ही चळवळी चालू होत्या. भारतात मुस्लिमांच्या हक्काची चळवळ चालू होती. शाह बानो प्रकरण, बुरखा हटाव प्रकरण, सती प्रथा वगैरे अनेक गोष्टी सांगता येतील. नव्वदीत जम्मू-काश्मीरमध्ये 'आझादी'च्या नावाखाली अतिरेक्यांच्या चळवळी वाढल्या. तिने पंडितांचेच नव्हे, तर अनेक मुस्लिम-हिंदू नेते, कार्यकर्ते, पत्रकार यांचे बळी घेतले. श्रीनगरमध्ये मोजता येणार नाहीत एवढ्या मुस्लिम युवतींवर-महिलांवर बलात्कार झाले. ते अतिरेक्यांनी केलेच, शिवाय पुढे जवानांची नावेही त्यात गुंतवली जाऊ लागली. अनेक मुले निराधार झाली. रोज जाळपोळ होत होती. तेथेही उपासमार होत होती. संशयित अतिरेकी म्हणून हजारो मुस्लिम युवकांना तुरुंगात डांबले होते. कोणावरही आरोपपत्र नव्हते. याच काळात एक प्रसिद्ध संवाद जन्माला आला आणि तो म्हणजे, 'प्रत्येक मुस्लिम अतिरेकी नसतो; पण प्रत्येक अतिरेकी मात्र मुस्लिमच असतो.' मुस्लिमांना लाभलेल्या 'खान'सारख्या आडनावावरून काय होते यावरही 'माय नेम इज खान' हा चित्रपट आला होता. नव्वदीमध्ये जम्मूत असलेल्या पंडितांची म्हणजे त्यांच्यावर झालेल्या अन्याय-अत्याचाराची जशी फाइल्स तयार होत होती, तशी ती श्रीनगरमधील मुस्लिमांची नसेल का, असा प्रश्न अग्निहोत्रीसारख्या प्रतिभावंत दिग्दर्शकाला पडला की नाही आणि पडला असेल, तर त्याचे आकलन त्याने कसे करून घेतले आणि घेतले असेल, तर काश्मीर फाइल्समध्ये गैरहजर कसे राहिले? अर्थात, असा प्रश्न प्रेक्षकाला पडू शकतो, अग्निहोत्रींना नाही. कारण त्यांनी आपल्या कॅमेऱ्याची चौकटच अशी केली, की त्यात फक्त काश्मिरी पंडितच बसतील. अतिरेकी कोणतेही असोत, त्यांना कोणता धर्म नसतो. त्यांचा धर्म म्हणजे हिंसा असते. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ते कोणालाही मारतात. पंजाबमध्ये शीख फुटीरवाद्यांनी आपल्याच धर्मातील किती जणांची हत्या केली याचाही इतिहास ताजा आहे. मुळात कोणत्याही अतिरेक्याला धर्म जोडता कामा नये, जात जोडता कामा नये, त्यासाठी त्यांना नालायकच ठरवले पाहिजे.

नव्वदीच्या दशकात देशात आणि काश्मीरमध्ये जे राजकारण होते ते काही पंडितांच्या विरोधातले नव्हते. काश्मीरच्या मुख्यमंत्र्याने राजीनामा दिला होता आणि त्यांच्या जागी कडवे हिंदुत्ववादी




असलेल्या जग मोहन यांची राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली. ते भाजपाचे निष्ठावान सदस्य होते आणि पुढे त्यांना पद्मविभूषण हा सन्मान लाभला. पाकिस्तानमधील हाफिजाबादमध्ये जन्माला आलेले मनमोहन बरेच दिवस काँग्रेसमध्येही होते. इंदिरा गांधी यांच्या काळात बुलडोझर लावून झोपड्या उद्ध्वस्त करण्याचे काम त्यांनीच केले. १९८४ ते १९८९ या काळात ते जम्मू-काश्मीरचे राज्यपाल झाले. दोन वेळा त्यांना या पदावर राहता आले. त्यावेळी पाकच्या पंतप्रधान असलेल्या बेनझीर भाग मोहन म्हणायच्या, तर अतिरेकी त्यांचे तुकडे-तुकडे करू म्हणायचे. गंमत म्हणजे, हिंदुत्ववाद्यांना त्यांचा राज्यपाल जसा काश्मीरमध्ये होता व त्यांचे दिल्लीत सरकारही होते. व्ही.पी. सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारला भाजपाचा बाहेरून पाठिंबा होता. आपल्या लोकांसाठी हवे ती करण्याची संधी भाजपाला होती. या सर्वांच्या फाइलीही अर्थातच कुठेही उपलब्ध असणार याविषयी कुणालाही शंका नाही. काश्मीरमध्ये राष्ट्रपती राजवट होती. केंद्रात मुस्लिम गृहमंत्री, सरकारला हिंदू भाजपाचा पाठिंबा, राज्यपाल हिंदुत्ववादी, पंतप्रधान मंडलवादी, अशा गोष्टी असताना काश्मीर फायली का भरत होत्या? मंडल आणि कमंडल, कसे एकत्र आले आणि पंडितांसाठी काय घडले, आदी प्रश्नांची उत्तरे मिळाली असती, तर चित्रपट कदाचित वेगळाही घडू शकला असता; पण तसा तो अग्निहोत्रीला घडवायचा नसावा.

सामान्य माणसाच्या मनाचा आणि शरीराचा थरकाप होईल आणि अतिरेक्यांविषयी नव्हे, तर मुस्लिमांविषयी टोकाची द्वेषभावना तयार होईल, असा टोकाचा हिंसाचार चित्रित करण्यात आला आहे. दगडाच्याही डोळ्यात पाणी येईल, अशी भावनात्मक दृश्ये आहेत. कोणत्याही परिस्थितीत पंडित आपल्या देवधर्माला चिकटून राहतो, त्यासाठी त्याग कसा करतो, हेही अनेक दृश्यांत दाखवले आहे. चित्रपट पाहताना लोक घोषणा देतात, रडतात आणि मारून टाका रे दुश्मनाला, असे सहज बोलून जातात. ते जेव्हा भावनेच्या बाहेर पडतील आणि त्यांना विचारले जाईल, की दुश्मन कोण? उत्तर काय येईल. हातांच्या बोटांवर मोजता येतील इतके अतिरेकी, एक मोठा समूह, जो हजारो वर्षे आपल्याच बरोबरीने राहतो आहे. या साऱ्या प्रतिक्रियांना जबाबदार कोण? कला कितीही सुंदर असली तरी तिला नैतिक मूल्यांचे, सामाजिक मूल्यांचे एक चारित्र्य असतेच. ते सैल झाले, की आगीत तेल ओतल्यासारखे होते. शाळेत शिक्षक मुलांना शिकवतो की अधिकारी आले, की त्यांना आम्हाला बाकी काही नको मशीद पाहिजे, असे सांगायचे. आपली देवी सरस्वती आहे, असे पंडित सांगतात, तर तिकडे अल्लाहला शरण जाण्यास सांगतात. हा जो तिढा आहे, तो कोण तयार करते आणि त्याच्या फायली कोण, कुठे आणि का लपवून ठेवतो? चार दिवसांपूर्वीच गुजरात आणि कर्नाटक सरकारने पाठ्यपुस्तकात भगवद्गीता सक्तीने समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. मुस्लिम विद्यार्थी काय करतील? पाठ्यपुस्तकांत कोणत्याही देवादिकांची गर्दी असायलाच हवी का, असे विचारणारे आवाज असतात; पण ते क्षीण असतात. अग्निहोत्री त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. शेवटी 'द काश्मीर फाइल्स' हा चित्रपट आहे, की एक नवे धर्मास्त्र आहे, जे कलेच्या आडून वापरले गेले आहे. आपल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याशी इमान राखूनही याचा विचार करता येतो. सामान्य माणसाला खूप लवकर हळवे बनवता येते. चित्रपटातील बच्चनची गरीब आई, शिलाई करताना बोट फाडून घेणारी आई कितीतरी वर्षे प्रेक्षकांना रडवत होती, प्रेक्षकही रडत होते, रुमाल भिजवत होते; पण आईचे असे दु:खात रूपांतर व्हायला जबाबदार कोण, असा प्रश्न कधी प्रेक्षकांच्या मनात तयार होत नाही. तो तसा तयार करण्याची जबाबदारी तिच्यावर आहे. फायलीत काय सापडले, हे जसे योग्य आहे, तसे ते का घडवले गेले आणि त्याला फक्त अतिरेकीच जबाबदार आहेत, की तत्कालीन राजकारण, व्यवस्था, सामाजिक-धार्मिक द्वेषही जबाबदार आहे, आदी सारे प्रश्न चित्रपटात मुके होतात. खरे तर, ज्याला आपण पृथ्वीवरचा स्वर्ग म्हणतो ते काश्मीर एक भळभळती जखम बनले आहे. येथे असलेल्या बुद्धिस्ट, हिंदू आणि मुस्लिमांच्या जखमाही कोरड्या होण्याऐवजी ओल्या होत आहेत. या जखमांची सुखवणूक आरोग्यशास्त्र वापरल्याने होईल, धर्मास्त्र वापरून नव्हे किंवा सिनेमा काढून नव्हे.

•••





# मानवी हक्कांसाठीचा लढाऊ महानायक

**दलितांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी विविध संघटना, राजकीय पक्ष स्थापन केले. दलितांच्या शिक्षण आणि सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन केली. स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन इत्यादी. दलितांना कायदेमंडळात उचित प्रतिनिधित्व मिळावे, म्हणून संघर्ष केला. १९१९ साली साउथ ब्युरो कमिशनपुढे त्यांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघ आणि आरक्षणाची मागणी केली.**



**प्रा. नागार्जुन वाडेकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एकमेव क्रांतिकारी महानायक ज्यांचे सर्वात जास्त पुतळे असतील, त्यांच्या नावाने सर्वात जास्त रस्ते सजले असतील, सर्वात जास्त विद्यापीठं असतील, हॉस्पिटल्स, सभागृहे, मैदाने असतील, सर्वात जास्त पुस्तके असतील, कविता असतील, गीतं असतील, नाटकं, चित्रपट असतील याहीपेक्षा कित्तेक पटीने महत्त्वाचे म्हणजे, सर्वात जास्त हृदयांना प्रेरित करणारे बाबासाहेब एकमेव असतील.. त्यांना इतकं महान कशाकशाने केले असेल ते पाहण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी मानवतेचा हा अथांग महासागर नजरेच्या टप्प्यात कधीच मावणार नाही.. मानवता, प्रत्येक स्त्री-पुरुषाचे मुलभूत हक्क, जन्मसिद्ध हक्क जपणे, त्यांचे संवर्धन करणे, त्यासाठी अखेरच्या श्वासापर्यंतचा लढण्याचा त्यांचा निग्रह, त्यांनी दर्शविलेल्या या मार्गावरून चालणारे करोडो बोलके जीव भीम जयंती साजरी करतात. म्हणजे, आपल्या निसर्गदत्त मानवी हक्कांसाठीच्या संघर्षाचा उत्सव साजरा करत असतात..

**अस्पृश्यतेचे दाहक अनुभव अर्थात, कायमचे दलितत्व**

बाबासाहेबांनी अस्पृश्यतेचे अनुभव आपल्या 'वेटिंग फॉर अ व्हिसा' या पुस्तकात लिहिले आहेत. शाळेत बसण्यासाठी रोज पोते सोबत घेऊन जावे लागत होते. जेवणानंतर पाणी स्वतः घेऊन पिता येत नव्हते. शिपायाकडून पाणी मिळे पण तो सुट्टीवर असेल, तर विनापाणी राहावे लागे. त्यांच्या मनावर कोरलेल्या पाच घटना या पुस्तकात लिहिल्या आहेत. पहिली घटना १९०९ सालातील साताऱ्यातील कोरेगाव येथे वडिलांच्या कामाच्या ठिकाणी बैलगाडीने जाताना पाण्याविना अस्पृश्यतेमुळे आलेला अनुभव. दुसरी घटना म्हणजे, गुजरातमधील बडोद्यात नोकरीकरिता गेल्यानंतरची आहे. बाबासाहेब अनेक वर्षे विदेशात राहिल्याने 'डीकास्ट' झाले होते; पण बडोद्यात त्यांना राहण्यासाठी खाजगी किंवा सरकारीसुद्धा घर मिळाले नाही. पारशी हॉटेलमध्ये राहत असताना अस्पृश्यतेमुळे दहा दिवसांतच अपमानित होऊन बाहेर पडावे लागले. तिथे त्यांना लक्षात आले, की हिंदू समाजासाठी अस्पृश्य असणारा पारशी समाजासाठीसुद्धा अस्पृश्यच असतो. विदेशात असतानाच्या हिंदू मित्रांच्या घरी काही दिवसांसाठीसुद्धा राहायला मिळाले नाही. कार्यालयात शिपाई फाईल दुरून फेकत, तिथे स्वतः घेऊन पाणी पिता येत नसत. तिसरी घटना १९२९ सालातील जळगावमधील आहे. दलित समितीच्या पाहणीच्या निमित्ताने गेलेले असताना चाळीसगावमधील दलितांनी



त्यांच्या वस्तीत येण्याचा आग्रह केला. पण टांगेवाला दलित वस्तीत येण्यास तयार नसल्याने एका दलिताने टांगा भाड्याने घेऊन चालवायला घेतला; पण त्याला तो नीट चालवता येत नसल्याने टांग्याला अपघात होऊन बाबासाहेब जखमी झाले. कित्येक दिवस त्यांना चालता आले नाही. एक हिंदू टांगेवालासुद्धा स्वतः ला अस्पृश्य सरकारी वकिलापेक्षा उच्च समजतो, हे तिथे त्यांच्या लक्षात आले. चौथी घटना १९३४ साली औरंगाबादजवळील दौलताबाद किल्ल्यामधील पाण्याला दुषित करण्याबाबतची आहे. प्रवास करून आल्याने त्यांनी सहकाऱ्यांसोबत जवळच्या हौदातील पाण्याने हातपाय धुतले. रमजानच्या महिन्यात रोजा ठेवणाऱ्या मुसलमानांनी त्यांना अस्पृश्य असून पाणी दुषित केल्याबद्दल हटकले. याठिकाणी त्यांना समजले, की ज्याप्रमाणे एक अस्पृश्य हिंदू पारशी समाजासाठीसुद्धा अस्पृश्यच असतो त्याप्रमाणेच एक अस्पृश्य हिंदू, मुसलमानांसाठीसुद्धा अस्पर्शच असतो. पाचवी घटना १९२९ साल-ातील काठीयावाड मधील एका हिंदू अस्पृश्य शिक्षकाच्या गरोदर पत्नीच्या प्रसूतीनंतर आजारपणात डॉक्टरांनी उपचार करण्यास नकार दिल्याने मृत्यू झाल्याबाबतची आहे. या घटनेने त्यांच्या लक्षात आले, की आपल्या पेशाचे नियमसुद्धा डॉक्टरने पाळले नाहीत. म्हणजे हिंदू कोणा अस्पृश्याला हात लावण्यापेक्षा अमानवीय होणे पसंत करू शकतो. अस्पृश्यतेचे हे दाहक अनुभव बाबासाहेबांच्या मनावर कोरले गेले. त्यातून त्यांच्या सामाजिक, राजकीय लढ्याला या घटनांचे परिमाण लाभलेले आहेत, असे म्हणता येईल.

**बाबासाहेबांचा समकालीन जागतिक भवताल**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक पटलावर येताना जागतिक पहिले महायुद्ध संपलेले होते. भारतात गांधी युगाचा प्रारंभ झालेला होता. स्वातंत्र्यलढा मध्यावर आला होता. १९२० च्या माणगाव परिषदेत राजर्षीशाहू महाराज बाबासाहेबांना, दलितांना पुढारी मिळाला म्हणून जाहीर करतात आणि बाबासाहेबांच्या सामाजिक राजकीय कामाला सुरुवात होते.

पहिल्या महायुद्धानंतर पुन्हा युद्ध नको म्हणून 'लीग ऑफ नेशन्स' नावाची संस्था स्थापन झाली. निःशस्त्रीकरण, सामूहिक सुरक्षेद्वारे युद्ध रोखले जावे, वाटाघाटी आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून देशांमधील विवादांचे निराकरण केले जावे, तसेच जागतिक कल्याणाला चालना मिळावी अशा उदात्त हेतूने निर्माण झालेली असली तरी 'लीग ऑफ नेशन्स' अपयशी ठरली आणि दुसरे महायुद्ध झाले, हे आपल्याला माहीतच आहे.

युरोपात पहिल्या महायुद्धाच्या काळात पुरुषांच्या जागी काम केल्याने कामगार महिलांचे प्रमाण २५% पर्यंत वाढलेले होते. १९२० च्या दरम्यान स्त्रीवादी चळवळीची दुसरी लाट सुरू होती. त्यांच्या प्रयत्नातून महिलांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. इंग्लंडमध्ये १९१८, नेदरलंडमध्ये १९१९ तर अमेरिकेत १९२० मध्ये महिलांना मतदानाचा हक्क मिळाला. काळ्या लोकांना तर १९६५ मध्ये मतद-ानाचा हक्क मिळाला.

यादरम्यान युरोपात शिक्षण आणि संशोधनाचे युग सुरू होते. १९२० च्या दशकात तंत्रज्ञानाचा विस्तार होताना फोर्डच्या कारची निर्मिती झालेली होती. दळणवळण वाढले होते. इलेक्ट्रिसिटीच्या प्रसारातून औद्योगिक उत्पादन वाढलेले होते. रेडीओ, टेलीफोन, मॅग्नेटीक टेप, इत्यादींच्या शोधातून जग अधिक जवळ आले होते आणि पेनिसिलिनच्या शोधाने मनुष्याचे जीवनमान वाढलेले होते. लोकांचे उत्पन्न वाढले होते आणि अमेरिका महासत्ता झालेली होती.

या दरम्यान अनेक छोटी-मोठी युद्धे सुरूच होती. टर्कीचे स्वातंत्र्ययुद्ध, सौदी अरेबियाचे एकत्रीकरण, आयर्लंडचे स्वातंत्र्ययुद्ध, पोलंड-सोव्हियत युद्ध, निकारागुआ, हैती, डोमिनिक रिपब्लिक यांच्यावर अमेरिकेचा कब्जा इत्यादी अनेक देशांतील अंतर्गत वाद सुरूच होते. समाजवाद आणि नाझीवादाचा उदय झाला होता. तरीही आयर्लंड आणि इजिप्त ब्रिटिश साम्राज्यापासून स्वतंत्र झाले होते.

अशांतता जितकी होती तितके शांतता आणि निशस्त्रीकारणाचे करार होत होते, इत्यादी राजकीय घडामोडी घडत होत्या.

बाबासाहेबांच्या समकालीन प्रगत राष्ट्रांतील विज्ञान व तंत्रज्ञान, साहित्य, कला क्षेत्रातील काही नावं पाहू - अल्बर्ट आईनस्टाईन, सिग्मंडफ्रोईड, अलेग्झान्डर फ्लेमिंग, बेर्टोल्टब्रेख्त, लॅग्नस्स्टन ह्यूस, चार्ली चाप्लीन, ग्रिफिथ, आल्फ्रेड हिचकॉक, पाब्लो पिकासो, वॉल्टर ग्रोपिअस इत्यादी - नुसती नावे पाहिली तरी अंदाज येईल, की जग काय प्रगती करत होते (आणि त्यावेळी आपण चवदार तळ्यात शेण-गोमुत्र ओतून पाण्याचा विटाळ घालवत होतो!)

कोलंबिया विद्यापीठात एम.ए.चे शिक्षण घेत असताना बाबासाहेबांनी पूर्ण केलेले अभ्यासक्रम - अर्थशास्त्राचे २९ अभ्यासक्रम, इतिहासाचे ११, समाजशास्त्राचे ०६, तत्त्वज्ञानाचे ०५, मानववंशशास्त्राचे ०४, राज्यशास्त्राचे ०३ आणि फ्रेंच आणि जर्मनचे प्रत्येकी ०१. त्यांना ०९ भाषा येत होत्या आणि कोलंबिया विद्यापीठाने त्यांना जगात पहिल्या क्रमांकाचे बुद्धिमान विद्यार्थी म्हणून गौरविले आहे.

बाबासाहेब युरोपातील एकूण सामाजिक, राजकीय, आर्थिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक प्रगती जवळून पाहत, अनुभवत होते. यातील कोणकोणत्या बाबींचा बाबासाहेबांवर प्रभाव पडला असेल आणि त्यांना जागतिक कीर्तीचा महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणून घडवले असेल, या दृष्टीने फार अभ्यास झाल्याचे दिसून येत नाही. म्हणून बाबासाहेबांना या जागतिक पटलावर पाहून समजून घ्यायला हवं, असं वाटतं.

**मानवी हक्क**

दुसऱ्या जागतिक महायुद्धात अमेरीकेच्या जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी शहरावरील अणुबॉम्ब हल्ल्याच्या अनुभवाने कोणत्याही राष्ट्राला यापुढे युद्ध नको होते. यातून आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखली जावी, जगातील लोकांच्या कल्याणाला चालना मिळावी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढावे याकरिता १९४५ साली संयुक्त राष्ट्राची निर्मिती झाली.

संयुक्त राष्ट्राने १० डिसेंबर १९४८ रोजी ‘मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा प्रसारीत केला. तो दिवस मानवी हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. मानवी हक्क म्हणजे काय? आपण मानव म्हणून जन्म घेताच हक्क निसर्गतः प्राप्त होणारे हक्क म्हणजे मानवी हक्क. कोणत्याही राष्ट्रांतील व्यक्तीच्या मानवी हक्कांची सर्वत्र जपणूक झाली पाहिजे, हा या जाहीरनाम्याचा हेतू आहे. संयुक्त राष्ट्राच्या सर्व सदस्यांनी यावर स्वाक्षऱ्या करून तो मान्य केला आहे. या जाहीरनाम्यात एकूण ३० कलमे आहेत. यातील पहिल्या कलमानुसार, समस्त मानवजात जन्मतः स्वतंत्र असते, तसेच हक्क आणि प्रतिष्ठेच्या बाबतीत समान असते. त्यांना शहाणपण आणि सद्सद्विवेकबुद्धी प्राप्त असते. त्यातून त्यांनी परस्परांशी बंधुभावाने वागायला हवे. दुसऱ्या कलमानुसार या हक्क आणि स्वातंत्र्याच्याबाबतीत वंश, वर्ण, भाषा धर्म, राजकीय किंवा इतर धारणा, राष्ट्रीय किंवा सामाजिक मूळ, संपत्ती, जन्म किंवा इतर स्तर अशांसारख्या कोणत्याही प्रकारचे भेदभाव करता कामा नये.

प्रत्येकास जीविताचा हक्क आहे. कोणालाही गुलामगिरीत



## आर्थिक हक्कांसाठी लढा

- बाबासाहेबांचा प्रमुख अभ्यास विषय अर्थशास्त्र असल्याने त्यांच्या प्रत्येक कृतीमागे एक अर्थशास्त्रीय विचार दिसतो. त्यांनी राज्यसमाजवाद म्हणजेच कल्याणकारी राज्याची संकल्पना मांडली आहे. यात उद्योगांचे नियंत्रण राज्याकडे असावे, तसेच शेती आणि जमिनीचे राष्ट्रीयीकरण करून भूमिहीनांना शेतजमीन द्यावी, अशी त्यांची भूमिका होती. कल्याणकारी राज्य संपुष्टात येऊन खाजगी राज्य निर्माण होईल तेव्हा दलितांना त्यांच्या उद्धाराचे कोणतेही साधन राहणार नाही, या मताचे ते होते.
- १९३९ साली कोकणामधील खोती पद्धतीच्या शेती विरोधात कुळांसाठी आंदोलन केले. २५ हजार शेतकऱ्यांसह चरीचा शेतकरी संप घडवून आणला. सावकारीमुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत म्हणून कर्जमाफीची मागणी केली. जवळपास ८० वर्षांनंतर आता कर्जमुक्तीची मागणी पूर्ण होताना दिसते. खोतीशाही नष्ट व्हावी, असे बिल मुंबई विधिमंडळात आणले. १९४० ला कुळकायदा लागू होऊन खोतीपद्धत नष्ट व्हायला १९५० साल उजाडले. सरकारने कर आकारणी करताना उत्पन्नाच्या अंदाजावरून कर आकारणी करावी, अशी मागणी केली. शेतीतील उत्पादकता कमी झाल्याने शेतकरी आत्महत्या करतो म्हणून करत सूट द्यावी आणि महसूल वसुली लवचिक असावी, अशी मागणी केली. हा शेतकऱ्यांच्या मानवी हक्कांसाठीचाच लढा होता. कामगार मंत्री असताना त्यांनी कामगारांचे कामाचे तास १४ तासांवरून ०८ तासांवर आणले. गरोदर महिलांना धोकादायक खाणींमध्ये काम करण्यास प्रतिबंध करून त्यांना पगारी सुट्टी देण्याचा नियम केला.






ठेवता येणार नाही, कोणाचाही छळ होणार नाही, जगभरात कोठेही जा तुमच्या मानवी हक्कांचे रक्षण केले जाईल, कायद्यासमोर आपण सर्व समान आहोत, कायद्याने सर्वांना समान वागणूक दिली जाईल, कोणालाही मनमानी पद्धतीने अटक, स्थानबद्ध किंवा हद्दपार केले जाणार नाही, प्रत्येकाला आपल्या हक्कांच्या रक्षणासाठी न्याय्य आणि जाहीर सुनावणी मागण्याचा हक्क आहे, दोष सिद्ध होईपर्यंत निरपराध गृहीत धरण्याचा हक्क, कायद्याची तरतूद असेल तरच आणि तितकीच शिक्षा करता येऊ शकेल, खाजगीपणा जपण्याचा हक्क, संचाराचा हक्क, आश्रय मिळण्याचा हक्क, राष्ट्रीयत्व मिळण्याचा हक्क, कुटुंब रचण्याचा आणि त्यास संरक्षण मिळण्याचा हक्क, संपत्तीची मालकी धारण करण्याचा हक्क, धर्मस्वातंत्र्याचा हक्क, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य, लोकशाही मार्गाने शासनात भाग घेण्याचा हक्क, सामाजिक सुरक्षेचा हक्क, काम करण्याचा हक्क, समान कामासाठी समान वेतन मिळण्याचा हक्क, संघटना बांधण्याचा हक्क, विश्रांती आणि वेतनासह ठराविक सुट्ट्या मिळण्याचा हक्क, कुटुंबास आरोग्य, अन्न, वस्त्र, निवारा, बेरोजगारीत सामाजिक सुरक्षितता-मातृत्व आणि बाल्यावस्थेत काळजी आणि मदत मिळण्याचा हक्क, मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळण्याचा हक्क-व्यक्तिमत्वाचा विकास करणारे शिक्षण हवे-आपल्या मुलाला कोणते शिक्षण द्यावे, हे ठरविण्याचा हक्क पालकांचा, वैज्ञानिक प्रगतीच्या लाभाचा हक्क, स्वामित्वहक्क मिळण्याचा हक्क, प्रत्येकाला आपल्या स्वातंत्र्य आणि हक्कांचा उपभोग घेता येईल, अशी व्यवस्था असण्याचा हक्क, आपल्या हक्कांसोबत इतरांच्या हक्कांचे संरक्षण करणे हे जबाबदार नागरिकाचे कर्तव्य आहे. तुमच्या मानवी हक्कांना कोणीही हिरावून घेणार नाही. मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यात नमूद या ३० मानवी हक्कांचे संरक्षण करण्याचे भारतासह इतर १९२ सदस्य राष्ट्रांद्वारे मान्य करण्यात आले आहे. यानुसार सामान्य कोणालाही राष्ट्रीय यंत्रणामधून न्याय मिळाला नाही, तर अगदी संयुक्त राष्ट्राकडे दाद मागता येऊ शकते.

**भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क**

बाबासाहेबांच्या अगदी सुरुवातीच्या माणगाव परिषदेपासून प्रत्येक सामाजिक, राजकीय लढ्यात मानवी हक्कांची चर्चा दिसून येते. पुढे भारताची राज्यघटना लिहितानासुद्धा १९४८ साली आलेल्या मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्याचे प्रतिबिंब दिसून येते. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेतील शब्दरचना पाहिली तरी आपल्या लक्षात येईल, की भविष्यातील भारताची रचना सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य म्हणून करण्याचा त्यांचा संकल्प आहे. समता, स्वातंत्र्य आणि न्यायावर आधारित भारत घडवायचा आहे आणि अशाप्रकारे भारत एकात्म आणि अखंड राखायचा आहे. हिंदू धर्मवाद लोकशाही विरोधात आहे. राज्यघटना धर्मवादाच्या विरोधात आहे.

आपल्या राज्यघटनेतील मूलभूत हक्कांचे जाळे पहिले तर यातून हे साध्य होणार आहे. राज्यघटनेतील कलम १४ आणि जाहीरनाम्यातील कलम १७ नुसार सर्वजण कायद्यासमोर समान आहेत आणि कोणत्याही भेदभावाशिवाय सर्वांना कायद्याचे समान संरक्षण मिळण्याचा हक्क आहे. कलम १५ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान यांच्या कारणावरून भेदभाव करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. कलम १६ नुसार सार्वजनिक सेवांमध्ये संधीची



समानता असेल. कलम १७ नुसार अस्पृश्यतेचे निर्मुलन करण्यात आले आहे. कलम १९ नुसार भाषण, विचार आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे. यात शांततापूर्ण एकत्र येण्याचा हक्क, संघटना बांधण्याचा हक्क, संचाराचा हक्क, भारताच्या कोणत्याही भागात राहण्याचा आणि स्थायिक होण्याचा हक्क, व्यापार आणि उद्योगाचा हक्क इत्यादींचा अंतर्भाव होतो. कलम २० नुसार गुन्ह्यासाठी निवाड्याच्या संदर्भात संरक्षण देण्यात आले आहे - यात पूर्वलक्षी किंवा कार्योत्तर कायदे करता येणार नाहीत. एका गुन्ह्यासाठी एकापेक्षा जास्तवेळा संकटात टाकता येणार नाही. स्वतःच स्वतःला गुन्ह्यात अडकवण्याविरुद्ध हक्क इत्यादींचा समावेश आहे. कलम २१ नुसार जीविताचा आणि स्वातंत्र्याचा हक्क - जो सर्वोच्च मानण्यात आला आहे. यात अर्थपूर्ण जीवन जगण्याचा तसेच खाजगीपणाच्या हक्काचा अंतर्भाव आहे. कलम २२ नुसार मनमानी पद्धतीने अटक आणि कैदेविरुद्ध हक्क दिलेला आहे. कलम २३ आणि २४ नुसार शोषणाविरुद्ध हक्क. कलम २५, २६, २७, व २८ नुसार धर्मस्वातंत्र्याचा हक्क आहे. कलम २९ व ३० नुसार सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क दिलेले आहेत आणि कलम ३२ नुसार वरील कोणत्याही हक्कांचा भंग झाला तर घटनात्मक उपायांचा हक्क म्हणजे, न्यायालयात दाद मागण्याचा हक्क दिलेला आहे - यात बंदी प्रत्यक्षीकरण रिट (आठवा जयभीम सिनेमा), परमादेश, प्रतिबंध, उत्प्रेषण, अधिकार पृच्छा या पाच रिटचा समावेश होतो. बाबासाहेबांनी या अधिकारास सर्वोच्च हक्क मानलेले आहे. यामुळे राज्यघटनेत मानवी हक्कांची संरक्षक म्हणून न्यायपालिकेचे अस्तित्व स्वतंत्र ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे न्यायालयीन पुर्नविलोकन आणि जनहित याचिकांना स्थान मिळालेले आहे. अशाप्रकारे मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा आणि भारतीय राज्यघटना यांच्यात अनन्यसाधारण संबंध दिसून येतो.

**सामाजिक समतेचा संगर**

महात्मा फुले यांनी पुरोहीतशाही आणि सावकार हे शेतकरी कष्टकऱ्यांचे दोन प्रमुख शत्रू म्हटले आणि एकप्रकारे बाबासाहेबांना त्यांच्या कामाची दिशा दिली. बाबासाहेबांनीसुद्धा ब्राह्मणवाद आणि भांडवलवाद हे शूद्रांचे शत्रू आहेत, असे म्हटले. यामुळे शेतकरी, कष्टकरी, कामगार, बहुजन, दलित, आदिवासी यांना मानसिक गुलामगिरीत ढकलले गेले.

दलित, शोषित समाजाच्या दुखःला वाचा फोडण्यासाठी त्यांनी विविध वर्तमानपत्रे सुरू केली - मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, समता, प्रबुद्ध भारत. त्यात दलित, शेतकरी, कामगार आणि महिलांच्या प्रश्नांवर चर्चा घडवून आणली. कोकणातील खोतांद्वारे कुळांवर होणाऱ्या जुलूमाच्या बातम्या आपल्या 'जनता' साप्ताहिकात छापल्या. घृणेच्या मुळाशी धार्मिक मान्यता असलेला जातीवाद आहे. म्हणून अस्पृश्यतेचे निर्मुलन करून समता, स्वातंत्र्य आणि न्यायावर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी त्यांनी अखंड संघर्ष केला.

दलित माणसाला माणसाप्रमाणे समतेची वागणूक मिळावी, आत्मसन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार मिळावा, गुरेढोरे पाणी पिऊ शकतात तिथेही दलित माणूस पाणी पिऊ शकत नाही, त्याला निसर्गतः प्राप्त होणारे पाणी पिण्याचा हक्क मिळावा, म्हणून चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा सत्याग्रह केला. मनुस्मृती मानवी हक्कांच्या विरोधात आहे, म्हणून तिचे दहन केले. इतरांप्रमाणे मंदिरात प्रवेश मिळावा, म्हणून नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेशासाठी सत्याग्रह केला; पण हिंदू समाज आपली दलितांप्रती भेदभावाची मानसिकता बदलत नाही, म्हणून माणसाला अमानुषपणे वागविणारा हिंदू धर्म

सोडण्याची घोषणा केली आणि पुढे बौद्ध धम्माचा स्वीकार केला.

**राजकीय हक्कांसाठी संघर्ष**

दलितांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी विविध संघटना, राजकीय पक्ष स्थापन केले. दलितांच्या शिक्षण आणि सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन केली. स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन इत्यादी. दलितांना कायदेमंडळात उचित प्रतिनिधित्व मिळावे, म्हणून संघर्ष केला. १९१९ साली साउथ ब्युरो कमिशनपुढे त्यांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघ आणि आर-क्षणाची मागणी केली.


सायमन कमिशनपुढे दलितांना कायदेमंडळात राखीव जागा मिळाव्यात, देशातील सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार मिळावा, दलितांच्या शिक्षणासाठी वसतिगृहे काढावीत आणि शिष्यवृत्ती द्यावी, दलित प्रतिनिधींना राजकारणात स्थान मिळावे इत्यादी मागण्या केल्या. गोलमेज परिषदेत दलितांच्या राजकीय हक्कांचा जाहीरनामा दिला. दलितांच्या प्रगतीसाठी स्वतंत्र खाते निर्माण करावे म्हणून मागणी केली. कम्युनल अवार्डमधून मिळालेल्या स्वतंत्र मतदारसंघाच्या विरोधात महात्मा गांधीच्या आमरण उपोषणाच्या संघर्षातून त्यांनी पुणे करार स्वीकारला आणि त्यातून आरक्षणाची तडजोड स्वीकारली.

**महिला सक्षमीकरण आणि महिला मुक्ती**

महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्राबाई फुले यांनी महिलांना शिक्षण देण्यास सुरुवात केली. राजर्षि शाहू महाराजांनी दलितांच्या उत्थानासाठी कायद्याचे पाठबळ देऊन एक मार्ग दाखवला आणि बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांच्या भोव-ती कल्याणकारी राज्याचे संरक्षक कवच निर्माण केले. ब्राह्मणवादी पितृसत्ताक व्यवस्थेने पारंपारिक, धार्मिक आणि सांस्कृतिक मान्यतेच्या माध्यमातून महिलांना शिक्षणापासून दूर केले आणि पुरुषांच्या अंकित ठेवले. मनुस्मृतीच्या मते, स्त्री स्वतंत्र असण्याच्या लायक नसते. महिलांच्या प्रती अनेक प्रकारच्या भेदभावाचा स्त्र-ोत मनुस्मृती आहे. म्हणून बाबासाहेबांनी २७ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन करून महिलांना सर्व प्रकारच्या गुलामीतून मुक्त केले.

स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे, अशी त्यांची धारणा होती. १९१३ साली न्यूयॉर्कमधील भाषणात बाबासाहेब म्हणतात, पालकांनी मुलांच्या बरोबरीने मुलींनासुद्धा शिक्षण दिले तरच समाजाची प्रगती वेगाने होऊ शकते. १९२७ मधील महिला परिषदेत स्त्रियांनी शिक्षित होण्याचे महत्व सांगतात.


एखाद्या समाजाच्या स्त्रियांच्या प्रगतीवरून त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते म्हणताना, अखिल भारतीय स्त्रियांना सर्व प्रकारचे हक्क देण्यासाठी स्वतंत्र भारताचे कायदामंत्री असताना त्यांनी हिंदू कोड बिल मांडले. त्याआधी १९३८ मध्ये मुंबई विधानमंडळात महिलांच्या प्रश्नांवर विशेषतः प्रसुतीदरम्यान महिलांच्या आरोग्यासंबंधी प्रश्नांवर चर्चा केली. १९४२ मध्ये मातृत्व लाभ बिल मांडले. १९४८ मध्ये मातृत्व रजा मंजूर करण्यात आली. अमेरिकेतील महिलांना कोर्टाच्या हस्तक्षेपामुळे १९८७ साली मातृत्व



रजा मिळू शकली; पण पगारी रजा मिळाली १९९३ नंतरच.

हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून महिलांना वडिलांच्या संपत्तीत बरोबरीचा वाटा मिळण्याचा हक्क, स्वतःच्या मिळकतीवर पूर्ण हक्क, द्विभार्या प्रतिबंध करण्याचा हक्क, घटस्फोट घेण्याचा हक्क, पोटगी मिळण्याचा हक्क, दत्तक घेण्याचा हक्क इत्यादी हक्क मिळणार होते. मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यातील कलम १६ नु-सार प्रत्येक स्त्री-पुरुषाला आपल्या मर्जीनुसार जोडीदार निवडून कुटुंब रचण्याचा अधिकार आहे. हिंदू कोड बिल नामंजूर झाल्याने बाबासाहेबांनी राजीनामा दिल्यानंतरच्या काळात हेच कायदे तुकड्या तुकड्याने मंजूर करण्यात आले आहेत. बाबासाहेबांना खात्री होती, की जेव्हा महिलांना शिक्षण आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळेल तसेच परिवार आणि समाजात पुरुषासम समान दर्जा मिळेल, तेव्हाच त्यांना खरे स्वातंत्र्य मिळू शकेल. राजकीय शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात स्त्रियांच्या लोकसंख्येनुसार प्रतिनिधित्व मिळावे या विचारातूनच आज महिलांना ३३% लागू होऊ शकले, असे म्हणता येईल.

भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांच्या (१४-१६) माध्यमातून लिंगभेद कायद्याने नष्ट केला. भारतीय महिलांना मतद-ानाचा हक्क भारतीय राज्यघटना लागू होताच १९५० सालीच मिळाला. स्वित्झर्लंडमधील महिलांना मतदानाचा हक्क मिळाला १९७१ साली.



## बौद्ध धम्माचा स्वीकार

बाबासाहेबांच्या विचारसुत्राचे केंद्र केवळ सामाजिक न्याय इतकेच नसून त्यांच्या निर्णय आणि कृतीत मानवी हक्कांची छाप आहे. भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून दलित, आदिवासी, शेतकरी, कष्टकरी, कामगार, मजूर, महिला अशा सर्व हरलेल्या जनांना हक्क आणि अधिकाराचे कवच देत असताना त्यांना पूर्ण कल्पना होती, की या कमजोर घटकांना कितीही संरक्षण दिले, तरी त्यांच्या मानवी हक्कांचे रक्षण पूर्णतः समाजातील सबल घटकांच्या मर्जीवरच अवलंबून असणार आहे. तसेच राज्यघटना हतबल होऊन कमकुवत घटकांचा उदरनिर्वाहाचा, आत्मसन्मानाचा आणि जीविताचा प्रश्न निर्माण झाला तरी दुर्बलांनी कायदा हातात घेऊन काहीही अनुचित वर्तन करणे शांततामय सहजीवनासाठी योग्य होणार नाही. त्यामुळे दुसऱ्याचे हक्क अबाधित राखण्यासाठी बलवान समाजातील व्यक्तीच्या मानसिकतेत आणि वर्तनात मूलगामी बदल घडून आला पाहिजे. असा क्रांतिकारी बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी करुणा आणि अहिंसावादी, कार्यकारणभाव सांगणारा, विज्ञानवादी बौद्ध धम्माचा मार्ग सर्वांना दिला. माणसासाठी धर्म आहे, धर्मासाठी माणूस नाही, माणूस व नीति धर्माचा केंद्रबिंदू असावा. धर्माने माणसाचा विकास होणे अपेक्षित आहे, त्यात न्याय अनुस्यूत आहे, असे ते म्हणतात. 'मी भारत बौद्धमय करेन' या त्यांच्या प्रतिज्ञेचा अर्थ समाजाला नैतिकतेच्या वाटेवर नेणारा धर्म देण्याचा विचार आहे, असा समजून घ्यावा लागेल. वैयक्तिक आणि सामाजिक नीति म्हणजे धम्म. दुर्बलांचे रक्षण करण्याकरिता नीतिचा उदय झाला आहे. विध्वंस मानवनिर्मित आहे तर शांततासुद्धा मानवालाच निर्माण करावी लागेल. शांततेकडे जाण्यासाठी कुठलाही मार्ग नाही, शांतता हाच मार्ग आहे. इ.स.पूर्व सहाव्या शतकात सम्राट अशोकाने शस्त्र टाकून अहिंसेचा मार्ग स्वीकारला होता. करुणेचा मार्ग स्वीकारून 'बहुजन हिताय बहुजन सुखाय'चा नारा देत सर्वांच्या मानवी हक्कांचे रक्षण करत भारत बौद्धमय केला होता. बाबासाहेबांच्या बौद्ध धम्म स्वीकारण्यातून ते वर्तुळ पूर्ण होते, असे म्हणावे लागेल. •••

**(लेखक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात सहयोगी प्राध्यापक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख आहेत.)**

# बाबासाहेबांमुळेच कामगार जीवनात क्रांती

**बाबासाहेबांनी कामगारांसाठी कायमस्वरूपी काही व्यवस्था केली. यातील महत्त्वाची तरतूद म्हणजे, त्रिपक्ष परिषद. कामगारांच्या हक्कांवर गदा आणणारे मालक, त्या हक्कांसाठी लढणारी कामगार संघटना आणि त्यांच्या तारतम्याचे विचार करणारी सरकारी यंत्रणा, असे या त्रिपक्ष परिषदेचे स्वरूप होते. या व्यवस्थेमुळे मालकांनी कामगारांचे केलेले रक्तशोषण काही प्रमाणात बंद झाले.**



ज.वि. पवार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगारांचा प्रश्न हा केवळ भाकरीच्या प्रश्नाशी निगडित आहे, हे कधीही मान्य केले नाही. जगण्यासाठी अन्नाची आवश्यकता असते. मानव प्राण्यासह सर्वच सजीव प्राण्यांना उपजतच कळून चुकते आणि तरीही बाबासाहेबांच्या उभ्या आयुष्यातला लढा हा कामगारांच्या सुखसोयींपुरता मर्यादित नव्हता. कामगार लढा प्रज्वलित करायचा की नाही, हा प्रश्न त्यांच्यासमोर १९२६ सालीच उभा राहिला होता. १९२५ ते १९३० हे पंचक फारच महत्त्वाचे. कारण याच पंचकात बाबासाहेबांची वर्णवर्चस्ववादाविरुद्धची चळवळ उभारी घेत होती. तिचा पाया होता, तो शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा, या तत्त्वत्रयींचा. रॉयल कमिशनपुढे दिलेली साक्ष आणि 'प्रॉब्लेम ऑफ रूपी', 'रुपयाचा प्रश्न' या ग्रंथांमुळे जगभरचे अर्थतज्ज्ञ बाबासाहेबांच्या अर्थविषयक कर्तृत्वामुळे स्तंभित झाले होते. हे विवेचन एवढे मूलगामी स्वरूपाचे होते, की रिझर्व्ह बँकेची जी पुढे १९३५ साली स्थापना झाली, त्याचे मूळ या ग्रंथात असल्याचे मान्य करण्यात आले.

**...म्हणून डॉ. आंबेडकर २६ एप्रिल १९२९ च्या संपात सहभागी झाले नाहीत**

१९२५ साली म्हणजे २६ डिसेंबर १९२५ रोजी कानपूर येथे स्थापन झालेला भारतीय कम्युनिस्ट पक्ष व दि. २७ सप्टेंबर १९२५ यादिवशी डॉ. हेडगेवार यांनी स्थापन केलेली 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' ही हिंदुत्ववादी संघटना. साम्यवादी मंडळींनी आपणच कामगारांचे हितकर्ते आहोत, हे सांगण्याचा प्रयत्न म्हणजे दि. २६ एप्रिल १९२९ रोजी घडवून आणण्यात आलेला पहिला संप. या संपात बाबासाहेबांचा सहभाग नव्हता, याचे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कामगारांचे शत्रू होते असे नव्हे, तर त्यांना कामगारांची प्रतिष्ठा महत्त्वाची वाटत होती. तत्कालीन कामगार नेतृत्व हे कामगारांमधील विषमतेला महत्त्व देत नव्हते. कामगारांची विभागणी त्यांच्या कामावरून होत नव्हती अन् या कामगार विभागणीचे मुख्य सूत्र होते, ते कामगारांमधील जातीयता. 'जगातल्या कामगारांनी एक व्हा' असे म्हणायचे अन् भारतीय कामगारांना जातीजातींमध्ये वाटायचे. उदा. त्याकाळी मुंबईत कापड गिरण्या मोठ्या प्रमाणात होत्या; परंतु या गिरण्यांतील काही खात्यांत अस्पृश्यांना प्रवेश



नव्हता. कामगार नेत्यांना ही जातीय विषमता दिसत नव्हती. म्हणून भाकरीच्या प्रश्नापेक्षा प्रतिष्ठेला महत्त्व देण्याच्या उद्देशाने बाबासाहेब २६ एप्रिल १९२९ च्या संपात सहभागी झाले नाहीत.

**वशिल्याशिवाय नोकऱ्या मिळू लागल्या**

या संपामुळे मुंबईचे सर्व कामगार सुखावले होते आणि महत्त्वाची बाब म्हणजे, या संपामुळे बाबासाहेब हे 'समस्त कामगारांचे नेते' म्हणून प्रस्थापित झाले होते. या काळात कन्हैयालाल मुन्शी हे सरकारचे, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कामगारांचे प्रतिनिधित्व करीत होते. के.एस. मुन्शी आणि डॉ. बाबासाहेब यांच्या सभागृहातल्या जुगलबंदीवरून एक लक्षात येते, की नामदार मुन्शी महिलांच्या अधिकारांचे भक्षक होते, तर बाबासाहेब महिलांच्या अधिकारांचे रक्षक होते. बाबासाहेबांच्या १९३७ सालापासूनच्या कार्यामुळे १९४२ साली त्यांची महाराज्यपाल यांच्या मंडळात 'लेबर मेंबर' म्हणून नियुक्ती झाली. महाराज्यपालांचे मंडळ म्हणजे एक प्रकारचे केंद्रीय मंत्रिमंडळ. या मंडळात 'लेबर मेंबर' म्हणजेच



## स्वतंत्र मजूर पक्षाने विरोध केलेली अनेक विधेयके ऐतिहासिक ठरली

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३४ साली मुंबईत 'दी म्युनिसिपल कामगार संघा'ची स्थापना केली. त्याचा उद्देशच मुळी हा होता, की कामगार चळवळीतले साम्यवादी कार्यकर्ते दलित कामगारांच्या सामाजिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करीत होते. पगारवाढ, बोनस यापलीकडे त्यांचे लक्ष जात नव्हते. या नेतृत्वाला महानगरपालिकेतील साफसफाई कामगारांबद्दल ममत्व नव्हते. त्यांच्यासाठी लढा दिला जात नव्हता. हे महानगरपालिका वा स्वराज्यसंस्थांपुरते मर्यादित नव्हते, तर इतर आस्थापनांतसुद्धा ही जातीयता पोसली जात होती. यासंदर्भात बाबासाहेबांनी 'जनता' वर्तमानपत्राच्या १२/२/१९३८ च्या अंकात काही प्रश्न विचारले होते, ''रेल्वे अस्पृश्य कामगारांना चहा किंवा फराळ करण्यास मज्जाव का केला जातो, रेल्वे मालकीच्या विहिरी वा बावड्यांवर असृश्यांना पाणी का पिऊ दिले जात नाही, मोठमोठ्या स्टेशनवर अस्पृश्य पोर्टरना नोकरीवर ठेवण्यास बरेच ब्राह्मण स्टेशन मास्तर विरोध का करतात व अस्पृश्य कामगारांतील लायक कामगारांना वरच्या दर्जाच्या नोकऱ्या मिळण्याबाबत स्पृश्यवर्गीय जाणूनबुजून अडथळा का करतात,' हे होते; परंतु जातीयता हेच उत्तर असल्यामुळे बाबासाहेब अस्पृश्य कामगारांसाठी लढा उभारत होते. या प्रश्नांची उत्तरे राजकीय चळवळीत मिळू शकतात, हे लक्षात आल्यावर बाबासाहेबांनी आपल्या राजकीय पक्षाचे नाव ठेवले ते 'स्वतंत्र मजूर पक्ष.' बाबासाहेबांनी आपल्या राजकीय पक्षाचे नाव जातीय स्वरूपाचे ठेवले नाही, तर ते समस्त कामगारांसाठी लढे उभारत होते. १९३५ च्या प्रतिनिधित्व कायद्यानुसार जी मुंबई राज्य विधिमंडळाची निवडणूक झाली, त्यात स्वतंत्र मजूर संघाचे १५ पैकी १३ उमेदवार निवडून आले. बाबासाहेबांचा हा पक्ष नंबर दोनचा होता. म्हणजे आजच्या भाषेत बाबासाहेब हे विरोधी पक्षनेते होते. विरोधी पक्षनेता ही संकल्पना अस्तित्वात नसली, तरी स्वतंत्र मजूर पक्षाने विरोध केलेली अनेक विधेयके ऐतिहासिक ठरली. उदा. १५ डिसेंबर १९३८ यादिवशी विधिमंडळात 'इंडस्ट्रिअल डिस्प्यूट बिल' मांडण्यात आले. या बिलान्वये कामगारांना आपल्या हक्कासाठी संप करता येणार नाही, हे स्पष्ट केले. या बिलाविरुद्ध बाबासाहेबांसारखा कामगारसखा लढा न उभारता तरच नवल. या बिलाविरुद्ध दि. ७ नोव्हेंबर १९३८ यादिवशी संप पुकारण्यात आला. एक प्रकारचा 'मुंबई बंद'चा कार्यक्रम होता. या संपात डांगे, मिरजकर, आर.एस. निमकर यासारख्यांनी सहभाग घेतल्यामुळे तो यशस्वी झाला.

श्रम मंत्रिपदी बाबासाहेबांची नियुक्ती झाली. आता मुंबई विधिमंडळात त्यांनी ज्या मागण्या केल्या त्यांना ऊर्जितावस्था आणण्याची जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आली. बाबासाहेबांनी कामगारांसाठी कायमस्वरूपी काही व्यवस्था केली. यातील महत्त्वाची तरतूद म्हणजे, त्रिपक्ष परिषद. कामगारांच्या हक्कांवर गदा आणणारे मालक, त्या हक्कांसाठी लढणारी कामगार संघटना आणि त्यांच्या तारतम्याचे विचार करणारी सरकारी यंत्रणा, असे या त्रिपक्ष परिषदेचे स्वरूप होते. या व्यवस्थेमुळे मालकांनी कामगारांचे केलेले रक्तशोषण काही प्रमाणात बंद झाले. याच काळात बाबासाहेबांनी समस्त बेरोजगार तरुणांसाठी कामगार विनिमय केंद्र (एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज) सुरू केले. ही योजना ७ मे १९८३ पासून अस्तित्वात आली. ही योजना म्हणजे अनेक आस्थापनांत सक्षम कामगार-अधिकारी यांची भरती करणे. हे केंद्र सुरू होण्याआधी ओळखीच्या लोकांचीच भरती व्हायची. कारण व्यवस्थापनांचे दरवाजे इतरांना बंद होते. या विनिमय केंद्रामुळे सक्षम बेरोजगारांसाठी आस्थापनांचे दरवाजे सताड उघडले गेले. वशिल्याशिवाय नोकऱ्या मिळू लागल्या.

याच काळात बाबासाहेबांनी आणखी एक महत्त्वाची गोष्ट केली. ती म्हणजे, स्त्री-पुरुषांना समान कामाचे समान वेतन. ग्रामीण भागात महिलांच्या अंगभूत शारीरिक क्षमतेचे कारण देऊन त्यांना समान वेतन दिले जात नसे. महिलांसाठी याच काळात श्रममंत्री या नात्याने त्यांनी महिलांचे विशेष अधिकार मिळवले. यातील महत्त्वाचा विशेष अधिकार म्हणजे, महिलांना देण्यात आलेली मॅटर्निटी रजा व त्या काळातील औषधोपचार. खरे तर, भारतातील सर्व स्त्रियांना प्रातःस्मरणीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच असायला हवेत; परंतु तसे दिसत नाही. कारण त्यांच्याच ठसठशीत असलेली जातिप्रथा. बाबासाहेबांनी जाती पलीकडे नजर टाकली म्हणूनच त्यांना श्रममंत्री असताना देण्यात आलेली दहा खाती. ही खाती त्यावेळी बाल्यावस्थेत असतील; परंतु या खात्यांना पुढे स्वतंत्र मंत्रालयाचा दर्जा मिळाला. त्यांचा मागोवा घेतला तर, या दहाही मंत्रालयांतील कामगारांच्या हिताचे संरक्षण बाबासाहेब आंबेडकर यांनीच केले होते. ती खाती म्हणजे विद्युत खाते, ऊर्जा, कालवे व पाटबंधारे, जलवाहतूक, खनिज, प्रशिक्षण, तांत्रिक शिक्षण, नोकरभरती, पुराण वस्तु (ऑर्किऑलॉजी), विमान सेवा व बांधकाम खाते. या सर्व खात्यांचा विचार केला, तर या खात्यातील कामगारांना हक्क कोणी दिले असतील, तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीच. आजसुद्धा बाबासाहेबांच्या श्रम मंत्रालयाचा विचार केला जातो. बांधकाम खात्यांतर्गत भाकरा-नांगल धरण, जलवाहतूकसंदर्भातील नदीजोडसारखे प्रकल्प विचारात घेतले जात नाहीत. आज याबद्दल फारसे संशोधन होत नाही; परंतु उद्या या दहाही खात्यांचा मूलगामी विचार केला जाईल. तेव्हा बाबासाहेब हेच भारताचे नवनिर्माते आहेत, हे स्पष्ट होईल.



**कायदामंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिंदू कोड बिलावर संसदेत चर्चा करताना.**

### आंबेडकरी चळवळीच्या शिरपेचात खोवला यशस्वीतेचा तुरा

१९३८ साली काळ्या कायद्याविरूद्ध लढताना बाबासाहेबांचा उद्देश होता, कामगारांचा संप करण्याचा अधिकार अबाधित राहावा. तसाच एक लढा १९४९ साली मुंबई शहरात उभा राहिला. खरे तर, या काळात बाबासाहेब स्वतंत्र भारताचे कायदेमंत्री, भारतीय संविधानाची निर्मिती आणि हिंदू कोड बिलाची पूर्तता करण्यात गर्क होते. दिवसभर मंत्रालयाचा कारभार पाहणे, अभ्यागतांशी चर्चा करणे, 'बुद्ध अँड हिस धम्मा'बद्दल विचार करणे, यात ते मग्न होते. १९४९ साली बाबासाहेबांनीच स्थापन केलेल्या 'दी म्युनिसिपल कामगार संघा'ने एक संप सुरू केला होता. हा संप सतत सहा महिने चालला. हा संप मुंबई महानगरपालिकेच्या साफसफाई खात्याने सुरू केला होता. हे खाते होते, मुंबईच्या आरोग्याची काळजी घेणारे. मुंबईच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या खात्यातील कामगारांची काळजी महानगरपालिका घेत नव्हती. मुंबईभर कचऱ्यांचे ढीग सुरू झाले. परिणामी, रोगराईचे प्रमाणही वाढू लागले. हा संप मोडून काढण्यासाठी महापालिका प्रशासन पाशवी प्रकार अवलंबित होते. संपात भाग घेणाऱ्या कामगारांना त्यांच्या वसाहतीतून बळजबरीने अटक करण्यात येत होती. त्यांचा संपावर जाण्याचा अधिकार संपुष्टात आणण्याचा प्रयत्न झाला. अशीच एक अटक होती काशा विठ्ठल या कामगाराची. म्युनिसिपल कामगार संघाने पुकारलेल्या संपात तो सहभागी झाला होता. त्याची अटक ही बेकायदेशीर होती, शिवाय संपावर जाण्याच्या अधिकारावरही घाला घालणारी होती. म्युनिसिपल संघाने नाक दाबले होते, आता तोंड उघडल्याशिवाय महापालिकेला पर्याय नव्हता. शे.का.फे.चे सर्व प्रमुख नेते व वकील मंडळी लढत होती. अखेर काशा विठ्ठल यांचा संप करण्याचा हक्क अबाधित राहिला. कोर्टाने तसा निकाल दिला. बाबासाहेबांचा या संपात प्रत्यक्ष सहभाग नव्हता. तरीदेखील त्यांच्या सहकाऱ्यांनी आंबेडकरी चळवळीच्या शिरपेचात यशस्वीतेचा तुरा खोवला.

### आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा देण्याचे धैर्य नेहरूंना झाले नाही

महिलांच्या हक्क-संरक्षणाचे सगळ्यात महत्त्वाचे कार्य म्हणजे बाबासाहेबांनी पार्लमेंटमध्ये मांडलेले हिंदू कोड बिल. हे बिल जेव्हा मांडले गेले, तेव्हा तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू एवढे प्रभावित झाले होते, की 'हे बिल पास झाले नाही तर माझे सरकार राजीनाम देईल' अशी नेहरूंनी वल्गना केली. नेहरू पुरोगामी होते; परंतु त्यांचे सहकारी प्रतिगामी होते. या संहितेमुळे हिंदूधर्मात ढवळाढवळ होऊन त्याचा वाईट परिणाम पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीवर होईल, असे समजून ही संहिता नाकारली गेली. नेहरूंना आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा देण्याचे धैर्य झाले नाही. अखेर बाबासाहेबांनी आपल्या केंद्रीय मंत्रिपदाचा राजीनामा दिला. महिलांच्या उन्नयनास विरोध करणाऱ्या प्रवृत्तीला ही थप्पड होती. महिलांना अधिकार देणारे हिंदू कोड बिल पास होत नाही, म्हणून आपल्या पदाचा राजीनामा देणारे बाबासाहेब हे पहिले आणि अखेरचे मंत्री. त्यांच्या १३१ व्या जयंतीदिनी त्यांना सविनय जयभीम •••

**(लेखक दलित पँथरचे सहसंस्थापक, मराठी साहित्यिक, आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक, भाष्यकार व विचारवंत आहेत.)**

# आंबेडकरोत्तर दलित राजकारण

**दलित, शोषित, पीडित, वंचित वर्गाचे राजकारण करावयाचे, तर कार्यकर्ते वचनबद्ध, सचोटीचे व समर्पणवृत्तीचे असावेत, ही डॉ. बाबासाहेबांच्या राजकीय संकल्पनेची पूर्वअट होती. नेते असोत की कार्यकर्ते, त्यांनी जर तत्त्वाशी नि कार्यक्रमाशी निष्ठा ठेवली नाही, तर पक्ष कोसळतात व नामशेष होऊन लयास जातात, अशी एक भविष्यवाणी डॉ. बाबासाहेबांनी वर्तवून ठेवली होती, ती आज खरी होताना दिसत आहे.**



**बी.व्ही. जोंधळे**




डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे तत्त्वनिष्ठ राजकारणी होते. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करताना दि. १५ ऑगस्ट १९३६ रोजी 'टाइम्स ऑफ इंडिया'स दिलेल्या मुलाखतीत ते म्हणतात, ''देशाच्या राज्यकारभारात प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीने भाग घेऊन आपल्या ध्येयास अनुकूल बनविल्याशिवाय कोणत्याही गांजलेल्या वर्गास आपली दुःखे दूर करता येणार नाहीत. दुसरा कुणी आपल्या हिताकरिता काही करील, या आशेवर जर गांजलेला व पिळला गेलेला वर्ग विसंबून राहील, तर तो तोंडघशी पडल्याशिवाय राहणार नाही. यासाठी म्हणूनच स्वतंत्र पक्षाची खरी गरज आहे.'' बाबासाहेबांची राजकीय संकल्पना एकजातीय नव्हे, तर व्यापक होती. स्वतंत्र मजूर पक्षाचे काम प्रामुख्याने कष्टकरी जनतेच्या कल्याण्यासाठी असल्यामुळे 'दलित' शब्दाऐवजी त्यांनी 'मजूर' हा शब्द स्वीकारला. आजचे युग जातीयवादी पक्षाच्या संघटनेसाठी नाही. दलित समाज हा परंपराग्रस्त व अभावग्रस्त श्रमिकांचा व शेतमजुरांचा बनलेला आहे. या समाजाचे शोषण येथील राजसत्ता, धर्मसत्ता, अर्थसत्ता व ज्ञानसत्तेने केले आहे. या सर्वंकष शोषणातून मुक्तता करण्यासाठीच बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली होती.

**कार्यकर्ते वचनबद्ध, सचोटीचे व समर्पणवृत्तीचे असावेत**

दलित, शोषित, पीडित, वंचित वर्गाचे राजकारण करावयाचे, तर कार्यकर्ते वचनबद्ध, सचोटीचे व समर्पणवृत्तीचे असावेत, ही डॉ. बाबासाहेबांच्या राजकीय संकल्पनेची पूर्वअट होती. नेते असोत की कार्यकर्ते, त्यांनी जर तत्त्वाशी नि कार्यक्रमाशी निष्ठा ठेवली नाही, तर पक्ष कोसळतात व नामशेष होऊन लयास जातात, अशी एक भविष्यवाणी डॉ. बाबासाहेबांनी वर्तवून ठेवली होती, ती आज खरी होताना दिसत आहे. डॉ. बाबासाहेबांचे भारतीय राजकारणाबाबतचे निरीक्षण असे होते, की भारतातील बहुसंख्य राजकीय पक्ष एकचालकानुवर्ती आहेत. नेत्याच्या चरणी सर्व स्वातंत्र्ये अर्पण करणारे कार्यकर्ते या देशात आढळतात. कार्यकर्त्यांमुळे लाभलेल्या शक्तीचा दुरुपयोग जर नेता करू लागला, तर कार्यकर्त्यांची परवड होते. निष्ठावान कार्यकर्त्यांच्या वाट्याला दुःख, नैराश्य, पराभव येतो. डॉ. बाबासाहेबांनी म्हणूनच स्वतंत्र मजूर पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी आदर्श अशी आचारसंहिता तयार केली होती. शिवाय स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा दलित, कामगार, कष्टकरी जनतेच्या उन्नतीच्या ध्येयाने प्रेरित झालेला होता.

**अस्पृश्यांच्या सर्वांगीण उद्धारासाठी**
**'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन'ची स्थापना**

स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्यक्षेत्र सीमित असल्यामुळे देशातील तमाम अस्पृश्य वर्गाला एका झेंड्याखाली आणण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी १९४२ साली 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' या पक्षाची स्थापना केली. नागपूर मुक्कामी १७ ते २० जुलै १९४२ साली शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे एक अधिवेशन झाले. या अधिवेशनातील पहिलाच ठराव असा होता, की ''अस्पृश्यांचा सर्वांगीण उद्धार करण्याच्या हेतूने व समाजाची राजकीय चळवळ चालविण्यासाठी भारतव्यापी एका मध्यवर्ती राजकीय संघटनेची फार जरूरी आहे. यासाठीच अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन स्थापन करण्यात येत असून, भारतातील सर्व अस्पृश्य वर्गाच्या संघटनांना या फेडरेशनला येऊन मिळण्याची व त्यामार्फत कार्य करण्याची विनंती करण्यात येत



आहे.'' शे.का.फे.चे पहिले अध्यक्ष एन. शिवराज होते व सेक्रेटरी होते पा.ना. राजभोज. पुढे १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर केवळ अस्पृश्यांचे प्रश्न मांडणाऱ्या पक्षापेक्षा भारतीय जनतेचा व्यापक सहभाग असलेले प्रगल्भ राजकारण करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी रिपब्लिकन पक्षाची संकल्पना मांडली. रिपब्लिकन पक्ष उभारण्याच्या दृष्टीने डॉ. राम मनोहर लोहिया, आचार्य अत्रे आदींशीही पत्रव्यवहार केला; पण दुर्दैवाने ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले व त्यांच्या पश्चात ३ ऑक्टोबर १९५७ साली रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली; पण डावे की उजवे, मार्क्सवाद की आंबेडकरवाद, असे निरर्थक वाद उकरून काढून पक्षात फाटाफूट झाली. पहिली फूट ॲड. बी.सी. कांबळे यांनी पाडली. तेथून पक्षाची अगणित शकले झाली. फाटाफुटीचा तो सारा क्लेशदायक इतिहास सर्वांनाच ज्ञात आहे. म्हणून त्यावर अधिक भाष्य न केलेले बरे.

**लोकशाहीवादी-धर्मनिरपेक्ष राजकारणाचे कट्टर समर्थक**

डॉ. बाबासाहेबांचा राजकारणाकडे बघण्याचा दृष्टिकोन अत्यंत उदात्त होता. भारतीय राजकारणाकडे बघण्याचाही दृष्टिकोन स्वतंत्र होता. व्यक्तिमात्राच्या स्वातंत्र्यासाठी मूल्याधिष्ठित राजकारणाचा अंगीकार त्यांनी केला होता. राजसत्ता हीच सर्व सत्तांची गुरुकिल्ली आहे, असे त्यांचे ठाम मत होते. म्हणूनच राजकारण हे अनुसूचित जातीचे जीवनद्रव्य झाले पाहिजे, असे ते आग्रहाने सांगत असत. डॉ. बाबासाहेबांच्या राजकारणाचे एक आदर्शवत वैशिष्ट्य असे, की त्यांनी अस्पृश्य-दलित समाजाचे हित जपण्यासाठी आपला स्वतंत्र पक्ष स्थापन करून राजकारण केले; पण पक्ष कधीही बदलला नाही. संसदीय लोकशाहीवादी-धर्मनिरपेक्ष राजकारणाचे ते कट्टर समर्थक होते.

**रिपब्लिकन चळवळच होत्याची नव्हती झाली**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयात असेपर्यंत त्यांनी जे राजकारण केले ते देशात सर्वदूर पसरले होते. दक्षिण भारत ते थेट पंजाबपर्यंत डॉ. बाबासाहेबांचा राजकीय विचार प्रमाण मानून राजकारण करणारे कार्यकर्ते तयार झाले होते. नंतर बसपा नेते कांशीराम यांनीसुद्धा डॉ. बाबासाहेबांचे राजकीय सिद्धांत अनुसरून देशात आंबेडकरी राजकारण उभे करण्याचा प्रयत्न केला. आंबेडकरी राजकारणाचा त्यांनी केलेला प्रयोग यशस्वीसुद्धा झाला. कर्मवीर दादासाहेब गायकवाडांच्या कालखंडातही रिपब्लिकन पक्ष चळवळी-लढे-संघर्षाच्या माध्यमातून नावारूपास आला होता. असे काही उल्लेखनीय अपवाद वगळता यथावकाश रिपब्लिकन पक्षात नेत्यांच्या क्षुद्र अहंकारी सौदेबाजीपायी पक्षाचे अगणित तुकडे-तुकडे झाले. नेत्यागणिक गट उदयास आले व रिपब्लिकन चळवळच होत्याची नव्हती झाली.

देशाला मिळणाऱ्या स्वातंत्र्यात सत्ता ही भांडवलदार, जमीनदार, सरंजामदार यांच्या हाती देण्यास त्यांचा सक्त विरोध होता. शेठ-सावकारांचे हित जपण्यात येथील बड्या राजकीय पक्षांना स्वारस्य वाटते; पण गरिबांचे हित जपण्यात त्यांना स्वारस्य नसते. म्हणूनच दलितांनी राजकारणापासून पळ न काढता कायदे करण्याची सत्ता मिळवली पाहिजे, असा त्यांचा राजकीय दृष्टिकोन होता. मूल्याधिष्ठता हा डॉ. बाबासाहेबांच्या राजकारणाचा मूळ पाया होता. म्हणूनच ते सदोदित असे सांगत आले, की एखाद्या पक्षाचे वय काय आहे, तो किती वर्षे जगला, यापेक्षा त्याची तत्त्वे काय



आहेत, ही बाब महत्त्वाची ठरते. डॉ. बाबासाहेबांचा सांघिकतेवर-ऐक्यावर अतूट विश्वास होता. संघ फोडून, आपली झोपडी मोडून दुसऱ्यांच्या महालात सामील होणे म्हणजे आत्मनाश करून घेणे होय. असा धोक्याचा इशारा ते स्वजनांना हयातभर देत आले. राजकारणात भांडणे होत असतात; पण ती विसरून एकता टिकवली पाहिजे, तरच गोरगरिबांच्या कल्याणाचे राजकारण करता येईल, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. डॉ. बाबासाहेबांचा राजकीय युती-मैत्री करण्यास विरोध नव्हता, तर अपरिहार्यपणे कराव्या लागणाऱ्या युती-आघाडीत कुठल्या पक्षाचा कार्यक्रम आपल्या कार्यक्रमाशी जुळतो हे पाहणे आवश्यक आहे, असे त्यांचे मत होते. सेक्युलर-समाजवादी विचारसरणीच्या पक्षाशी केलेली मैत्री त्यांना मान्य होती; पण कुठल्याही स्थितीत जातीयवाद्यांशी धर्मांध-धर्मवादी राजकारण करणाऱ्या पक्षाशी केलेली दोस्ती त्यांना कबूल नव्हती.

**आंबेडकरवाद की मार्क्सवाद या वादाने चळवळीत फूट**

आंबेडकरी चळवळीचे दुर्दैव असे, की चळवळ जेव्हा-जेव्हा व्यापक स्वरूप धारण करण्याच्या स्थितीत आली, तेव्हा-तेव्हा आम्हीच खरे सच्चे आंबेडकरवादी कसे आहोत, अशी एकांतिक, संकुचित भूमिका घेऊन चळवळ फोडण्यातच अनेक जण धन्यता मानत आले. यातील आणखी एक मुद्दा असा, की प्रत्येक आंबेडकरी चळवळ आंबेडकरवाद की मार्क्सवाद, असा वाद उपस्थित करून विभाजित करण्यात आली. रिपब्लिकन पक्षात जी पहिली फूट अॅड. बी.सी. कांबळे यांनी पाडली, ती दादासाहेब गायकवाडांना कम्युनिस्ट ठरवून. दलित साहित्य चळवळ शिथिल होण्यासही आंबेडकरवाद की मार्क्सवाद, दलित की बौद्ध, असे काही मुद्दे कारणीभूत ठरले आणि १९७२ साली उदयास आलेली दलित पँथरची चळवळसुद्धा आंबेडकरवाद की मार्क्सवाद, या मुद्यावरूनच फुटली. खरे तर मार्क्स हा काही आंबेडकरी चळवळीचा शत्रू नाही. आपल्या राजकीय चळवळीचा आता इतका काही तत्त्वच्युत अधःपात झाला आहे, की आपणास काँग्रेस तर सोडाच; पण आपला सत्तेचा घाणेरडा स्वार्थ साधण्यासाठी भाजपा-शिवसेनेसारखे हिंदुत्ववादी पक्षही जवळचे वाटतात. मात्र, मार्क्सवादी चालत नाहीत. यामागे काही तर्कशुद्ध-बुद्धिनिष्ठ भूमिका खरोखरच आहे काय? की आपल्या नेतृत्वाच्या दुकानदाऱ्या मोडून पडू नयेत म्हणून स्वतःचे स्वतंत्र गट तयार करून त्याला खोट्या आंबेडकरवादाचा मुलामा चढविण्यात येतो, चढविण्यात आला? आता एक मात्र खरे, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्सवादावर जरूर टीका केली आहे. समग्र परिवर्तनासाठी त्यांनी बुद्धाचा लोकशाहीवादी-अहिंसक मार्ग स्वीकारला आहे; पण गोळवलकर-हेडगेवारांसारखाच मार्क्स हा आपला शत्रू आहे, असे कुठे सांगितले? अजून एक मार्क्सवादी विचारवंत आंबेडकरवादात मार्क्सवादाची जोड दिल्याशिवाय दलित-शोषितांचा लढा पुढे जाणारच नाही असे जे भासवितात, ती त्यांची भूमिका काही तर्कशुद्ध निश्चितच नाही. डॉ. बाबासाहेबांनी लोकशाही-समाजवाद-धर्मनिरपेक्षता या मानवी मूल्यांचा स्वीकार करताना दलित-शोषित-वंचितांसाठी स्वतंत्र मजूर पक्षाचा जो जाहीरनामा लिहिला वा रिपब्लिकन पक्ष स्थापनेसंदर्भात जे खुले पत्र लिहिले ते पाहता दलितोद्धारासाठी व बहुजनांच्या कल्याणासाठी डॉ. बाबासाहेबांनी क्रांतिसन्मुख व सामाजिक न्यायाचा भरीव कार्यक्रमच दिला, याविषयी शंका नसावी. म्हणूनच वर्गलढा नि वर्णलढा यशस्वी होण्यासाठी मार्क्सवाद नि आंबेडकरवादाची सांगड घातलीच गेली पाहिजे, असा जो एकांतिक आग्रह मार्क्सवादी विचारवंत धरतात तो अर्थातच अप्रस्तुत आहे. कारण वर्ण नि वर्गलढा यशस्वी करण्यासाठी आंबेडकर व बुद्धाचा मार्ग सक्षम आहे. अर्थात, याचा अर्थ असा

मात्र नव्हे, की धर्मांध-फॅसिस्ट लोकशाहीविरोधी उजव्या शक्तींच्या पराभवासाठी दलित पक्ष संघटनांनी व कम्युनिस्टांसह सर्व डाव्या पक्षांनी एकत्रित येऊन दलितांचा सामाजिक-आर्थिक न्यायाचा लढा लढूच नये. म्हणूनच आंबेडकरी चळवळ दुभंगण्यास आंबेडकरवाद की मार्क्सवाद, हा जो वितंडवाद उकरून काढून सर्वच पातळ्यांवर आंबेडकरी चळवळ फोडून टाकण्याचे जे करंटेपण आपण केले ते योग्य व तर्काधिष्ठित होते, असे म्हणणे मात्र धाडसाचेच ठरेल, याविषयी शंका नको.

राजकारणाचा व दलित अत्याचाराचा संतापदग्ध पार्श्वभूमीवर १९७२ साली दलित पँथरचा उदय झाला. त्या घटनेस आता ५० वर्षे पूर्ण झाली. दलित पँथरने दलितांवरील अत्याचारास प्रतिबंध करताना 'जशास तसे' धोरण स्वीकारून महाराष्ट्राच्या समाजजीवनात एक वादळ उठविले होते. सवर्ण सनातन्यांच्या मनात धडकी भरविली होती; पण दीड-दोन वर्षांत फाटाफुटीच्या शापामुळे पँथरही दुभंगली.





**सामाजिक अभिसरणासाठी काँग्रेस-रिपब्लिकन युती**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १९५६ च्या धर्मांतरानंतर नवदीक्षित बौद्ध समाज अलग पडला होता. बौद्ध समाजात निर्माण झालेली अस्मिता सवर्ण समाजाचा एक चिडीचा व असूयेचा विषय झाला होता. परिणामी, धर्मांतरानंतर खेडोपाडी दलित समाजावर मोठ्या प्रमाणात अन्याय-अत्याचार होऊ लागले होते. महिलांवरील अत्याचारांना ऊत आला होता. गावकुसाबाहेरील दलित वस्त्यांवर बहिष्कार पडू लागला होता. डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यांच्या विटंबनेचे प्रकार घडू लागले. या पार्श्वभूमीवर सामाजिक-अभिसरणासाठी म्हणून महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी काँग्रेस-रिपब्लिकन युती केली होती. युती ही राजकीय कमी आणि सामाजिक अधिक होती. रिपब्लिकन पक्षाला समाजकल्याण समितीचे प्रत्येक जिल्हा परिषदेत उपसभापतीपद मिळाले होते. तिरंग्या झेंड्याची रिपब्लिकन उपसभापतीची गाडी खेडोपाडी फिरून आम्हीही सत्तेत आहोत, हा संदेश सवर्ण समाजात गेला होता. रिपब्लिकन पक्षाच्या अन्य काही मागण्याही काँग्रेस-रिपब्लिकन युतीमुळे धसास लागल्या. शिवाय, दादासाहेब गायकवाड काँग्रेस-रिपब्लिकन युतीचे वर्णन करताना म्हणायचे, ही युती म्हणजे गाजराची पुंगी आहे. वाजली तर वाजली नाही, तर मोडून खाल्ली. दादासाहेबांनी एका अपरिहार्य गरजेतून युती केली म्हणून बाकीच्यांनाही भविष्यात तत्त्वच्युत युत्या कराव्यात, असे काही म्हटले नव्हते. एक मात्र खरे, की या युतीपासून रिपब्लिकन कार्यकर्त्यांना सत्तेची चटक लागली व त्यातून लढाऊ रिपब्लिकन चळवळ मोडून पडून वेड्यावाकड्या युत्या-आघाड्या होऊ लागल्या. त्या शेवटी भाजपा-शिवसेनेच्या वळचणीत जाऊन बसल्या. यांसारखी आंबेडकरी राजकारणाची क्लेशदायक दुर्दशा ती दुसरी काय असू शकते? नुकत्याच उत्तर प्रदेशसह पाच राज्यांत ज्या विधानसभा निवडणुका झाल्या, त्यात आंबेडकरी विचारमूल्यांचे प्रतिनिधित्व कुणालाच करता आले नाही, ही कोण बरे दलित राजकारणाची अधोगती?

रिपब्लिकन पक्षाच्या गटबाज, सत्तालोलुप, नाकर्त्या रिपब्लिकन पुढाऱ्यांना शिव्या घालणारे रिपब्लिकन पुढाऱ्यांच्याच वाटेने गेले. मार्क्सवाद की आंबेडकरवाद हा खेळ खेळता-खेळता त्यांनीही एकमेकांवर पैशांच्या देवघेवीचे आरोप केले. पुढे पँथर म्हणविणारे काँग्रेस-राष्ट्रवादी व्हाया भाजपा-सेनेच्या तंबूत जाऊन विसावले. या पार्श्वभूमीवर ज्या आंबेडकरी-दलित विचारवंतांनी आंबेडकरी चळवळीस हंसक्षीर न्यायबुद्धीने मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षा होती, तेच विविध पक्षोपक्षांत जाऊन सत्तेचे लाभधारक झाले. अशा या मरगळलेल्या अवस्थेत नव्या पिढीचे दलित तरुण आंबेडकरी चळवळीची पुनर्बांधणी करण्याचे आव्हान पेलू शकतील काय, हा खरा प्रश्न आहे. पेलतील असा आशावाद आपण व्यक्त करू या. दुसरे काय? •••

**(लेखक आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)**



# गोलमेज परिषदेमध्ये डॉ. आंबेडकर



गांधीजी अस्पृश्यांना हिंदूंपासून वेगळे मानायला तयार नव्हते. त्यांच्या मतानुसार अस्पृश्य हे हिंदूच आहेत. अशा परिस्थितीत अस्पृशांना स्वतंत्र मतदारसंघ दिले, तर हिंदू धर्मातच विभागणी केल्यासारखे होईल, अशी त्यांची ठाम भूमिका होती. त्यांच्या या भूमिकेमुळे बाबासाहेबांचा संताप होणे साहजिकच होते आणि झालेही तसेच. बाबासाहेबांनीदेखील आपली पहिली भूमिका बदलत स्वतंत्र मतदारसंघाची मागणी अधिक जोराने लावून धरली.



प्रा. अर्जुन पगारे

'भारत सरकारचा कायदा-१९१९'या कायद्यापूर्वीच ब्रिटिशांनी भारतात टप्प्याटप्प्यांत जबाबदार शासन पद्धती निर्माण केली जाईल, असे स्पष्ट केले होते. त्याचाच पुढील भाग म्हणून भारतातील विविध राजकीय घटकांना किती आणि कसे राजकीय हक्क द्यावेत, तसेच भारतासाठी राज्यघटना तयार करण्याच्या उद्देशाने भारतातील निरनिराळ्या पक्षांतील प्रमुख नेते विविध समाजांचे विशेषतः अल्पसंख्याकांचे प्रतिनिधी आणि संस्थानिक यांच्याशी चर्चा करण्यासाठी इंग्लंडमध्ये गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

**अस्पृश्यवर्गाला स्वतंत्र अल्पसंख्याकांचा दर्जा देण्याची मागणी**

गोलमेज परिषदेपूर्वीच १९१९ च्या कायद्याने कोणत्या सुधारणा झाल्या, याचा अभ्यास करून भारतीयांना एखादी नवीन योजना जाहीर करण्यासाठी ब्रिटिश सरकारने सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग भारतात पाठविला. त्यालाच सायमन कमिशन म्हणून ओळखले जाते. याच सायमन कमिशनसमोर बाबासाहेबांनी व्यापक अहवाल सादर केला होता. त्यात प्रामुख्याने अस्पृश्यवर्गाला हिंदूंपासून वेगळे समजून त्यांना स्वतंत्र अल्पसंख्याकांचा दर्जा द्यावा आणि त्यांना प्रौढ मताधिकारासह संयुक्त मतदारसंघात राखीव जागा द्याव्यात, अशी मागणी केली होती. याच अहवालात बाबासाहेबांनी स्वतंत्र मतदारसंघांचे तत्त्व हे मूलतः लोकशाहीविरोधी तत्त्व आहे आणि संयुक्त मतदारसंघात राखीव जागांचे तत्त्व हे स्वीकारार्ह आहे. स्वतंत्र मतदारसंघाचे तत्त्व हे मुळात राष्ट्रविघातक असल्यामुळे भारतीय जनतेचे प्रश्न सोडविण्याऐवजी ते प्रश्न अधिक जटील आणि भेदभाव निर्माण करणारे आहेत, हे ठासून सांगितले होते.

**अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून गोलमेज परिषदेचे आमंत्रण**

ब्रिटिशांनी भारतात पाठविलेल्या एकूण सात सदस्यीय 'सायमन कमिशन'मध्ये एकाही भारतीयाचा समावेश नसल्याने देशभरातून सायमन कमिशनचा बहिष्कार केला जात होता. 'सायमन गो बॅक'च्या घोषणा दिल्या जात होत्या; परंतु या आयोगाच्या अहवालानुसारच पुढे गोलमेज परिषदांचे आयोजन केले जाणार होते, म्हणून त्याचे महत्त्वही होते. अस्पृशांनादेखील भावी राज्यघटनेत राजकीय हक्क मिळावेत, याच हेतूने बाबासाहेबांनी सायमन कमिशनसमोर अस्पृश्यांच्या परिस्थितीची कैफियत मांडली होती, बाबासाहेबांनी प्रभावीपणे मांडलेल्या भूमिकेमुळेच ब्रिटिश सरकारकडून त्यांना अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून गोलमेज परिषदेचे आमंत्रण मिळाले होते.

**ब्रिटिश वर्तमानपत्रांनी घेतली डॉ. बाबासाहेबांच्या भाषण दखल**

इंग्लंडमध्ये पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांच्या अध्यक्षतेखाली पहिली 'गोलमेज परिषद' नोव्हेंबर १९३० मध्ये भरविण्यात आली. दलितांचे प्रतिनिधी म्हणून पहिल्या गोलमेज परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हजर होते. २० नोव्हेंबर रोजी आंबेडकरांचे पहिले भाषण गोलमेज परिषदेत झाले. त्या भाषणाची सुरुवातच ज्या लोकांची स्थिती गुलामापेक्षाही वाईट आहे, अशा भारतातील एक पंचमांश लोकांची गाऱ्हाणी मी परिषदेसमोर ठेवीत आहे. अशा अस्पृश्यवर्गाची मागणी अशी आहे, की भारतातील सरकार हे लोकांनी, लोकांसाठी चालविलेले लोकांचे राज्य असावे, ब्रिटिशांचे राज्य भारतात येण्यापूर्वी आमची जी करुणाजनक स्थिती होती, त्यात किंचितही फरक झालेला नाही. आम्ही केवळ संधीची वाट पाहत उभे आहोत. ब्रिटिश राजवट भारतात स्थापन होण्यापूर्वी आम्हाला खेड्यातील विहिरीवर पाणी भरण्यास बंदी होती. ब्रिटिश सरकारच्या काळात त्यांनी हा न्याय आम्हास मिळवून दिला काय? पोलीस दलात आणि लष्करात ब्रिटिश सरकार नोकरी देऊ शकते काय? आज ब्रिटिश राजवट स्थापन होऊन सव्वाशे वर्षे लोटली तरीही आमची दुःखे आहेत तशीच आहेत. असले सरकार आमच्यासाठी काय कामाचे? भारतातील भांडवलदार कामगारांना किमान वेतन देत नाहीत, जमीनदार शेतकरीवर्गाला पिळून काढीत आहेत. म्हणून





आम्हाला असे सरकार हवे आहे, की जे देशाचे हित निष्ठापूर्वक साधेल आणि न्याय आणि निकडीचे असे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न कोणाच्याही रागालोभाची पर्वा न करता सोडवील.

बाबासाहेबांचे हे भाषण गोलमेज परिषद गाजवणारे ठरत होते. त्यांच्या भाषणात मधूनमधून टाळ्यांचा कडकडाट होत होता. त्यांच्या भाषणाची दखल अनेक ब्रिटिश वर्तमानपत्रे घेत होती. डॉ. बाबासाहेबांची अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांच्या संरक्षणासंबंधी पहिल्या गोलमेज परिषदेतील भूमिका ही प्रौढ मताधिकार, पहिल्या दहा वर्षांसाठी स्वतंत्र मतदारसंघ आणि तिथून पुढे संयुक्त मतदारसंघ आणि राखीव जागा अशी होती.

**अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यास गांधीजींचा नकार**

दुसरी गोलमेज परिषद ७ सप्टेंबर १९३१ ते १ डिसेंबर १९३१ दरम्यान आयोजित केले गेली. राष्ट्रीय काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून गांधीजी दुसऱ्या गोलमेज परिषदेला हजर राहिले. परिषदेत बोलताना सुरुवातीलाच त्यांनी 'संपूर्ण भारताचे प्रतिनिधित्व राष्ट्रीय काँग्रेस करीत असल्याने मी एकटाच भारताचा खरा प्रतिनिधी आहे. बाकीच्या सर्व प्रतिनिधींची नेमणूक सरकारने केलेली आहे, असे सांगून इतर सदस्यांचा संताप ओढवून घेतला. महत्त्वाचे म्हणजे मुसलमान आणि शीख सोडून इतर कोणत्याही अल्पसंख्याकाला स्वतंत्र मतदारसंघ दिले जाणार नाहीत, असे स्पष्ट केले. अस्पृशांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याला तर त्यांनी नकारच दिला. कारण गांधी अस्पृश्यांना हिंदूंपासून वेगळे मानायला तयार नव्हते. त्यांच्या मतानुसार अस्पृश्य हे हिंदूच आहेत. अशा परिस्थितीत अस्पृशांना स्वतंत्र मतदारसंघ दिले, तर हिंदू धर्मातच विभागणी केल्यासारखे होईल, अशी ठाम भूमिका गांधींची होती. त्यांच्या या भूमिकेमुळे बाबासाहेबांचा संताप होणे साहजिकच होते आणि झालेही तसेच. बाबासाहेबांनीदेखील आपली पहिली भूमिका बदलत स्वतंत्र मतदारसंघाची मागणी अधिक जोराने लावून धरली.

**ऐतिहासिक पुणे करार**

दुसऱ्या गोलमेज परिषदेतील वातावरण दोघांच्या संघर्षाने अधिकच तापले गेले. दुसऱ्या गोलमेज परिषदेतील गांधी–आंबेडकर संघर्ष हा नुसता तेवढ्यापुरता मर्यादित नव्हता, तर त्यात पाया रचला जात होता ऐतिहासिक पुणे कराराचा. दुसऱ्या गोलमेज परिषदेनंतरच १६ ऑगस्ट १९३२ रोजी रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी 'जातीय निवडा' जाहीर केला. त्यात अस्पृश्यांनादेखील स्वतंत्र मतदारसंघ मान्य करण्यात आले होते. याचसंदर्भावरून ऐतिहासिक पुणे करार झाला. या करारात बाबासाहेबांनी आपली स्वतंत्र मतदारसंघाची भूमिका सोडून देत संयुक्त मतदारसंघ आणि राखीव जागा मान्य केल्या.




## गांधी–आंबेडकरांची पहिली भेट

ब्रिटिश सरकारला पहिल्या गोलमेज परिषदेनंतर राष्ट्रीय काँग्रेस आणि गांधी यांच्या सहकार्याची अपेक्षा होती. त्यासाठीच लॉर्ड आयर्विन भारतात आले होते. गांधी–आयर्विन करार झाला आणि गांधीजी राष्ट्रीय काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून दुसऱ्या गोलमेज परिषदेला उपस्थित राहणार, हे निश्चित झाले. पहिल्या गोलमेज परिषदेत बाबासाहेबांनी घेतलेली भूमिका गांधीजींच्या अगोदरच कानावर आलेली होती. याचसंदर्भात दोघांत पत्रव्यवहार झाला आणि पहिल्या गोलमेज परिषदेच्या पार्श्वभूमीवर गांधीजी आणि बाबासाहेबांची पहिली भेट मुंबईतील मणिभवन याठिकाणी झाली. या भेटीतील दोघांमधील वादळी चर्चा, विशेषतः बाबासाहेबांनी केलेले शब्दप्रयोग इतिहासात अजरामरच झाले.

गोलमेज परिषदेपासून सुरू झालेला हा संघर्ष पुणे कराराच्या माध्यमातून अस्ताला जात होता. गांधी आणि आंबेडकर या दोन्ही महापुरुषांच्या संघर्षात खरं तर विजय आणि पराभव कोणाचा नव्हताच, तर या संघर्षातून महात्म्यांच्या भोवती तयार झालेल्या राजकारणी व्यक्तित्वाच्या बेड्या तुटत होत्या. बाबासाहेब फक्त महाराष्ट्रापुरते मर्यादित शोषितांचे नेते न राहता ते संपूर्ण भारतातील शोषित–पीडितांचे नेते म्हणून उदय पावत होते... •••

**(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)**



# महाडच्या सत्याग्रहातील सुरबा टिपणीसांचे योगदान

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० मार्च १९२७ रोजी कोकणातील महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. हजारो वर्षांपासून पाण्यापासून दूर असलेल्या अस्पृश्य समाजबांधवांना चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या निमित्ताने पाणी खुले झाले. या ऐतिहासिक आंदोलनात महाडचे प्रथम नागरिक असलेल्या सुरबानाना टिपणीस यांचे प्रमुख योगदान लाभले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सुरबानाना टिपणीस यांचे सलोख्याचे संबंध होते. या अनुषंगाने घेतलेला आढावा वाचकांसाठी प्रकाशित करत आहोत.**

**प्रा. रामचंद्र गायकवाड**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सुरेंद्र टिपणीस यांच्या संबंधाबद्दल यांचे एक सहकारी मित्र असे लिहितात, की ‘महाडची अस्पृश्य परिषद भारतात चांगलीच गाजली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनक्रमात महाडच्या या घटनेने आमूलाग्र बदल झाला. आपल्या अभ्यासिकेत ग्रंथाची पारायणे करणारे हे कायदेपंडित, जागतिक कीर्तीचे घटनाकार प्रत्यक्ष राजकारणात उतरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडमध्ये केलेल्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे श्रेय प्रामुख्याने सुरेंद्र टिपणीस (सुरबानाना) व भाई अ.वि. चित्रे यांना द्यावे लागेल. समता संघातील ही मंडळी व महाडकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यामागे मोठी शक्ती उभी केली होती. त्यांचे प्रत्येक आंदोलन पुढे नेण्यास या महाडकर मंडळीचे सहकार्य प्रेरक व ऐतिहासिक ठरले.

### कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेला आले पाच हजारांच्या वर सत्याग्रही

रावसाहेब सी.के. बोले यांच्या मुंबई विधिमंडळातील ठरावानुसार महाडच्या कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेला पाच हजारांच्या वर सत्याग्रही आले होते. अनंतराव चित्रे महाडला येऊन परिषदेला लागणाऱ्या सर्व बाजूंची तजवीज करत होते; पण सारा गाव कट केल्यासारखा परिषदेच्या विरुद्ध एकत्र आला होता. परिषदेसाठी कोणतीच साधन सामग्री मिळू नये, अशी खबरदारी घेतली होती. तरीही सुरबानाना व अ.वि. चित्रे यांनी या सर्वांवर मात करून परिषद भरविली होती. परिषदेच्या सभामंडपाला ‘विरेश्वर नगरी’ असे नाव दिले होते. यावेळी मंचावर ग.नि. सहस्त्रबुद्धे, राजभोज पी.ना., सि.ना. शिवतकर, सुरबानाना, कमलाकांत चित्रे, वि.ग. सवादकर, अ.वि. चित्रे, आर.डी. कवळे, भा.र. कद्रेकर, उपश्याम, भा.अ.



धोंडीराम नारायण गायकवाड, शिवराम गोपाळ जाधव, आर.बी. मोरे, रामचंद्र शिंदे, बाळाराम आंबेडकर, अशी अनेक मंडळी विराजमान झाली होती.

**सनातनी स्पृश्य गावकरी मंडळी सत्याग्रही मंडळींवर तुटून पडली**

दुसऱ्या दिवशी दुसऱ्या सत्रातील भाषणातील भाई अ.वि. चित्रे यांच्या आवाहनानुसार सर्व मंडळीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली चवदार तळ्यावर जाऊन पाणी पिण्याचा सत्याग्रह केला. पाणी पिऊन झाल्यावर सत्याग्रहींना उद्देशून डॉ. बाबासाहेब म्हणाले, की 'आता विरेश्वर नगरीकडे जाऊ या' पण विरेश्वर मंदिराचा पुजारी बाबूराव गुरवाने गावात असा प्रचार केला, की 'अस्पृश्य सत्याग्रही आता आपले 'विरेश्वर मंदिरही' बाटवायला निघालेत.' अशी आवई उठवली तेव्हा सनातनी स्पृश्य गावकरी मंडळी सत्याग्रही मंडळींवर तुटून पडली. या सनातन्यांपैकीच काही टोळक्यांनी सभास्थानी जाऊन जेवत असलेल्या लोकांना लाठी-काठ्यांनी बडवून काढले. जेवणात माती कालवली. बरेच सत्याग्रही या मारहाणीत जखमी झाले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्रामगृहावर काही सहकाऱ्यांसोबत थांबले होते. जमावातले दुसरे टोळके नगराध्यक्ष सुरेंद्र टिपणीस यांच्या घरावर चाल करून गेले. आजच्या चवदार तळे विटाळ व्हायला हाच जबाबदार आहे, अशी या विरोधकांची समजूत झाली होती. हाती दगड, गोटे, लाठ्या, काठ्या, तोंडात अश्लील शिव्या, आरडाओरड करीत या टोळक्यांद्वारे गोविंद निवासावर हल्ला चढविला, हे पाहून नानांच्या घरात घबराट पसरली. यावेळी या टोळक्याला नानांचे घर पेटवून द्यायचे होते. अ.वि. चित्रे यांना ठार मारायचे होते. हे दोघेच महाडात घडलेल्या प्रकाराला जबाबदार होते. असा पक्का समज या लोकांचा झाला होता. कारण २० मार्च १९२७ रोजी नानांच्या घरी चवदार तळ्यावर जाऊन पाणी प्यायची खलबते झाली होती. म्हणून यांना जबाबदार धरण्यात आले होते; पण सुरबानाना घाबरले नाहीत. त्यांनी खुंटीवरची बंदूक काढली, त्यात काडतुसे भरली आणि आपल्या गोविंद निवासाच्या गॅलरीत उभे राहून जमावावर बंदूक रोखून मोठ्याने ओरडले, बंदूक भरलेली आहे. ज्याला आपला जीव नकोसा झाला असेल त्याने पुढे यावे. असे म्हणत हवेत एक ते दोन वेळेस गोळीबार करताच सारे बाजारबुणगे प्राण मुठीत धरून पळून गेले.

**...तरीही सामाजिक निष्ठा तिळमात्र ढळू दिली नाही**

सुरेंद्र टिपणीस डॉ. बाबासाहेबांशी व त्यांच्या चळवळीशी एकरूप झाले होते. त्यांचे कुटुंबही यात सहभागी होते. चवदार तळे सत्याग्रहाच्या दुसऱ्या दिवशी खास महिलांसाठी सभेचे आयोजन केले गेले होते. यात डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्य महिलांना राहणीमानाविषयी मार्गदर्शन केले. ते असे म्हणाले, की 'तुम्ही असे गुडघ्यापर्यंत लुगडे नेसू नका. त्यावरून तुमची जात कळते. सवर्ण बायकांप्रमाणे पायघोळ लुगडे नेसण्यास शिका व तसेच नेसत जा. अंगभर कथिलाचे दागिने घालण्यापेक्षा एकच दागिना घाला; पण तो सोन्याचा घाला. स्वच्छ राहत जा.' असे उपदेश करीत असतानाच सुरेंद्र टिपणीस यांच्या सहचारिणी लक्ष्मीबाई सभेच्या ठिकाणीच आडोसा करून सत्याग्रहीतील बायकांना पायघोळ लुगडे नेसण्याचे शिकवू लागल्या. यावरून सुरेंद्र टिपणीस यांच्या कुटुंबाची सामाजिक जाणीव किती तीव्र होती, हे लक्षात येते. पण त्यांना या कृतीमुळे त्यांच्या समाजाच्या सामाजिक बहिष्काराला सामोरे जावे लागले. त्यांना समाजाने वाळीत टाकले. १२ वर्षे त्यांना या बहिष्काराला सामोरे जावे लागले होते. तरीही त्यांनी आपली सामाजिक निष्ठा तिळमात्र ढळू दिली नाही.

**चवदार तळ्याचा कायदेशीर लढा**

सनातन्यांनी २१ मार्च १९२७ रोजी डॉ. आंबेडकर महाडात असतानाच महाडातील ब्रह्मवृंदांनी चवदार तळे शुद्ध करून घेतले. महाडचे चवदार तळे अस्पृश्यांनी अस्पृश्य केले म्हणून त्यांनी गोमूत्र-गंगाजल टाकून शुद्ध केले. तेव्हा तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमोर अस्पृश्य ही माणसेच नाहीत, असे हे मोठे आव्हान उभे राहिले होते. तेव्हा अस्पृश्य हे इतर माणसांप्रमाणेच माणसे आहेत हे सिद्ध करण्यासाठी दुसऱ्यांदा चवदार तळ्यावर जाऊन अस्पृश्यांसोबत पाणी

प्राशन करण्यासाठी महाडलाच दुसरी परिषद आयोजित करण्याचा मनोदय जाहीर केला, तेव्हा सनातनी लोकांनी चवदार तळे सार्वजनिक नसून खासगी असल्याचा कोर्टाचा मनाई हुकूम मिळविला होता. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आता चवदार तळे हे खासगी नसून सार्वजनिक आहे हे सिद्ध करण्याचा कायदेशीर लढा द्यावा लागला. त्यामुळे महाडला नेहमी जावे लागत असे. तेव्हा त्यांच्या विसाव्याचे नि हक्काचे निवासाचे ठिकाण सुरेंद्र टिपणीस यांचेच गोविंद निवास घर होते. समाजपरिवर्तनातील दलितोद्धाराच्या लढ्यात सुरेंद्र टिपणीस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या खांद्याला खांदा लावून लढले. त्यांचे डॉ. आंबेडकर व त्यांच्या चळवळीवर नि:सीम प्रेम होते. त्यात बेगडीपणा, दिखाऊपणा व स्वार्थीपणा याचा लवलेशही नव्हता. ते मनाने अगदी त्यांच्या चळवळीशी एकजीव झाले होते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरही सुरबानाना टिपणीस यांच्या सुखदुःखात वेळोवेळी सहभागी होत असत.

सुरेंद्र टिपणीसांच्या धाकट्या बहिणीच्या विवाहाच्या कार्यात पाठवणीप्रसंगी आशीर्वाद देताना डॉ. आंबेडकर सुरेंद्र टिपणीसांना म्हणाले, की 'सुरबा तू थोर अंत:करणाचा खरा समतावादी आहेस. तुझ्यासारखे समतेचे पुरस्कर्ते माझ्याबरोबर असल्यानंतर माझे इच्छित ध्येय निश्चितपणे साध्य करीन.'

**कोकण विभागाचे प्रमुख संघटक म्हणून कार्य**

कोकणातील महाड, पनवेल, पेण, अलिबाग, कुलाबा आणि ठाणे या भागांतील न्यायालयात खोती, सावकराविरुद्ध महाडच्या चवदार तळे सत्याग्रहासंदर्भातील अनेक खटले दाखल केले गेले होते. डॉ. आंबेडकरांना कामाच्या व्यापामुळे व रमाईंच्या आजारपणामुळे प्रत्येक खटल्याच्या तारखेला हजर राहणे शक्य होत नसे. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वतीने डॉ. दत्तात्रय वैद्य व आर. डी. कवळी हे दोघे वरील केसेस लढवत असत. काही महत्त्वाच्या खटल्याच्या सुनावणीसाठी प्रकृती बरी नसतानाही डॉ. आंबेडकरांना महाडला यावे लागत असे. तेव्हा महाडला 'गोविंद निवास' हक्काचे होते आणि या गोविंद निवासात डॉ. आंबेडकरांचे स्वागतही अगदी आनंदात होत असे. सुरेंद्र टिपणीस व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अगदी विश्वासू नातेसंबंध होते. म्हणून तर १९३७ च्या मुंबई प्रादेशिक विधिमंडळाच्या निवडणुकीत कोकण विभाग मुंबई इलाख्यातून स्वतंत्र मजूर पक्षाचे १८ पैकी १४ उमेदवार निवडून आणलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाचे सुरेंद्र टिपणीस हे एक कोकण विभागाचे प्रमुख संघटक म्हणून कार्य पाहत होते.

**खोती पद्धती व सुरेंद्र टिपणीस**

कोकण विभागात खोती पद्धती अस्तित्वात होती. कोकणातील हे खोत कुळावर अत्याचार करीत. अनेक मार्गांनी त्यांची हे खोत कोंडी करीत. डॉ. बाबासाहेबांनी कूळ व खोत यांचा सूक्ष्म अभ्यास करून कुळांना खोताच्या जाचातून मुक्त करण्यासाठी लढा उभारला. सुरेंद्र टिपणीस स्वत: महाडचे वडिलोपार्जित नावाजलेले मोठे खोत होते. असे असूनही त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात आल्यामुळे स्वत:च्या खोतीचे विसर्जन केले होते व ते खोती पद्धतीविरुद्ध लढा देणाऱ्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या खोती व जमीनदारीविरुद्ध आंदोलनात सहभागी होऊन खोती पद्धतीविरुद्ध प्रचार केला. असे करताना त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. सुरेंद्र टिपणीसांनी आता आपली स्वत:ची जमीन कुळांना देऊन टाकली आणि कुलाबा जिल्ह्यातील खोतांविरुद्ध कुळांना संघटित करून वेगवेगळ्या मार्गांनी बंदी करून खोतांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. तसेच कोकणातील चरीच्या लढ्यातही सहभाग घेतला होता. ते यावेळी असे म्हणाले, की 'शेतकऱ्यांच्या हितासाठी झगडत आहे. झगडत राहणार आहे. शेतकऱ्यांची चळवळ न्याय्य असताना मला या खोतांनी जरी त्यांच्या मायबाप सरकारकडून तुरुंग दाखवला तरीसुद्धा माझी त्यास पूर्ण तयारी आहे. शेतकरी पुढाऱ्यांना तुरुंगात डांबील त्यादिवशी आमच्या चळवळीचा विजय झाला, असे आम्ही समजू. सुरेंद्र टिपणीसांच्या या भूमिकेमळे त्यांना इंडियन पिनल कोड १५३ नुसार अटक व तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा व ३०० रु. दंड, अशी शिक्षा झाली होती. यावेळी डॉ. आंबेडकर या धीरोदात्त नेत्याला तुरुंगात पोहोचण्यासाठी स्वत: गेले होते. तुरुंगात गेल्यानंतरही सुरबानानांनी दि.०६-०१-१९३९ रोजी आपल्या शेतकरी बांधवांना



**कोर्टात महत्वाची साक्ष**

महाडच्या चवदार तळेसंदर्भात ते सार्वजनिक आहे नाही हे ठरविण्यासाठी कोर्टात न्यायालयीन लढा सुरू झाला. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमोर ते तळे सार्वजनिक आहे, असे सिद्ध करण्याचे एक मोठे आव्हान उभे ठाकले होते; पण हेही आव्हान सुरेंद्र टिपणीस यांनी पुन्हा मोठा कुशलतेने उचलेले होते. चवदार तळे हे खाजगी नसून सरकारी आहे, याचा पुरावा सरकारच्या मिलिटरी इंजिनिअरिंग खात्यातर्फे सरकारने चवदार तळ्यातील गाळ उपसण्यास मंजूर केलेले ५०० रु. त्या खाती खर्च का झाले नाहीत, याची कारणे देताना त्या अहवालात म्हटले होते, की महाडात पटकीच्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याकारणाने चवदार तळ्यातील गाळ उपसण्यास मजूर उपलब्ध झाले नाहीत. सबब ५०० रु.ची रक्कम सरकारी तिजोरीत परत अदा करीत आहे. अशा आशयाचा अहवाल असलेले एक सरकारी पुस्तक कोर्टात हजर केले. हे सरकारी पुस्तक मुंबईच्या ओल्ड सिक्रेटरीएटमधील त्यांचे मित्र पा.रा. देशपांडे यांच्याकडून मिळविले होते. हीच साक्ष कोर्टात महत्त्वाची ठरली. ज्यामुळे कोर्टाने चवदार तळे सार्वजनिक असल्याचा निर्णय दिला होता.

स्फूर्तिदायक संदेश पाठविला. तो असा, की तुमची सेवा करीत असताना कायद्याच्या कक्षेत पकडून काँग्रेस सरकारने मला तुरुंगात टाकले आहे; परंतु तुरुंगवासाला यापूर्वीसुद्धा कधीच भ्यालो नाही व आताही भिणार नाही. शेतकऱ्यांची सेवा हेच माझे कार्य आहे व तेच मी निर्भयपणे आमरण करीत राहणार.

सुरबानाना आपल्या आयुष्यात सतत अन्यायाविरुद्ध लढत होते. एखाद्या दलित व्यक्तीवर अन्याय झाला असे त्यांना कळले, तर त्यांचा त्रागा विचारायलाच नको. ज्याचा कुणी दाता नाही त्यांचा दाता सुरबानानाच होते. आपल्यासमोर कोण आहे किंवा किती बलाढ्य शक्ती आहे याचा ते कधीच विचार करीत नसत. आक्रमकता हा त्यांच्या जीवनाचा स्थाईभाव होता. त्यामुळेच आलिबाग (रायगड) परिसरात ते तानाजी व बाजीप्रभू या दोन नावांनी ओळखले जात होते.

सुरेंद्र टिपणीसांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातही सहभाग घेतला होता. लढले होते. ते या लढ्यात एस.एम. जोशी, आचार्य अत्रे, अमर शेख, कॉ. अमृत डांगे यांच्या बरोबरीचे एक बिनीचे सरदार म्हणून लढत होते. यासंदर्भात एस.एम. जोशी असे म्हणतात, की 'संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या वेळी एक महत्त्वाची गोष्ट घडून आली ती म्हणजे, मराठी जनतेची चार सर्वसामान्य दैवते होती (छत्रपती शिवाजी महाराज, म. फुले, लो. टिळक आणि डॉ. आंबेडकर) संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात या सर्वांच्या विचारांना प्रेरक मानून सर्व मराठी जनतेला एकत्र बांधले गेले होते. त्यांचे बरेचसे श्रेय सुरेंद्र टिपणीस यांनाच द्यावे लागते.

**सुरेंद्र टिपणीसांची अर्थिक स्थिती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

१९३९-४० हे वर्ष आर्थिकदृष्ट्या मोठे खडतर होते. संपूर्ण जग दुसऱ्या महायुद्धामुळे आर्थिक मंदीच्या लाटेत ओढले गेले होते. त्याचा परिणाम तत्कालीन कोकणावरही झाला होता. सुरेंद्र टिपणीसांना आपल्या भावंडांची जबाबदारी पेलून आर्थिक परिस्थितीशी झुंज द्यावी लागली होती. शेतीमालाला मातीमोल किंमत, अनेक कोर्टातले खटले, ब्रिटिशांचा शेतसारा या सर्व गरजा भागवताना सुरबानाना यांना गावच्या शेठसावकारांकडे आपले शेत व 'गोविंद निवास' गहाण ठेवून चक्रवाढ व्याजाने कर्ज काढावे लागले होते. आपल्या अर्थिक परिस्थितीविषयी अ.वि. चित्रे यांना पाठवलेल्या पत्रात सुरबानाना लिहीतात, की 'ईर्षेने विशिष्ट मनाची पताका खांद्यावर धारण केल्याने १९२० सालापासून आजतागायत कोर्टकचेरी, समाजकार्य, गरिबांना मदत या सर्व बाबींचा परिणाम म्हणजे माझे आजचे कुटुंब घासलेट नसल्याने चार-चार दिवस मुलांनी अभ्यासाशिवाय काढले. कोणीच मदत केली नाही. शेवटी लाखू गुरवामार्फत वशिला लावून वीस रुपयांचा माल उधार मिळवला. गरीब स्वतंत्र मजूर पक्षाचे काम करताना आजवर कशाचीही अपेक्षा केली नाही. पक्षाचे थोडेफार पैसे माझ्याकडे आहेत, त्याची आठवण मनाला असह्य वेदना करते. सर्व प्रकारे मन दुबळे झाले आहे. म्हणून मुंबईस येऊ शकत नाही. अ.वि. चित्रे यांनी त्यांना मुंबईला बोलावले होते; पण आपल्या अर्थिक परिस्थितीमुळे ते मुंबईला जाऊ शकले नाहीत. अशाही परिस्थितीत डॉ. आंबेडकर व सुरबानाना यांनी आपल्या संबंधात किंचितही फरक येऊ दिला नाही. कोर्टाच्या कामासाठी जेव्हा-जेव्हा महाडला येत असत ते सुरबानानांकडेच 'गोविंद निवासतच' थांबत असत.

### नवीन पक्ष काढण्यासंदर्भात चर्चा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९५२ मध्ये कायदेमंत्री असताना त्यांना हृदयविकाराच्या आजाराने नायर रुग्णालयात दाखल केल्याचे कळताच सुरबानाना आपली प्रकृती बरी नसतानाही डॉ. आंबेडकरांना भेटण्यासाठी महाडातून मुंबईला आले होते. हिंदू कोड बिलावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर नवीन पक्ष काढण्याच्या विचारात होते. तेव्हा सुरबानाना, श्रीपाद अमृत डांगे, एस.एम. जोशी, प्र.के. अत्रे, माधवराव बागल या दिग्गज मंडळींना दिल्लीला घेऊन गेले होते. यावेळी डॉ. आंबेडकरांनी यांच्याशी नवीन पक्ष काढण्यासंदर्भात चर्चा केली होती.

सुरबानानांच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव डॉ. आबेडकरांच्या लक्षात येत असे. तरीही सुरबानाना डॉ. आबेडकरांचे आगतस्वागत करण्यात कुठेच कमी पडले नाहीत. त्यांची सरबराई अगदी चोख करीत असत. डॉ. आंबेडकरांच्या जेव्हा ही आर्थिक बाब लक्षात आली तेव्हा ते सुरबानानांना म्हणाले, की ''सुरबा काही गोष्टी मनात ठेवून चालत नाहीत. मला आणि माझ्या समाजाला साथ देताना तुला फार दिव्यातून जावे लागत आहे. याची मला कल्पना आहे. हे बघ सुरबा महायुद्धाचा काळ आहे. जगभर मंदीची लाट पसरली आहे. त्याची झळ सगळ्यांनाच बसत आहे. परिस्थिती स्थिरस्थावर होईपर्यंत थोडे दिवस नोकरी कर. मुंबईच्या आकाशवाणी केंद्राचे संचालक माझे चांगले मित्र आहेत. तिथे शिकलेल्या माणसांची गरज आहे. मी त्यांच्याकडे तुझ्याविषयी शब्द टाकतो.'' तेव्हा सुरबानानांनी डॉ. आंबेडकरांच्या सल्ल्यास अनुकूलता दर्शविली. तेव्हा मुलाखतीला जाण्यासाठी डॉ. आबेडकरांनी आपला सूट सुरबानानांना दिला होता. आपल्या सहकाऱ्याची संकटात कशी काळजी घ्यावी, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. सुरबानाना मुलाखत देऊन आकाशवाणी केंद्रात रुजू झाले तेव्हा अ.वि. चित्रे यांना बोलावून घेऊन त्यांची राहण्याची व्यवस्था करावयास सांगितले. तेव्हा अ.वि. चित्रेंनी त्यांची राहण्याची व्यवस्था माटुंगा पश्चिम भागातील अग्रवाल नगरमध्ये केली.

२० जुलै १९४२ रोजी डॉ. आंबेडकरांच्या ब्रिटिश सरकारच्या मध्यवर्ती मंत्रिमंडळात समावेश झाला. तेव्हा डॉ. आंबेडकर दिल्लीला जाताना निरोप देण्यासाठी सुरबानानांचे संपूर्ण कुटुंब मुंबईला आले होते. यावेळी डॉ. आंबेडकरांनी सुरबानानांच्या संपूर्ण कुटुंबीयांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. १९४३ साली डॉ. आंबेडकर मंत्री झाल्यानंतर प्रथमत: ते महाडला येत होते. तेव्हा सुरबानानांनी आपली आर्थिक परिस्थिती नसतानाही आपले घर नीटनिटके सजवले होते व आपली गोविंद निवासात टिपणीस व चित्रे घराण्यातर्फे मोठ्या जल्लोशात स्वागत व सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना डॉ. आंबेडकर म्हणाले, की 'या भूमीतल्या सहकार्यांनी जीवाचे रान करून मला माझ्या समाजकार्यात मोलाची मदत केली.' असा कृतज्ञापूर्वक उल्लेख केला होता.

नंतरच्या काळात सुरबानानांनी नोकरीचा राजीनामा दिला. कारण त्यांना समाजकार्याची ओढ स्वस्थ बसू देत नव्हती. यावेळी डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाचे नाव बदलून 'श्येड्यूल्ड



कास्ट फेडरेशन' असे केल्याने काही दलितेतर सहकाऱ्यांना त्यात काम करण्यास संकुचितपणा वाटल्याने काही दलितेतर सहकाऱ्यांनी काँग्रेस पक्षात तर काहींनी प्रजा समाजवादी पक्षात प्रवेश केला होता. सुरबानाना व त्यांचे मित्र नाना पुरोहित आणि मो.वा. दोंदे यांच्यासह प्रजासमाजवादी पक्षात सामील झाले; परंतु त्यांच्यात वैयक्तिक व कौटुंबिक पातळीवरील स्नेह यत्किंचितही कमी झाला नव्हता.

**...आणि एक धडधडती मशाल शांत झाली**

सुरबानाना टिपणीस यांचा पिंड एकाच ठिकाणी शांत बसणारा नव्हता. ते प्रजा समाजवादी पक्षातून समाजवादी पक्षात डांगे-जोशी यांच्यासोबत काम करू लागले. १९५७ च्या निवडणुकीत ते या पक्षाकडून विधिमंडळात आमदार म्हणूनही निवडून आले; पण नंतर जनता पक्षात स्थिरावले. यांचे राजकीय मंच बदलत असले तरी त्यांनी त्यांचे समाजकार्य अव्याहतपणे चालू ठेवले होते; परंतु नियतीला हे मान्य नव्हते; पण पक्षाचे काम आटोपून पुणे-विन्हेर बसने प्रवास करीत असताना त्यांच्या बसला अपघात होऊन त्यांचा मृत्यू झाला आणि एक धडधडती मशाल शांत झाली.

थोडक्यात, आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत सुरबानाना आपल्या प्रतिज्ञेला जागले. विषमतेने पिचलेल्या समाजातील वर्णवादाने माखलेला माणूस, माणुसकी विसरून गोठ्यातील जनावरालाही लाजवू पाहत होता. हे पाहून कोकणातल्या डोंगरकपारीत पायाला भिंगरी लावून सुरबानाना हिंडले आणि माणसातील माणुसकी जागी करण्यासाठी ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सामाजिक समतेसाठी धडपडत राहिले.

एकूणच सुरेंद्र टिपणीस यांचा समाजप्रवाहाविरुद्ध जाणारा प्रत्येक लढा हा स्वार्थनिरपेक्ष होता. त्यांचे नेतृत्व आणि कर्तृत्व हे अन्याय दूर करण्यासाठीच होते. त्यांच्या अंगी व्यक्तिगत स्वार्थाचा लवलेश कुठेच नव्हता. लढायचे, झुंजायचे, न्याय मिळवायचा आणि जगाचे भले पाहायचे या एकाच स्वप्नाच्या पूर्तीसाठी त्यांनी आपला जीवनयज्ञ धगधगता ठेवला होता. दलित जीवनाचा उद्धार हे एकमेव ध्येयच त्या जीवाला माहीत होते.


**● महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा खऱ्या अर्थाने 'मानवमुक्तीचा लढा' होता. या लढ्यातील सुरेंद्र टिपणीसांची कामगिरी ही अनेकदृष्ट्या अमरकहाणी ठरली आहे. या लढ्याचे नेतृत्वच त्यांच्याकडे होते. भाई चित्रे, आर.बी. मोरे, का.वि. सवादकर ही झुंजार मंडळी या लढ्यातील त्यांची साथी होती.**

**डॉ. आंबेडकरांचे एकनिष्ठ सहकारी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महाड नगर परिषदेने मानपत्र देऊन सत्कार केला असता, त्या सत्काराला उत्तर देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, की 'मला आज मानपत्र देऊन आपण जो माझा सत्कार केलात त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे. कारण गेल्या पंधरा वर्षांत मी जे सार्वजनिक कार्य करीत आहे, त्याचा उगम महाडातच झालेला आहे. येथेच मला स्फूर्ती मिळाली व याच शहरात माझ्या कार्यात सहकारी मिळाले नसते, तर माझे कार्य यशस्वी झाले नसते. त्यांच्या या उद्गारात सुरबानानांचे विशेषत्व सामावलेले आहे. सुरबानानांचे व्यक्तिमत्व मुळात लढाऊ, कणखर व जिद्दीचे होतेच; पण स्वत:च्या मताला ठाम चिकटून राहणारे एखादे तत्त्व आणण्यासाठी निकराची धडपड करणारे, त्याबद्दल जगाची पर्वा न बाळगणारे होते. सुरबानानांचे मन असे होते, की 'आपल्या समाजाला लागलेला अस्पृश्यतेचा कलंक पुसल्याशिवाय समाजाच्या स्वातंत्र्यांच्या आणि समतेच्या सर्व कल्पना निरर्थक आहेत, असा उल्लेख एस.एम. जोशींनी साधनाच्या ८ जुलै १९७८ च्या 'दलितांचे लढाऊ कैवारी' या लेखात सुरबानाना टिपणीस यांच्या कार्याचा गौरव करताना केला होता. थोडक्यात, स्वत:च्या विचारांना जे पटले तेच करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुरबानाना एकनिष्ठ सहकारी होते.

•••

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत)**




# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि 'भारतीय रुपया'ची समस्या

**भारतात केंद्र व राज्याचे वित्तीय (आर्थिक) संबंध सुस्थितीत राहण्यासाठी वित्त आयोगाची स्थापना झाली आहे. यामागील एक मोठी प्रेरणा म्हणजे आंबेडकरांचे हे संशोधन आहे. आजपर्यंत जवळपास १५ वित्त आयोगांची निर्मिती होऊनसुद्धा केंद्र व राज्यांचे वित्तीय संबंध आजही समाधानकारक नाहीतच. आजही केंद्र व महाराष्ट्र राज्यांसारख्या अनेक राज्यांशी जी.एस.टी.च्या वाटा सोपविण्याबाबत संबंध ताणलेच जात आहेत.**



**डॉ. गौतम खुशालराव कांबळे**

महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण विभागांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समितीने त्यांच्या अर्थशास्त्रीय प्रबंधाचा सहावा खंड १० ऑक्टोबर १९८० ला प्रकाशित केला. या ग्रंथाचे संपादक तत्कालीन सदस्य सचिव स्मृतिशेष वसंत मून होते. या खंडाचा आकार सुमारे सातशे पृष्ठांचा आहे. या खंडाचा अनुवाद मराठीमध्ये डॉ. विजय कविमंडन यांनी, तर त्याचे पर्यवेक्षन प्रा. डॉ. मधुकर कासारे या अर्थतज्ज्ञांनी केले. हा अनुवादित खंड समितीने २०२१ मध्ये प्रकाशित केला. या ग्रंथाचा अनुक्रम- 'ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी' पृ. ५ ते ५०, 'द इव्हॉल्युशन ऑफ प्रोव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' पृ. ५१ ते ३१४, 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' पृ. ३१५ ते ६२० हे ग्रंथ समाविष्ट आहेत. याशिवाय 'द प्रेझेंट प्रॉब्लेम इन इंडियन करंसी' पृ. ६७० ते ६८२ हे दोन शोधनिबंध संकलित केले आहेत. याचबरोबर 'करंसी अँड एक्स्चेंज' व इतर परिशिष्टे व आंबेडकरांची प्रस्तावनासुद्धा समाविष्ट आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'द इव्हॉल्युशन ऑफ प्रोव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' म्हणजेच 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेची उत्क्रांती' हा ग्रंथ त्यांच्या पीएच. डी.चा शोधप्रबंध होता. त्यांचे मार्गदर्शक अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातील विश्वविख्यात अर्थशास्त्रज्ञ, अर्थशास्त्राचे सुविख्यात प्राध्यापक व समाजवादाकडे कल असलेले, कामगार संस्थांशी निगडित असलेले एडविन आर.ए. सेलिग्मन हे होते. हा ग्रंथ १९२५ मध्ये 'किंग अँड सन' या ग्रेट ब्रिटनमधील प्रकाशनाने मुद्रित केला तेव्हा डॉ. आंबेडकर 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी', 'कास्टस् इन इंडिया' व 'स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अँड देअर रेमिडीज' या त्या वेळच्या तीन बहुचर्चित ग्रंथांचे प्रख्यात लेखक म्हणून केवळ आपल्या चौतिसाव्या वर्षी स्थापित झाले होते, हे विशेष. या ग्रंथात त्यांनी १८३३ ते १९२१ या कालखंडातील ब्रिटिश भारतातील केंद्रीय व प्रांतिक स्तरावरील

आर्थिक संबंधांचा वेध घेतला. त्यात त्यांनी भारतासारख्या गरीब देशातील करपद्धतीवर काही निश्चित अशा मर्यादांची गरज स्पष्ट केली आणि ब्रिटिश भारतातील केंद्र व राज्य सरकारांमधील आर्थिक संबंध सुरळीत राहण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली, जी वर्तमान परिस्थितीतसुद्धा उपयुक्त ठरू शकतात. त्यांनी या ग्रंथात १८३३ ते १८७१ या काळात ब्रिटिश सरकारच्या दोषपूर्ण राजकोषीय धोरणामुळे हे धोरण अयशस्वी झाले, असे नमूद केले, तसेच त्यातील आघातपूर्ण करव्यवस्था व अनुत्पादक खर्चाच्या दोषांमुळे ते भारतीयांना अधिक जाचक झाले, यावर दृष्टिक्षेप टाकला. डॉ. आंबेडकरांनी या ग्रंथात सार्वजनिक वित्त (फायनान्स) हे ब्रिटिश भारतात किंवा आधुनिक भारतातसुद्धा समाजाच्या पर्याप्त कल्याणासाठीच वापरले जावेत, यावर भर दिला. स्वतंत्र भारतातील वित्त आयोगाच्या बऱ्याच यशस्वी अहवालांवर डॉ. आंबेडकरांच्या या दिशादर्शक चेतनेचे पडसाद उमटलेले दिसतात. आज भारतातील नवउदारमतवादी भांडवलशाही असलेल्या १९९१ पासूनच्या जागतिकीकरणाच्या आवर्तनातसुद्धा आंबेडकरांच्या या 'समाजाच्या पर्याप्त कल्याणाचे' आर्थिक तत्त्व सार्वजनिक वित्ताचा वापर करताना लक्षात ठेवण्याची त्या काळापेक्षाही अधिक गरज असल्याचे जाणवते. १९२६ मध्ये आंबेडकरांच्या या ग्रंथावर लॉर्ड जे.एम. केन्स व डी.एच. मॅग्रिगोर या अर्थशास्त्रातील विश्वविख्यात मानल्या गेलेल्या अर्थशास्त्रज्ञांनी संपादित केलेल्या 'द जर्नल ऑफ द रॉयल इकॉनॉमिक सोसायटी' या जर्नलमध्ये डब्ल्यू.एच. थॅचर या प्रख्यात अर्थशास्त्रज्ञाने प्रभावी भाष्य केले होते.

भारतात केंद्र व राज्याचे वित्तीय (आर्थिक) संबंध सुस्थितीत राहण्यासाठी वित्त आयोगाची स्थापना झाली आहे. यामागील एक मोठी प्रेरणा म्हणजे आंबेडकरांचे हे संशोधन आहे. आजपर्यंत जवळपास १५ वित्त आयोगांची निर्मिती होऊनसुद्धा केंद्र व राज्यांचे वित्तीय संबंध आजही समाधानकारक नाहीतच. आजही केंद्र व महाराष्ट्र राज्यांसारख्या अनेक राज्यांशी जी.एस.टी. च्या वाटा सोपविण्याबाबत संबंध ताणलेच जात आहेत. अशा स्थितीत आंबेडकरांचे 'सुदृढ वित्त व्यवस्थेसाठी सुदृढ शासन' हे तत्त्व धोरणाच्या दृष्टीने उपयुक्त ठरते. १९९० मध्ये देश विदेशी विनिमयाच्या तुटवड्यात अडकला, तर १९९० नंतर तो कर्जाच्या सापळ्यात अडकता अडकता वाचला. हे सुदृढ वित्त व्यवहारांचे लक्षण निश्चितच नाही. वित्त व्यवस्थेच्या निरोगीपणासाठी आंबेडकरांनी एक मौलिक तत्त्व सांगितले होते; ते म्हणजे, खर्चामध्ये कपात आणि उत्पन्नात वाढ. याचा अर्थ– अनुत्पादक खर्च कमी करावेत आणि करांशिवायच्या इतर उत्पन्नात वाढ करावी. भारतात मात्र याच्या नेमके उलट केले जात आहे. परिणामतः देशात आज महागाई व बेरोजगारी दोन्ही वेगाने वाढत असून, त्या देशातील प्रमुख समस्या होत आहेत व त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे हेच सुदृढ शासनाचा भाग समजला जात आहे. अशा वेळी आंबेडकरांच्या या प्रबंधाची वर्तमानकाळातील प्रासंगिकता स्वीकारण्याची गरज आहे.

**ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्त व्यवहार :**

हा शोधनिबंध त्यांनी कोलंबिया विद्यापीठात त्यांच्या एम.ए. या पदवीसाठी सादर केला होता. या शोधनिबंधात आंबेडकरांनी भारतातील ईस्ट इंडिया कंपनीच्या वित्तव्यवहारांची दारुण अवस्था स्पष्ट केली आहे. आपल्या मतांच्या समर्थनार्थ त्यांनी भरपूर आकडेवारी व क्षेत्रातील तज्ज्ञांची मते यांचे भरपूर संदर्भ दिले आहेत. ईस्ट इंडिया कंपनीच्या कार्यकाळात प्रशासनाप्रमाणेच आर्थिक व्यवहारांमध्येही आत्यंतिक केंद्रीकरण करण्यात झाले होते. या कारभाराबाबत ब्रिटिश सरकारचे धोरण दुटप्पीपणाचे व स्वार्थी होते, असा आंबेडकरांचा निष्कर्ष होता. एकीकडे भारतात या कंपनीचे जे शासन होते त्याचे फायदे तर ब्रिटिशांना हवे होते; पण त्यासोबत कुठलाही भार किंवा हानी मात्र नको होती. कंपनीचे उत्पन्नविषयक, खर्चविषयक किंवा कर्जविषयक, असे कोणतेही व्यवहार भारताच्या हिताचे नव्हते, तर ते इंग्लंडच्याच फायद्याचे होते. म्हणून आर्थिक दृष्टीने या कंपनीच्या (ब्रिटिश) शासनाने भारताचे शोषणच केले, या निष्कर्षावर आंबेडकर येतात. मात्र, आर्थिकेतर क्षेत्रातील ब्रिटिशांच्या योगदानाचा योग्य उल्लेखही आंबेडकरांनी जाणीवपूर्वक केला आहे.

आज वर्तमानकाळात जगातील बहुतेक विकसनशील देशांमध्ये प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या मोठमोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचा वावर फार मोठ्या प्रमाणात वाढत आहे, भविष्यातही वाढणारच आहे. अशा स्थितीत आर्थिक दृष्टीने हा वावर नेमक्या कुणाच्या फायद्याचा राहील व कोणत्या देशाला नुकसानीचा राहील, याचे समर्पक भाष्य करण्याची आंबेडकरांच्या या छोट्या निबंधात पुरेपूर क्षमता आहे.

**रुपयाचा प्रश्न : उद्‍गम आणि उपाय**

हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'ला १९२३ मध्ये डी.एस.सी. पदवीकरिता सादर केला होता. त्यांचे मार्गदर्शक जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ एडवीन कॅनन हे होते. त्यांनी या ग्रंथासाठी लिहिलेल्या प्रस्तावनेत डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या काही विचारांशी आपण सहमत नसल्याचे लिहिले; परंतु डॉ. आंबेडकरांनी आपली भूमिका स्पष्ट करताना जगातील खालच्या स्तरावरील माणूस हाच आपल्या निष्कर्षांचा आधार आहे, असे विचार या ग्रंथात नमूद केले होते. या ग्रंथात त्यांच्या सखोल अध्ययनातून येणारा स्वतत्त्वाचा आग्रह व ते मत मांडताना येणारी निर्भयता यांचे वारंवार दर्शन होते. हा ग्रंथ एक अतिशय श्रेष्ठ दर्जाचा प्रबंध आहे. त्या काळात रुपयाच्या मूल्याची घट का होत होती, त्यासंदर्भात तत्कालीन सरकारची कारणमीमांसा व उपाययोजना नेमकी कशी विरुद्ध होती व रुपयाचे मूल्य सावरण्यासाठी काय करणे आवश्यक होते, याचा शोध घेणारे विश्लेषण या ग्रंथात आंबेडकरांनी केले. संपूर्ण जगामध्ये देवाणघेवाणीसाठी एकच चलन (करंसी) असावे, भारतातील रुपयाची उत्क्रांती सुवर्ण प्रमापाच्या आधारावर व्हावी, असे विचार त्यांनी या ग्रंथात मांडले. सन १८०० ते १८९३ या काळात रुपयाच्या माध्यमाने उभे झालेले आर्थिक संकट सुवर्ण प्रमाप पद्धतीच्या आधारे निस्तारले जाऊ शकत होते. त्यामुळे देशात अस्तित्वात असलेल्या मुद्रा चलन पद्धतीला सुवर्ण प्रमापाचाच आधार अधिक संयुक्तिक ठरतो, असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकर त्याकाळी संपूर्ण जगाचे आर्थिक सूत्रसंचालन करीत असलेल्या लॉर्ड केन्सच्या सुवर्ण विनिमय प्रमापाशी मुळीच सहमत नव्हते. त्यांच्या मते, या चलन पद्धतीमध्ये काळ्या पैशाची (Black Money) समांतर व्यवस्था तुलनात्मकदृष्ट्या सहजपणे उभी केली जाऊ शकते.

नफ्यासाठी महागाई अनिर्बंधपणे वाढविता येते व भ्रष्टाचार हा सहजपणे समाजाचा स्वभाव होऊ शकतो. यातून आर्थिक असमानता अधिक वेगाने वाढत जातात. केन्सप्रणीत सुवर्ण विनिमय प्रमापाच्या पद्धतीमुळे अतिरिक्त पैसा निर्माण होण्याची शक्यता असल्याने अदृश्य स्थिती सदृश्य स्थितीत बदलण्याची शक्यता असते. केन्सने आपल्या 'इंडियन करंसी अँड फायनान्स' या ग्रंथात भविष्यात 'सुवर्ण विनिमय प्रमाप' हा फायदेशीर राहील, असे म्हटले होते. त्यावर आंबेडकरांनी या ग्रंथात व पुढे प्रसंगानुरूप प्रचंड टीका केल्याचे आढळते. केन्सच्या आर्थिक विचारांवर टीका करणारे डॉ. आंबेडकर अर्थशास्त्रीय बुद्धिवंत म्हणून एकमात्र होते, हे नमूद करणे महत्त्वाचे आहे. या ग्रंथात त्यांनी सांख्यिकीशास्त्र व गणिताचा आवर्जून केलेला वापर अद्भुत व चिंतनीय आहे. केन्सने सुवर्ण प्रमाप हे निसर्गाच्या चक्रावर आधारित असल्याने ते एक अत्यंत कठीण व कठोर तत्त्व असल्याचे मानले. जेव्हा की सुवर्ण विनिमय प्रमापात कठोरता सैल करण्याचे तंत्र अनुस्यूत असल्याने ते स्वीकारण्याचा सल्ला दिला. आंबेडकरांनी यावर प्रतिवाद करताना, देशात सरकारची केंद्रीय बँकेसारखी अधिकार असलेली आर्थिक नियंत्रक (Regulatery) संस्था सुवर्ण प्रमापाची ही कठोरता आर्थिक प्रवाहात बदलण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडू शकते, असे या ग्रंथात प्रभावीपणे मांडले. या ग्रंथातील त्यांच्या विश्लेषणाचा आधार नंतर रिझर्व्ह बँकेच्या निर्मितीसाठी घेण्यात आला, हा त्यानंतरचा इतिहास आहे. सार्वजनिक वित्त व राजनीतिक अर्थव्यवस्था या अर्थशास्त्रातील मूलभूत शाखांचे ते गणमान्य बुद्धिवंत म्हणून याच ग्रंथाद्वारे मान्यताप्राप्त झालेत. ब्रिटिश भारतात भेडसावणाऱ्या आर्थिक प्रश्नांचा त्यांनी सखोल अभ्यास केला व त्यावरील प्रभावी उपायही सांगितलेत, जे आजच्या जटिल व गुंतागुंतीच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचीसुद्धा प्रचंड क्षमता ठेवतात. स्वतंत्र भारताची 'स्वयंशासित देश' म्हणून प्रतिमा उंचावण्यात त्यातील संघटित समाज महत्त्वाचा असतो. तो आंबेडकरांच्या आर्थिक चिंतनातून उभा झाल्याचा हा ग्रंथ पुरावा आहे. भारताच्या मुद्राबाजारासंबंधी त्यांनी केलेले विश्लेषण आज बहुअंशाने खरे ठरताना दिसत आहे, जे या ग्रंथात नमूद आहे.





भारतामध्ये आजपर्यंत अनुत्तरित राहिलेल्या महागाई, बेरोजगारी, दारिद्र्य व भ्रष्टाचार या मूलभूत समस्यांविषयीची कारणमीमांसा व उपाय, धोरणे इत्यादीविषयी त्यांनी सखोलपणे मांडलेले प्रभावी चिंतन तर आज अधिक दुर्लक्षित झाले आहे, तेसुद्धा या ग्रंथात समाविष्ट आहे. आज या समस्या सार्वत्रिक झाल्याने त्या आपल्याही देशात 'सामान्य' झाल्या आहेत, असा समज अर्थशास्त्रज्ञांपासून तर राजकीय नेतृत्वांपर्यंत व कष्टकऱ्यांपासून तर सामान्य मतदारांपर्यंत सर्वांचा झाला आहे. या समस्यांवरील उपाय योग्य आर्थिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीत व त्यासाठी आवश्यक असलेल्या राजकीय इच्छाशक्तीत आहे, असे बाबासाहेबांचा हाच ग्रंथ सांगतो. चांगल्या हुंडीबाजाराचे रूपांतर चलनामध्ये व्हावे, हा त्यांचा विचार नंतर १८२ दिवसांची ट्रेझरी विपत्रे, आंतरअधिकोषीय सहभाग प्रमाणपत्रे, वाणिज्य ठेवी या माध्यमांच्या रूपाने पुढे आला. त्यांनासुद्धा याच ग्रंथाचा आधार आहे.

या खंडातील ग्रंथाचे महत्त्व स्पष्ट करताना इतिहासातील एक एक महत्त्वपूर्ण घटना नमूद करणे आवश्यक आहे. १५ डिसेंबर १९२५ ला रॉयल कमिशनसमोर डॉ. आंबेडकरांनी साक्ष दिली. हे कमिशन भारतासाठी चलन धोरण निश्चित करणे व अस्तित्वात असलेल्या रुपयाच्या माध्यमाने आर्थिक स्थैर्य स्थापित करणे, यासाठी भारतात आले होते. डॉ. आंबेडकरांनी या कमिशनसमोर दिलेली साक्ष यासाठी क्रांतिकारी मानली जाते, की देशात त्यावेळी प्रचलित असलेली सुवर्ण विनिमय प्रमाप पद्धती कशी प्रभावहीन व अनुपयुक्त आहे, हे त्यांनी कमिशनमधील बारा आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त तज्ज्ञांना प्रभावीपणे पटवून दिले. दुसरे महत्त्वाचे, त्यापैकी बहुतांश सदस्यांजवळ डॉ. आंबेडकरांचा 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' हा ग्रंथा होता व तिसरे, त्यावेळी डॉ. आंबेडकर हे केवळ ३४ वर्षांचे सर्वाधिक तरूण अर्थशास्त्रज्ञ होते.

या ग्रंथात आंबेडकरांनी ब्रिटिशांवर टीका करताना नमूद केले, की ब्रिटिशांनी भारतातील रुपया व त्यांचा पौंड यांच्या विनिमयासंबंधीचा व्यापारशेष अशा रीतीने अनुकूल केला, की त्यातून ब्रिटिशांचा 'नफा' निरंतर वाढतच जाईल. रुपयाच्या माध्यमातून त्यांनी भारतीयांचे अव्याहतपणे शोषणच केले. आज 'आर्थिक सुधारा'च्या जागतिकीकरणात विकसित-श्रीमंत राष्ट्रेदेखील तेच करीत आहेत. अशावेळी आंबेडकरांच्या चिंतनाची आठवण येणे अपरिहार्य ठरते.

•••

**(लेखक सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत.)**



# मेरे मन पंछी रे तेरा भवसागर में डेरा!



बी.जी. वाघ

जगातल्या महान पुरुषांचा अंतदेखील भव्य सूर्यासारखाच असतो. त्याचे तेज सौंदर्य अवर्णनीय असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शेवटचा प्रवास, शेवटचे काही तास, त्यांचे स्वीय सचिव नानकचंद रत्तू यांनी हळुवारपणे टिपलेले आहेत. मृत्यूचा प्रवास तसा शोकात्मच. महान पुरुषाचा अंत तर समाजासाठी, राष्ट्रासाठी अत्यंत भयव्याकूळ करणारा असतो. डॉ. आंबेडकरही वेगळ्याच भाव समाधीत होते. त्यांचे धर्मांतर जगभर गाजत होते. अडीच हजार वर्षांनंतर त्यांनी धर्मचक्रपरिवर्तन घडवून आणले होते. त्याचे अपूर्व समाधान त्यांच्या मनात होते. त्याचप्रमाणे आपल्या मृत्यूनंतर दलितांची, शोषितांची सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती काय राहील, याविषयीची तीव्र चिंताही त्यांच्या मनात होती. त्यांची प्रकृती ठीक नव्हती. मृत्यूची चाहूल त्यांना लागलेली होती. मृत्यू त्यांच्यासमोर उभा होता. तशा परिस्थितीतही १५ नोव्हेंबर १९५६ रोजी ते काठमांडू येथे जागतिक धम्म परिषदेस हजर राहिले. त्यांनी बुद्ध आणि कार्ल मार्क्सवर भाषणही केले. ते जागतिक पातळीवर गाजलेही. जग एक दुःखमय वस्तुस्थिती आहे, हे सांगणारा बुद्धच होता. त्याने दुःखाची कारणेही सांगितली. मार्क्सने ते भौतिक इतिहासाचा अर्थ लावून खाजगी मालकी हेच दुःखाचे कारण सांगितले. बुद्धाने माणसाची 'तृष्णा' त्याचे अज्ञान, अज्ञानमूलक धर्म व त्यातून निर्माण झालेली धर्मसत्ता, अशी अनेक कारणे सांगितली. आर्थिक, सामाजिक व धार्मिक पिळवणुकीचे कारण धर्मसत्ताच होती. तिचे बलस्थान सामान्य माणसाचे अज्ञानच होते. बुद्धाने जगाला बौद्धिक, नैतिक व आध्यात्मिक स्वातंत्र्य दिले. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरामागेदेखील हे एक महत्त्वाचे कारण होते. काठमांडूहून परत येताना जागतिक बौद्ध धर्मस्थळांना त्यांनी भेटी दिल्या. बुद्धाचा मृत्यू होऊन अडीच हजार वर्षे झाली होती. त्यामुळे बुद्ध गयेला मोठा कार्यक्रम होता. त्यासाठी दलाई लामा आले होते. त्यांचा सत्कारही डॉ. आंबेडकरांनी केला. २ डिसेंबरला स्वतः आजारी असतानाही ते आपल्या माळ्याच्या घरी गेले. तो गंभीर आजारी होता. आपल्या मृत्यूनंतर आपल्या वृद्ध पत्नीचे काय होईल, म्हणून शोक करू लागला. रात्रीची वेळ होती. डॉ. आंबेडकर कंदील घेऊन त्याच्या घरी गेले. तो आपल्या मालकाला पाहून माळी अधिकच गहिवरला. त्याला मृत्यूचे भय वाटत होते. डॉ. आंबेडकर म्हणाले, मी मृत्यूला घाबरत नाही, तो केव्हाही येतो! रात्री बुद्ध आणि कार्ल मार्क्स ग्रंथाचे शेवटचे प्रकरण लिहिले. ४ डिसेंबरला ते राज्यसभेत थोळा काळ हजर होते. ती त्यांची अखेरची भेट होती. संध्याकाळी त्यांनी प्र.के. अत्रे, जोशींना पत्रे लिहिली. त्यांच्या प्रस्तावित रिपब्लिकन पक्षाच्या ध्येयधोरणाविषयी ते अनेकांशी चर्चा करीत होते. आधुनिक भारताचे एक भव्य स्वप्न त्यांच्या डोळ्यासमोर



होते. ५ डिसेंबरला ते सकाळी लवकर उठले. दुपारी डॉ. सविता कबीर बाजारात गेल्या, त्या लवकर आल्या नाहीत म्हणून ते चिडले होते. मृत्यू आधीची ती भव्य संध्याकाळ. तिचा प्रत्येक क्षण महत्त्वाचा होता. डॉ. आंबेडकरांनी डोळे मिटून घेतले होते. नानकचंद रत्तू त्यांच्या पायांची मालिश करत होते. ते मंद स्वरात 'बुद्ध सरणम गच्छामी'चे गाणे म्हणत होते. त्यांचे ते तन्मयतेने तालासुरात गाणे म्हणणे आर्श्चकारकच होते. रात्र चढत गेली. ते जेवणासाठी उठले. त्यांना भूक नव्हतीच. त्यांची पावले अभ्यासिकेकडे वळली. तो ग्रंथसंसार त्यांच्या कायम आनंदाचा स्रोत होता. त्यांनी सर्व पुस्तकांवर प्रेमाने हात फिरवला. डोळे भरून ते पुस्तकांकडे पाहत होते. आता हे मित्र परत दिसणार नाहीत, याची जाणीव त्यांना झाली होती. थोडे खाल्ल्यावर ते उठले. परत अभ्यासिकेकडे आले. 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या पुस्तकाच्या प्रस्तावनेवर त्यांनी शेवटचा हात फिरवला. कबीरांचे ते प्रसिद्ध गीत त्यांच्या ओठी आले. कबीर त्यांचा गुरूच. त्यांचे घराणे कबीरपंथीयच. त्या गाण्यातली आर्तता, विरह, व्याकूळता शब्दाशब्दांतून पाझरत होती –

**मेरे मन पंछी रे तेरा भवसागर में डेरा**
**जनम मरण से कहाँ छुटकारा**
**सुख दुखसे कैसा छुटकारा**
**नदीयाँ के संग संग चले किनारा**
**चलते जाना तुझे रातदिन**
**कोई न जाने दुख तेरा**
**मेरे मन पंछी रे तेरा भवसागर में डेरा**
**ओढ ले चल उठ अपनी चदरिया**
**जाना है दूर साई की नगरिया**
**दूर गगन मे सूरज ढलता**
**उतरने लगा अंधियारा**
**दुख से बनती जावे है काया**
**अब तक ना पाव्हणा लेने आया**
**कैसे आऊँ महल तुम्हारे**
**तुम्हे देवताओ ने घेरा!!**

सकाळी ते लवकर उठले नाहीत. ते शांतपणे पहुडले होते. डॉ. सवितामाई आंबेडकरांनी त्यांना उठविण्याचा प्रयत्न केला; परंतु तो 'हंस अकेला' केव्हाच दूर सागरावर निघून गेला होता. जन्म–मरणापासून कोणाची सुटका झाली आहे. कबीराप्रमाणेच एका महान ज्ञानी माणसाचा अंत झाला होता. कबीराने धर्मव्यवस्थेला आव्हान दिले होते. त्याच्या या महान प्रज्ञावंत शिष्याने आपल्या कर्माने, प्रज्ञा, शील, करुणेने एका बुद्धयुगास सुरुवात केली होती. बरोबर अडीच हजार वर्षांपूर्वी बुद्धाचे महानिर्वाण झाले होते. डॉ. आंबेडकरांचे महानिर्वाण असाच एक अपूर्व असा ऐतिहासिक योगायोगच होता.

•••

(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)



# भारत 'तटस्थ'! का, कशासाठी?

**जगातील समस्त धनदांडगे अभिजन-महाजन राज्यकर्ते त्यांच्या जनतेस वेठीस धरून जागतिक शासनशकट चालवत आहेत. खुद्द रशियामध्ये हजारो नागरिक दडपशाही झुगारून रस्त्यावर येऊन युक्रेनवरील हल्ल्याचा निषेध करत आहेत. मात्र, चीनचे जिनपिंग, भारताचे मोदी संयुक्त राष्ट्रात तटस्थ (?) राहून कुणाची साथ देत आहेत?**



**प्रा. एच. एम. देसरडा**

रशियाने युक्रेनवर केलेले चौफेर आक्रमण मानवजातीच्या इतिहासावर बहुआयामी परिणाम करणारी घटना आहे. आजच्या महावेगाने वैश्विकृत होणाऱ्या उत्पादन, उपभोग, सेवा-सुविधांच्या महाजाळ्यात अवघे जग किती परस्परावलंबी, पराधीन, पंगू होऊ शकते याचा प्रत्यय काही दिवसांतच जगभरातील प्रत्येक लहानमोठा देश, कदाचित दरएक व्यक्तीला येऊ लागला आहे. इंधन तेलाचेच नव्हे, तर खाद्यतेल, रासायनिक खते, लोखंड व अन्य धातूंचे भाव सैन्याच्या हल्ल्यांबरोबरच भडकले. रशिया युरोपीय देशांना ४० टक्के तेल व वायूइंधन पुरवतो. भारत निम्मी संरक्षणसामग्री, शस्त्रास्त्रे रशियाकडून आयात करतो. अर्थात, यात देशाचे संरक्षण कमी व खरेदीचे कमिशन हाच मोठा गहन 'अर्थ' मामला आहे... युक्रेन सुर्यफूलाचे तेल, गहू व अन्य वस्तू असंख्य देशांना पुरवते. खेरीज दोन्ही देशांत तुलनेने कमी खर्चात 'डॉक्टर' बनवण्याचे यंत्रतंत्र आहे. त्यामुळे तर 'मागास' मराठवाड्यासह भारताच्या अनेक राज्ये व जिल्ह्यांतील हजारो विद्यार्थी तिकडे अडकल्यामुळे थेट बातम्या जिल्हा, तालुका वृत्तपत्रांत झळकत आहेत. कर्नाटकातील विद्यार्थ्यांचा रशियन शस्त्रहल्ल्यात हकनाक बळी गेला...

भारतातील शेअर बाजार, पेट्रोलियम पदार्थ, सोने, खाद्यतेल, लोखंड इत्यादी सर्व मोक्याचे अर्थव्यवहार अस्थिर व पुरवठा अनिश्चित होत असून भाववाढ अटळ आहे. या वेगवान घडामोडीत आयात-निर्यात, व्यापार, उत्पादनव्यवस्था भूराजनीतिक आडाखे आणि सुरक्षाव्यवस्था यांच्या संचयी व चक्राकार प्रभावामुळे मोदी सरकारने संयुक्त राष्ट्राच्या बैठकीत 'तटस्थ' भूमिका घेतली असा अध्याऱ्हत राजकीय तर्क आहे. होय, ट्रम्प, पुतिन व तत्सम अन्य नेते हे सर्व मोदीजींचे खास मित्र मानले जातात! म्हणूनच युक्रेनच्या राष्ट्राध्यक्षाने 'कोरडी सहानुभूती, खंत अगर चिंता व्यक्त न करता पुतिनच्या पाशवी तावडीतून सुटकेसाठी ठोस भूमिका घ्या,' असे पंतप्रधान मोदी व अन्य जागतिक नेत्यांना स्पष्ट शब्दात सांगितले... खचितच हा मानवतेवरील अत्यंत कट्टर हल्ला असून हिटलर व स्टॅलिनच्या वंशसंहाराची ही भीषण पुनरावृत्ती होय...

**प्रगती झाली, पण शहाणपण कुठंय?**

रशिया-युक्रेन युद्धासंदर्भात एक बाब जी प्रकर्षाने जागतिक चव्हाट्यावर आली आहे, ती म्हणजे, जग सांप्रतकाळी १० लाख कोटी डॉलरपेक्षा (७५० लाख कोटी रुपये, भारताच्या राष्ट्रीय

उत्पन्नाच्या चौपट) अधिक संसाधने. जीडीपी शस्त्रास्त्रनिर्मिती, राष्ट्रीय सुरक्षा, गटतटांची नाटोसारखी सुरक्षा संघटना, अंतर्गत सुरक्षा, निमलष्करी पोलीस व्यवस्थेवर खर्च करते. (वाचा, बरबाद करते) संतापजनक दृश्य आहे हे रणगाड्यांचा, क्षेपणास्त्रांचा अन्यसंहारक शस्त्राचा जो नंगानाच आपण उघड्या डोळ्यांनी २०२२ साली बघत आहोत तो खचितच मानव वसुंधरेविरुद्ध महागुन्हाच म्हटला पाहिजे. ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाचा अचाट वाढविस्तार, सुखसमृद्धीनंतर समाजाचे सामूहिक शहाणपण उंचावले नाही हे कटू सत्य आहे...

दोन महायुद्धांनंतर जगात जो हिंसाचार, वंशसंहार झाला, त्यानंतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्र (यूएन) व त्याच्या अनेक संलग्न संस्थांनी 'युद्धाविना जग भुकेविना मानव' अशी व्यवस्था उभी करण्याचा संकल्प घेतला. त्याला आता नव्याने नवऊर्जा देण्याचे आव्हान आ वासून उभे आहे. या संदर्भात या एक भयावह ऐतिहासिक वास्तवाची आवर्जून नोंद घेतली पाहिजे, की २० वे शतक हे महाभीषण हिंसेचे शतक होते. हिटलरचा नाझीवाद व स्टॅलिनची हुकुमशाही हे दोन्ही मानव इतिहासावरील महाकलंक आहेत, ही बाब वादातीत! मात्र, सोबतच हे विसरता कामा नये, की फ्रेंच राज्यक्रांतीनंतर उदयास आलेली उदारमतवादी लोकशाहीव्यवस्था आणि त्यांनी पुरस्कृत केलेली मुक्त बाजारवादी व्यवस्था ही अतिमानवकेंद्री (ॲन्थ्रपोसँट्रिक) बनून निसर्गाला कच्च्या मालाचे कोठार समजून मानवाच्या इंद्रियसुखासाठी, वासनांच्या पूर्तीसाठी निर्ममपणे ओरबाडणे हाच तर पुरूषार्थ मानला आहे. परिणामी ४६० कोटी वर्षात उत्क्रांत झालेल्या बहुआयामी वसुंधरेला उण्यापुऱ्या गत दोन-अडीचशे वर्षात जर्जर केले आहे.



**राजकीय व्यवस्थांची बांडगुळी प्यादी**

अघोरी लालसा, हावहव्यासापोटी संसाधने बळकावण्याची पाशवी स्पर्धा बेभान झाली. त्यातूनच सरंजामशाही, भांडवलशाही, साम्राज्यशाही, साम्यवादशाही या विविध नामाभिधानांच्या सामाजिक-आर्थिक-राजकीय व्यवस्था पोसल्या गेल्या. खरं तर, आजही त्या पोसण्यासाठीच जागतिक राजकीय बलाढ्य औद्योगिक-आर्थिक रचना कार्यरत आहेत. राजकीय नेते हे या राक्षसी व्यवस्थांचे बांडगुळी प्यादी आहेत. कितीही अप्रिय वाटले तरी हेच भीषण सत्तासंपत्तीशस्त्रास्त्र माफिया आज जगावर सर्वव्यापी हुकुमत गाजवून जात-धर्म-वंश-लिंग या अनादिकालापासून चालवलेल्या सामाजिक-सांस्कृतिक विभाजनाला सांप्रतकाळी चलती असलेल्या राष्ट्रवादाला त्या-त्या विभाजन श्रेणीसोबत कलम करून, देशभक्तीचा मुलामा चढवत अवघे जग एक महाबाजार बनवला गेला आहे. अमेरिका, चीन, रशिया, जपान, भारतासह काही निवडक देशांतील शंभरेक बड्या कंपन्या व त्यांचे कर्तेधर्ते जगावर हावी झाले आहेत. सामान्य जनता या महाबाजारातील केवळ ग्राहक, श्रमिक, मतदार संख्याबळ आहे. राज्यकर्त्यांसाठी ते आहेत मतदार, तर कंपन्यांसाठी

## भारत कुणाची साथ देतोय?

खरं तर, रशियाच्या या उद्दाम हल्ल्याचे कूळमूळ नीट समजावून घेणे नितांत गरजेचे आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जगात अनेक असे प्रकार झाले. अमेरिकेने इराक बेचिराख करण्यासाठी ज्या सबबी सांगितल्या, तशाच धाटणीचे व तेवढे महाभयानक हे पुतिनकांड आहे, यात तीळमात्र शंका नाही. तथापि, संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेनंतरच्या आठ दशकांत जगाची जी भूराजकीय वस्तुस्थिती आहे, ती लक्षात घेता संसाधने बळकावण्याचा हा नववसाहतवाद, नवसाम्राज्यवाद असून हे प्रकरण आता भांडवलशाही आणि साम्यवाद या आजवरच्या राजकीय विभागणीपलिकडे गेले आहे. जगातील समस्त धनदांडगे अभिजन-महाजन राज्यकर्ते त्यांच्या बहुसंख्य जनतेस वेठीस धरून हे जागतिक शासनशकट चालवत आहेत. या संदर्भात अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे, खुद्द रशियामध्ये हजारो नागरिक दडपशाही झुगारून रस्त्यावर येऊन युक्रेनवरील हल्ल्याचा निषेध करत आहेत. मात्र, चीनचे जिनपिंग, भारताचे मोदी संयुक्त राष्ट्रात तटस्थ (!) राहून कुणाची व कशाची साथ देत आहेत?

हवामानअरिष्ट व कोरोना महामारीने मानवजातीला एक नि:संदिग्ध इशारा दिला आहे, तो म्हणजे, निरर्थक वाढवृद्धीला तत्काळ सोडचिठ्ठी देऊन जगाने समतामूलक शाश्वत विकासाचा मार्ग जाणीवपूर्वक अखत्यार केला पाहिजे, अन्यथा कोळसा, तेल व वायू या जीवाश्म इंधनांवर आधारलेली ऊर्जा, वाहतूक, शेती व औद्योगिक उत्पादनपद्धती व चैनचंगळवादी जीवनशैली वसुंधरेचा व मानवाचा घात करील. तात्पर्य, जीवाश्म इंधन, घातक रसायने, अन्य संसाधनांचे अतिदोहन यामुळे विषारी वायूंचे उत्सर्जन वाढून मानवाचे जगणे, श्वास घेणे अधिकच जीवघेणे होईल. आजच हवा, पाणी, अन्न सर्व काही कमालीचे प्रदूषित व विषाक्त झाले असून ही उत्पादनपद्धती आणि विकासप्रणाली सर्व काही नेस्तनाबूत करेल!

ग्राहक. हीच त्यांची सत्ताधीशांना उपयुक्तता आहे. नागरिक म्हणून हक्क मागितले, की दमछाक करायला व्यवस्थेचा सांगाडा आहेच दिमतीला (पोलीस, सैन्य, प्रशासन, न्यायालये इत्यादी). रशिया व चीन हे तर बोलूनचालून एकाधिकारशाहीवालेच आहेत. मात्र, औपचारिक लोकशाही व्यवस्था मानणारे, सकृत्दर्शनी स्वतंत्र व स्वायत्त देश हेसुद्धा केंद्रीय धनसत्तेचे अंकित आहेत. आजही अमेरिकेसह बहुसंख्य विकसित देशांत लष्करी औद्योगिक संकुले (मिल्टरी इंडस्ट्रीयल कॉम्पलेक्सेस) म्हणजेच शस्त्रास्त्रउत्पादक, बॅंका



व वित्तीय अधिसत्ता, जमीनजुमला, बांधकाम (रिअल इस्टेट) या एक टक्क्याहून कमी लोकांकडे सर्व सत्ता केंद्रित आहे. चीन व रशियात जिनपिंग-पुतीन हे सत्ताधीश सर्व काही नियंत्रित करतात. भारतात मोदी-शहांमार्फत नवभांडवली घराणे अदानी-अंबानी आणि जुने उद्योजक टाटा, बिर्ला इत्यादी सर्व काही ठरवितात. पेट्रोलियम पदार्थ, लोखंड, सिमेंट, औषधे, मोटारवाहने, विमाने एवढेच काय, भव्यदिव्य दवाखाने, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे सर्व काही यांच्याच अखत्यारित व अधिपत्याखाली आहेत. उपर्निर्दिष्ट विवेचन विश्लेषणाचा युक्तीवाद सर्व काही सरकारी असावे अथवा सरकारने करावे असा अजिबात नाही.

**मानव समाजासमोर सर्वोच्च आव्हान**

समाजजनवादी शासनव्यवस्थेने (निरंकुश सरकार व बाजाराऐवजी) हे बहुपदरी राष्ट्रउभारणीचे काम ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाच्या साह्याने विकेंद्रितपणे लोकांच्या सक्रिय सहभाग व सामूहिक ऊर्जेद्वारे केले, तरच हिंसा, शोषण, प्रदूषण, विध्वंस टळेल. आज युक्रेनमध्ये जे होत आहे, तेच कमीअधिक फरकाने चीन, भारत व अन्य कुठल्याही देशांत केव्हाही होऊ शकते. राज्यकर्त्यांना व धनदांडग्यांना युद्ध, आक्रमण हे त्यांच्या तुंबड्या भरण्यासाठी कायम हवेच असते. हा व्यापक परिप्रेक्ष्य समोर ठेवून संयुक्त राष्ट्रसंघटनेची सत्त्वर आमूलाग्र फेररचना होणे नितांत गरजेचे आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या बरबादीनंतर महत्प्रयासाने उभ्या केलेल्या संयुक्त राष्ट्राच्या रचनेस आता २१ व्या शतकाच्या समस्यांना समर्थपणे सामोरे जाऊ शकेल, अशी जागतिक नियमन, नियंत्रण संरचना जाणीवपूर्वक उभी करणे हे आज मानव समाजासमोरील सर्वोच्च आव्हान आहे.

२०२२ साली ही बाब आता सूर्यप्रकाशाइतकी सत्य आहे, की हवामानबदलाचे दररोज उग्र व व्यापक होणारे धोके टाळण्यासाठी शून्य उत्सर्जनाचे उद्दिष्ट ५० वर्षानंतर (मोदीजींच्या ग्लासगो वायद्याप्रमाणे) नव्हे, तर येत्या दोन दशकांतच साध्य करावे लागेल. यासाठी आर्थिक वाढवृद्धीची पागलदौड तत्काळ थांबवून जीवाश्म इंधनाला प्रामुख्याने पेट्रोलियम पदार्थांना आजच कठोरपणे अव्हेरले पाहिजे. आता जगाच्या सत्ताधीशांचा सर्व खटाटोप कोळसा, तेलवायू गोरखधंदा ऐनकेनप्रकारे रेटत राहणे हा आहे. त्यामुळेच तर भारत रशियावर निर्बंध लावू इच्छित नाही. खरं तर, जर्मनीएवढी कठोर भूमिका सर्वांनी घेतली तर पुतीनची झिंग उतरायला वेळ लागणार नाही. मुख्य म्हणजे, आज प्रत्येक देश व व्यक्तीने निसर्गाविषयी पूज्यभाव, हिंसा व शोषणमुक्तीचा इमानदारीने संकल्प करणे हाच कायमस्वरुपी उपाय आहे. होय, खनिज तेलच नव्हे, तर कोळसा व वायूदेखील सर्वांना हवा आहे. अन्य खनिजे, धातू, रसायने हेदेखील हवेच आहे. हे अर्थ-राजकीय हितसंबंध फार बलशाली असून त्यांना निष्प्रभ करण्यासाठी जगभरच्या निसर्गवादी व मानवतावादी शक्तींची प्रभावी एकजूट हाच पर्याय आहे.

**निसर्गकेंद्री जीवनशैलीचा अंगिकार अनिवार्य**

प्रचलित गर्तेतून बाहेर पडण्यासाठी विकासाची पर्यायी दिशादृष्टी ठोस स्वरूपात जागतिक मंचावर मांडून त्याचा पाठपुरावा करण्यासाठी लोकअभियान राबवावे लागेल, जनजागरण करावे लागेल. विशेषत: पर्यायी विकासप्रणाली, निसर्गकेंद्री जीवनशैली हाच तातडीचा जागतिक सामाजिक अंजेडा असावयास हवा. संयुक्त राष्ट्राच्या प्रयत्न व पुढाकाराने आजवर अनेक प्रश्नांवर जागतिक विचारमंथनच नव्हे कृतीकार्यक्रम ठरले आहेत. उदाहरणार्थ, शाश्वत विकास उदिष्टे (एसडीजी). अर्थात, आता प्रकर्षाने ते साध्य करण्याचे पर्यायी मार्ग, विशेषत: ऊर्जास्रोत, तंत्रज्ञान व सामाजिक-आर्थिक उपक्रम उपलब्ध आहेत. मुख्य म्हणजे ते स्वस्त, जलद व सुरक्षित आहेत. तात्पर्य, संसाधने आहेत, पण गरज आहे ती राजकीय इच्छाशक्तीची! त्यासाठी लोकशक्तीचा प्रचंड दबाव लागतो.

सारांश, यापुढे मानव समाजाची दिशादृष्टी 'परिस्थितिकी संस्कृती' (इकॉलॉजिकल सिव्हीलायझेशन) उभी करण्याची असली पाहिजे. परिस्थितिकी (इकॉलॉजी) हा २१ व्या शतकाचा युगधर्म असून तो परिप्रेक्ष्य समोर ठेवून सत्त्वर जगातील सर्व संहारक शस्त्रास्त्रांचे उत्पादन, खरेदी-विक्री आणि अर्थात वापर शून्यावर आणण्यासाठी हिंसामुक्त, शोषणमुक्त जगासाठी शिक्षण, तंत्रज्ञान व विकास संकल्पना, संसाधनांची नव्याने फेरजुळवणी केली तरच हे साध्य करता येईल. त्या दृष्टीने युक्रेनवरील आक्रमण जगाच्या इतिहासाला कलाटणी देणारे तथ्य म्हणून युद्ध व हिंसामुक्तीचे साधन बनवता येईल का? होय, नक्कीच. गरज आहे कृतीसंकल्प, सामूहिक कृतीची...

**(लेखक महात्मा गांधी मिशन विद्यापीठात सुप्रतिष्ठ प्राध्यापक असून महाराष्ट्र नियोजन मंडळाचे माजी सदस्य आहेत.)**

# भटके विमुक्तांची सद्य:स्थिती, आव्हाने व उपाययोजना

**अज्ञान, अंधश्रद्धा, जुन्या रूढी परंपरांचे जोखड, शिक्षणाचा अभाव, बेरोजगारी, सत्तेत सहभाग न मिळणे म्हणजेच निर्णय प्रक्रियेत सहभाग नसणे, जे काही थोडेबहुत नेते आहेत ते येथील व्यवस्थेच्या, सत्ताधाऱ्यांच्या दावणीला सामाजाशी गद्दारी करून स्वार्थासाठी लाचार झालेले आहेत आणि सत्ताधारी वर्गाची मानसिकतासुद्धा केवळ या समाजाला वंचित ठेवण्यातच आहे. या प्रमुख कारणामुळे भटके-विमुक्त समाजाचा विकास झाला नाही. हा समाज अद्यापही विकासाच्या मुख्य प्रवाहात आला नाही.**



**ॲड. डॉ. अरुण हौसराव जाधव**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला. मात्र, याच भारत देशामध्ये राहणारा अठरा पगड जातींमधील भटके विमुक्त समाज ३१ ऑगस्ट १९५२ रोजी खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला. त्यामुळे भटके विमुक्तांचा स्वातंत्र्य दिन ३१ ऑगस्ट १९५२ हाच समजला जातो. कारण भारत स्वतंत्र झाल्यानंतरही स्वतंत्र भारत देशातील भटके विमुक्त समाज मात्र पारतंत्र्यात अत्यंत हलाखीचे आणि गुलामीचे जीवन जगत होता. कोंडवाड्यात जनावरे जसे कोंडावीत तशा पद्धतीने भटके विमुक्त समाजाला सेटलमेंट (तारेचे कुंपण)मध्ये कैद करून ठेवण्यात आले होते. स्वतंत्र भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू जेव्हा सोलापूरला आले होते. तेव्हा त्यांनी सेटलमेंटचे तारेचे कुंपण तोडून भटक्या विमुक्तांची मुक्तता केली.

मात्र, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जेव्हा कायदेमंत्री होते, तेव्हा त्यांनी सर्वप्रथम गुन्हेगार जमात कायदा रद्द करणारा ठराव संसदेत मांडला होता. त्यानंतर सर्वानुमते हा कायदा पास होऊन १९५२ साली तो रद्द झाला. त्यापूर्वी म्हणजे १८७१ साली ब्रिटिशांनी गुन्हेगारी जमात कायदा केलेला होता आणि तेव्हापासून कैकाडी, भामटा, मांग, गारुडी, वडार, कंजारभाट, छप्पर बंद, टकारी, पारधी या जाती-जमातींमधील लोकांना या सेटलमेंटमध्ये ठेवण्यात आले होते.

३१ ऑगस्ट १९५२ मध्ये भटक्या विमुक्तांना स्वातंत्र्य मिळाले खरे. मात्र, त्यानंतरच्या गेल्या ७० वर्षांत भटके विमुक्त समाज अद्यापही प्रगती करू शकला नाही. त्याची अनेक कारणे आहेत. त्यावर थोडक्यात का होईना चर्चा होणे गरजेचे आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, जुन्या रूढी परंपरांचे जोखड, शिक्षणाचा अभाव, बेरोजगारी, सत्तेत सहभाग न मिळणे म्हणजेच निर्णय प्रक्रियेत सहभाग नसणे, जे काही थोडेबहुत नेते आहेत ते येथील व्यवस्थेच्या, सत्ताधाऱ्यांच्या दावणीला सामाजाशी गद्दारी करून स्वार्थासाठी लाचार झालेले आहेत आणि सत्ताधारी वर्गाची मानसिकतासुद्धा केवळ या समाजाला वंचित ठेवण्यातच आहे. या प्रमुख कारणामुळे भटके-विमुक्त समाजाचा



विकास झाला नाही. हा समाज अद्यापही विकासाच्या मुख्य प्रवाहात आला नाही, असे आपल्याला म्हणता येईल.

१८७१ साली ब्रिटिशांनी केलेल्या गुन्हेगारी जमात कायद्याने भटक्या विमुक्त समाजातील पारधी, भिल्ल, कैकाडी, वडार, कोल्हाटी, मांगगारुडी अशा अनेक जाती-जमातींना गुन्हेगारीचा कलंक दिला. त्यामुळे सेटलमेंटमधून त्यांची मुक्तता झाली तरी इतर समाजाने त्यांना स्वीकारले नाही. त्यांच्यामध्ये पारंपरिक पद्धतीने असलेली कला-कौशल्ये यांचा उपयोग त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी किंवा रोजगार मिळविण्यासाठी झाला नाही, तर ती कला-कौशल्ये दाखवून त्यांच्या वाट्याला भिकाऱ्यांचे जिणे आले. त्यामुळे त्यांना समाजात पैसा, प्रतिष्ठा, मान, सन्मान मिळाला नाही. एवढेच काय तर एक माणूस म्हणून जगण्याचे स्वातंत्र्यदेखील त्यांना मिळाले नाही. उदा. पारधी, भिल्ल (शिकार), कोल्हाटी (नृत्य, गायन, कसरत), कैकाडी (टोपले विणणे), नंदीवाला (नंदी बैलाचा खेळ), मदारी (माकडांचा खेळ), गारुडी (सापांचा खेळ), दरवेशी (अस्वलांचा खेळ), डोंबारी, गोपाळ, सय्यद (कसरतीचे खेळ), म्हसनजोगी, रायरंद, बहुरूपी (मनोरंजन), वडार (दगडामधील कलाकुसर), बंजारा, लमाण (कोळसा पाडणे) असे छोटे उद्योग-व्यवसाय व कलेवर गुजराण करीत होते; परंतु ब्रिटिशकालीन व त्यानंतर भारत सरकारने केलेल्या विविध कायद्यांमुळे त्यांच्या उपजीविकेची साधने व पारंपरिक व्यवसायावर गंडांतर आले. त्यामुळे भटक्या-विमुक्तांची अवस्था 'ना घर का, ना घाट का' अशी झाली.

वन्यजीव संरक्षण प्रतिबंधक कायद्यामुळे शिकार व प्राण्यांच्या खेळांवर बंदी आली. वन विभागाच्या बंधनामुळे लाकूड तोडणे, डिंक, मध, कंद-मुळे, औषधी वनस्पती गोळा करण्यावर बंदी आली. टीव्ही, मोबाइल, इंटरनेट, चित्रपट यामुळे लोककला सादर करून उपजीविका करणाऱ्या लोककलावंत असलेल्या विविध जाती-जमाती संकटात सापडल्या. म्हणजेच जुलमी कायद्यामुळे भटक्या-विमुक्तांची उपजीविकेची साधने हिरावून घेतली गेली. पारंपरिक व्यवसायच संपुष्टात आल्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांच्यावर भटकंती करण्याची वेळ आली. सततच्या भटकंतीमुळे त्यांचे शिक्षण, रोजगार, आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले. भटके विमुक्तांच्या आर्थिक विकासासाठी डॉ. के.बी. आंत्रोळकर समिती (१९४९- महाराष्ट्र शासन) एल.बी. धाडे समिती (१९६० - महाराष्ट्र शासन), पी.के. मिश्रा (१९७१ भारत सरकार) भिकुदास इधाते समिती (१९९७- महाराष्ट्र शासन) व बाळ कृष्ण रेणके आयोग (२००६), असे अनेक आयोग नेमले. या आयोगांनी भटक्या-विमुक्तांच्या विविध प्रश्नांचा अभ्यास करून सरकारकडे विविध शिफारशी केल्या; परंतु विविध आयोगांनी केलेल्या शिफारसी केवळ कागदावरच राहिल्या. केवळ कागदी घोडे नाचवले गेले, घोषणांचा पाऊस पडला; परंतु प्रत्यक्षात मात्र भटक्या-विमुक्तांच्या हिताच्या दृष्टीने कुठल्याही निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे भटक्या-विमुक्तांच्या पदरी घोर निराशा पडली. त्यामुळे भटके-विमुक्त समाज अधिक गलित गात्र झाला.

भटके विमुक्तांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी घोषित झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी का झाली नाही? याचा



विचार केला, तर अनेक कारणे पुढे आली. त्यामध्ये वेगवेगळ्या कालावधीमध्ये सत्तेवर आलेली विविध विचारसरणीची सरकारे, भटक्या विमुक्तांच्या संघटनांची झालेली शकले. त्यांच्यामधील विचारधारांची फारकत, सत्तेचे पद मिळविण्यासाठी भटके विमुक्त समाजाच्या पुढाऱ्यांनी वेठीस धरलेला भटके विमुक्त समाज, त्यांची झालेली ससेहोलपट आणि आपल्या हक्कांसाठी जाब विचारणाऱ्या विविध संघटनांच्या कौशल्याचा अभाव, अज्ञान यामुळे भटके विमुक्त आजही विकासाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकले नाहीत. १९९० च्या नंतर आलेले खाजगीकारण, उदारीकरण, जागतिकीकरणाचे धोरण आणि भांडवली अर्थव्यवस्था, समाजाची व्यसनाधीनता, अंधश्रद्धा, अज्ञान हीसुद्धा प्रमुख कारणे आहेत. अलीकडच्या काळात प्रत्येक जाती-जमातीभोवती केंद्रित झालेले राजकारण, सत्ताकारण हे घटकदेखील तितकेच कारणीभूत आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

राज्यातील व देशातील बदलती राजकीय परिस्थिती पाहता यापुढील काळात खरोखर कल्याणकारी राज्य येईल किंवा एखादा मसिहा येईल आणि आपले सगळे प्रश्न सुटतील, असे होणार नाही, तर भटक्या-विमुक्तांनी पुन्हा एकदा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या शिका, संघटित व्हा व आपल्या विकासासाठी संघर्ष करा, हा मूलमंत्र आत्मसात करण्याची गरज आहे. आपले प्रश्न आपणच सोडवू शकतो. त्यासाठी आपणच पुढे आले पाहिजे, तरच भटक्या-विमुक्तांच्या जीवनामध्ये विकासाची पहाट उगवू शकते.

भटके-विमुक्तांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक कल्याणकारी योजनांच्या घोषणा झाल्या; परंतु त्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही, हे मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. भटके-विमुक्तांच्या मुला-मुलींना मोफत शिक्षण, वसतिगृह, शिष्यवृत्ती, प्रशिक्षण, रोजगाराभिमुख प्रशिक्षण दिले पाहिजे. विविध कला-



कौशल्यांवर आधारित व्यवसायाभिमुख प्रशिक्षण दिले, तर भटके विमुक्त समाजदेखील उद्योजक होऊ शकतील, चांगली नोकरी करू शकतील. त्यांना जगण्याची साधने उपलब्ध होतील व ते स्वावलंबी बनतील. भटके-विमुक्तांसाठी घोषित झालेल्या यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेची अद्यापही महाराष्ट्रात कुठेही प्रभावीपणे अंमलबजावणी झालेली दिसत नाही. आदिवासी बांधवांसाठी असलेली शबरी घरकुल योजना, पारधी विकास आराखडा यांसारख्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी सरकारने भटके-विमुक्त समाजातील सामाजिक कार्यकर्ते व स्वयंसेवी संस्थांना सोबत घेऊन काम केले पाहिजे. राज्य व केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पामध्ये भरघोस निधीची तरतूद केली पाहिजे, तसेच भटक्या विमुक्तांसाठी असलेला निधी ऐनवेळी इतरत्र वळवणे थांबले पाहिजे.

भटके-विमुक्तांनीही या देशात व राज्यातील सर्व क्षेत्रांतील आपले हक्क व आपला वाटा लोकशाही मार्गाने मिळवला पाहिजे आणि खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण व सक्षम झाले पाहिजे. भटक्या-विमुक्त समाजातील महिलांनी मोठ्या प्रमाणावर शिक्षण घेतले पाहिजे. आपल्या आवडत्या क्षेत्रात शिक्षण, प्रशिक्षण घेतल्यास त्याही स्वयंपूर्ण होतील. भटक्या-विमुक्त समाजातील मुली व महिलांच्या शिक्षण व रोजगारासाठी राज्य व केंद्र सरकारने चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. भटके-विमुक्त समाजातील महिलांसाठी स्वतंत्रपणे आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून लाभ मिळवून दिला पाहिजे आणि त्यासाठी आधी महिलांनी घराबाहेर पडले पाहिजे.

**विविध समित्यांच्या शिफारशी**

**१) डॉ. डी.के. आंत्रोळकर समिती :-** भटके-विमुक्त यांना मागासवर्गीयांपेक्षा जास्त सुविधा द्याव्यात. उद्योग व रोजगारासाठी प्रोत्साहन द्यावे. प्राथमिक शिक्षण कायद्याची कडक अंमलबजावणी करावी. विद्यार्थ्यांना दूध, पुस्तके व कपडे द्यावी. रात्रशाळा सुरू कराव्यात, शिष्यवृत्ती द्यावी, रेल्वे व सरकारी संस्थेत पाच टक्के राखीव जागा ठेवाव्यात. औद्योगिक प्रशिक्षण व कर्ज उपलब्ध करून द्यावे. महिलांना विणकाम, शिवणकाम, नक्षीकामाचे प्रशिक्षण द्यावे. घरे बांधण्यासाठी जागा व निधी द्यावा. जातपंचायत नष्ट करावी. नैतिक शिक्षण द्यावे.

**२) एल.बी. थाडे समिती :-** गोंधळी, वासुदेव, चित्रकथी, डवरी गोसावी, जोशी या जातींना भिक्षा मागण्यासाठी प्रतिबंध करावा. भराडी, पांगुळ, सरोदे या जातींना गाई-म्हशींसाठी गायरान उपलब्ध करून द्यावे. घिसाडी, शिकलगार यांना व्यवसायासाठी आर्थिक साहाय्य करावे. माकडवाला, नंदीवाला, डोंबारी, खेळकरी या भटक्या जमातीच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करावेत.

**३) भि.रा. इदाते समिती :-** भटके-विमुक्त जाती-जमातींसाठी मंत्रालयात स्वतंत्र विभाग निर्माण करावा. स्वतंत्र जनगणना करावी. जातीचे दाखले त्वरित द्यावेत. गायरान व शासकीय जमिनी भटके-विमुक्त यांना हस्तांतरित कराव्यात. भटके-विमुक्तांवर होणाऱ्या खर्चाचा अनुशेष भरून काढावा. शासनाच्या विविध संस्थांमध्ये लोकप्रतिनिधी नेमावेत. आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना विद्यावेतन, शिष्यवृत्ती द्यावी. आश्रमशाळा सुरू कराव्यात. वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळाचे भाग भांडवल वाढवावे. भटक्यांच्या वस्तीत वीज, पिण्याचे पाणी, गटार योजना, शौचालय, अंतर्गत रस्ते इत्यादी सुविधा पुरवाव्यात.

**४) रेणके आयोग :-** भटक्यांचा सर्व्हे करावा. लोकसंख्या निश्चित करावी. कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करावी. जात वैधता समिती रद्द करावी. भटके विमुक्तांच्या वस्त्यांमध्ये जात प्रमाणपत्रे द्यावीत. दारिद्र्यरेषेचे ओळखपत्र, रेशन कार्ड, निवडणूक ओळखपत्र द्यावे. इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर घरकुल योजना राबवावी, इत्यादी शिफारसी करण्यात आल्या होत्या; परंतु यापैकी २५ टक्केदेखील शिफारशींची पूर्णतः अंमलबजावणी राज्यात झालेली नाही. भटके-विमुक्तांची नव्याने जनगणना करावी. लोकसंख्येच्या प्रमाणात प्रत्येक क्षेत्रात आरक्षण द्यावे. भटक्या-विमुक्तांच्या विकासासाठी राज्य व केंद्र सरकारच्या अर्थ संकल्पामध्ये भरीव आर्थिक निधीची तरतूद करावी. •••

**(लेखक आदिवासी, भटके विमुक्त समाजाचे राज्य स्तरावरती सक्रिय कार्यकर्ते व ग्रामीण विकास केंद्र, जामखेडचे संस्थापक अध्यक्ष आहेत.)**

# डॉ. आंबेडकरांचे लोकसंख्या धोरण सदासर्वकाळ महत्वाचे

**(महाराष्ट्राचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या 'Ambedkar Population Policy - Contemporary Relevance' या ग्रंथाचे मुख्यमंत्री मा. उद्धव ठाकरे यांच्या हस्ते दि. १७ एप्रिल २०२२ रोजी नागपूर येथे प्रकाशन होत आहे. त्यानिमित्ताने.......**

**डॉ. प्रदीप आगलावे**


महाराष्ट्राचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांचा 'Ambedkar Population Policy Contemporary Relevance' हा संशोधनपर ग्रंथ आहे. हा ग्रंथ त्यांच्या पीएच.डी.च्या संशोधनावर आधारित आहे. आज सर्वत्र अधिक लोकसंख्येची समस्या ही एक अतिशय गंभीर समस्या बनली आहे. चीन, भारत आणि इतर देशांपुढे अधिक लोकसंख्येच्या समस्येने अतिशय भीषण स्वरूप धारण केले आहे.

शंभर वर्षांपूर्वी आपल्या देशात लोकसंख्येची समस्या नव्हती. १९२१ हे वर्ष भारतीय लोकसंख्येच्यादृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. कारण १९२१ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या कमी झाली होती. १९११ मध्ये भारताची लोकसंख्या २५ कोटी २० लाख होती, तर १९२१ मध्ये भारताची लोकसंख्या २५ कोटी १३ लाख होती, यावरून हे स्पष्ट होते, की १९११ ते १९२१ या दहा वर्षांत भारताची लोकसंख्या ७ लाखाने कमी झाली होती; परंतु १९२१ पासून भारतातील लोकसंख्या कधीच कमी झाली नाही, उलट ती सतत वाढत आहे. त्यामुळे लोकसंख्येची एक गंभीर समस्या निर्माण झाली.

**जन्मदर नियंत्रणाबाबत डॉ. आंबेडकर यांचे बिल**

१९४० च्या दशकात भारतात आजच्यासारखी अधिक लोकसंख्येची समस्या नव्हती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'इनडिपेंडंट लेबर पार्टीचा (Independant Labour Party) जाहीरनामा १५ ऑगस्ट १९३६ रोजी जाहीर केला होता. या जाहीरनाम्यात डॉ. आंबेडकरांनी कृषीवर लोकसंख्येचा प्रचंड ताण आहे. जास्त लोकसंख्या हेच भारतातील दारिद्र्याचे मुख्य कारण असल्याचे स्पष्ट केले होते.

मुंबई विधानसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विरोधी पक्षनेते असताना त्यांनी स्वतः जन्म नियंत्रणाच्या (कुटुंब नियोजन) संदर्भात एक बिल तयार केले होते. ते बिल इनडिपेंडंट लेबर पार्टीच्या वतीने १० नोव्हेंबर १९३८ रोजी मुंबई विधानसभेत पुढील प्रमाणे सादर करण्यात आले होते – ' This Assembly recommends to Government that in view of the urgent need of limiting the family units, Government should carry on an intensive propaganda in favour of birth-control among the masses of this Province and should provide adequate facilities for the practice of birth-control.' (कुटुंब मर्यादित करण्याची निकडीची गरज लक्षात घेता, या (मुंबई) प्रांतातील जनतेमध्ये संततीनियमनाच्या बाबतीत एक प्रभावी



प्रचार मोहीम सरकारने हातात घ्यावी आणि प्रत्यक्षात जन्मनियंत्रण करण्याच्या दृष्टीने पुरेशा प्रमाणात सोयी पुरवाव्यात, अशी शिफारस विधानसभा शासनाला करीत आहे.)

त्यावेळी त्या बिलास विधानसभेत प्रचंड विरोध झाला होता. शेवटी हे बिल प्रचंड मताने फेटाळण्यात आले होते.

१९५० पासून जागतिक लोकसंख्येत प्रचंड वाढ झाली. भारतातसुद्धा लोकसंख्येत प्रचंड वाढ झाली आहे. जगात सर्वात जास्त लोकसंख्या चीनमध्ये आहे. ४ एप्रिल २०२२ चीनची लोकसंख्या ही १४४ कोटी ९० लाख ५४ हजार ३९ इतकी आहे. तर भारताची लोकसंख्या १४० कोटी ३७ लाख ५४ हजार ३८१ आहे. चीन आणि भारताच्या लोकसंख्येत खूप फरक नाही. भारताच्या दृष्टीने वाढती लोकसंख्या ही एक अतिशय गंभीर समस्या आहे. भारतात अतिलोकसंख्येचा स्फोट कधीही होऊ शकतो.

डॉ. आंबेडकर हे जन्म नियंत्रणाचे पुरस्कर्ते, लोकसंख्येचा स्फोट, भारतीय लोकसंख्येचे स्वरूप, भारतातील उच्च जन्मदर – उच्च जन्मदराची कारणे, देशातील मृत्यूदरातील घट आणि त्याची कारणे, भारतातील वयाशी संबंधित प्रजानन दर, लोकसंख्येची घनता, आणि आर्थिक विकास, आर्युमान आणि साक्षरता दर याविषयी अद्यावत माहितीसह सविस्तर विश्लेषण डॉ. नितीन राऊत यांनी पहिल्या प्रकरणात केले. त्याचप्रमाणे लोकसंख्येच्या संदर्भात कुणी अध्ययन केले, याचा आढावा त्यांनी घेतला आहे.

प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील लोकसंख्येबाबत कोणता दृष्टिकोन होता, याविषयीचे डॉ. राऊत यांनी दुसऱ्या प्रकरणात विवेचन केले. लोकसंख्येच्या संदर्भात विविध सिद्धांत आहेत. त्या सर्व सिद्धांताची माहिती दिली. तसेच लोकसंख्येच्या संदर्भात असलेल्या काही महत्त्वपूर्ण सिद्धांताच्या गुण-दोषाची चर्चा डॉ. नितीन राऊत यांनी केली. त्यामध्ये माल्थसचा सिद्धांत (Malthusian Theory), नवीन माल्थसवादी सिद्धांत (Neo - Malthusian Theory), इष्टतम लोकसंख्येचा सिद्धांत (Theory of Optimum Population) आणि लोकसंख्याशास्त्रीय संक्रमण सिद्धांत (Theory of Demographic Transition ) या काही महत्त्वाच्या सिद्धांताचा समावेश आहे.

**गर्भनिरोधक : जन्मदर नियंत्रणाचा महत्त्वाचा उपाय**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्म नियंत्रणाबाबत असलेल्या विचारांचा परामर्श तिसऱ्या प्रकरणात घेतला आहे. डॉ. आंबेडकर १९१८ पासूनच दारिद्र्य आणि लोकसंख्येचा दबाव यांसारख्या ज्वलंत प्रश्नांच्या संदर्भात विचार करीत होते. डॉ. आंबेडकर यांनी जन्म – नियंत्रणाच्या (कुटुंब नियोजन) संदर्भात तयार केलेले बिल इनडिपेंडंट लेबर पार्टीच्या वतीने आमदार प्रभाकर रोहम यांनी १० नोव्हेंबर १९३८ रोजी मुंबई विधानसभेत सादर केले होते. त्यावेळी विधानसभेत या बिलाच्या विरोधात प्रचंड गदारोळ झाला होता.

त्यावेळी अधिक मुलांना जन्म देणे, हे पाप नाही. कृत्रिम साधनांचा वापर करून मुलांना जन्मास न घालणे हा देवाविरुद्धचा गुन्हा आहे, असे विधानसभेतील लोकांचे मत होते. त्या काळात महात्मा गांधीजींनींसुद्धा स्वनियंत्रणाचा (आत्मसंयम) पुरस्कार केला होता. त्यामुळे जन्मदर कमी करण्यासाठी प्रत्येकाने स्वतः वर संयम ठेवला पाहिजे. म्हणून संयम किंवा स्वनियंत्रण (Self control) हाच त्यावर एकमेव उपाय असल्याचे विधानसभेतील काँग्रेसच्या सर्व आमदारांचे मत होते.

या बिलाला विरोध करताना सत्ताधारी काँग्रेस पक्षाचे आमदार टी.एस. जाधव म्हणाले, की ङ्कङ्कसन्माननीय सदस्याने पाश्चिमात्य विचार आणि पद्धतीची आयात देशात करण्याचा प्रयत्न करावा, ही अतिशय शोकांतिका आहे. स्वनियंत्रण हाच जन्म लोकसंख्या नियंत्रित करण्याचा सर्वात चांगला उप्पाय आहे. हा उपाय महात्मा गांधींजींनी सुचविलेला असल्यामुळे हाच उपाय आपण स्वीकारला पाहिजे.

डॉ. आंबेडकरांच्या मते, जन्मदर नियंत्रणाचा गर्भनिरोधक हा महत्त्वाचा उपाय आहे. त्या संदर्भात त्यांनी पाश्चिमात्य देशांचे उदाहरण दिले. या उदाहरणाद्वारे त्यांनी हे स्पष्ट केले, की सर्व वंश, धर्म आणि स्तरातील लोक गर्भनिरोधकाचा उपयोग करू शकतात. स्वनियंत्रणाद्वारे कुटुंबनियोजन करणे किंवा जननदर नियंत्रित करणे शक्य नाही. असे डॉ. आंबेडकरांचे स्पष्ट मत होते. म्हणून त्यांनी स्वनियंत्रणाच्या उपाय हा योग्य नसल्याचे सांगितले होते.

बिलाच्या बाजूने आमदार दादासाहेब गायकवाड, आमदार जमनादास मेहता, आमदार आर.आर भोळे यांनी आपले विचार मांडलेत. शेवटी ते बिल ११ विरुद्ध ५२ मतांनी फेटाळल्या गेले. हे सर्व ११ आमदार डॉ. आंबेडकरांच्या इनडिपेंडंट लेबर पार्टीचे होते.

**आधुनिक काळात आंबेडकरांच्या लोकसंख्या धोरणाची प्रासंगिकता**

लोकसंख्यावाढीचा आर्थिक आणि सामाजिक विकासावर कसा प्रभाव पडतो, याचे सविस्तर विश्लेषण डॉ. राऊत यांनी चौथ्या प्रकरणात केले आहे. व्यक्तीचे उत्पन्न, भांडवलाची घडण, जमीन स्त्रोत, नैसर्गिक भांडवल, अन्न पुरवठा, ग्राहक, रोजगार, दारिद्र्य आणि तांत्रिक प्रगती यावर लोकसंख्या वाढीचा अतिशय प्रतिकूल प्रभाव पडतो. त्याचप्रमाणे लोकसंख्या वाढीचा दारिद्र्य, जीवनाची गुणवत्ता, नागरीकरण, घरे, बालमृत्यूचा उच्च मृत्युदर, शिक्षण इत्यादी सामाजिक विकासाच्या घटकांवर वाईट प्रभाव पडतो.

१९३८ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकसंख्या नियंत्रित ठेवण्याच्या उपायाच्या बिलास प्रचंड विरोध झाला होता; परंतु १९५० नंतर भारतात लोकसंख्येची समस्या तीव्रतेने जाणवू लागली. अलीकडे तर, लोकसंख्येचा स्फोट होताना दिसून येतो. डॉ. आंबेडकरांनी कुटुंब नियंत्रणाच्या संदर्भात जे उपाय सुचविले होते, त्या उपायास त्यावेळी विरोध झाला होता; परंतु नंतर भारताने लोकसंख्या मर्यादित ठेवण्याच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांच्या लोकसंख्या धोरणाचा पुरस्कार केला. आज मात्र सर्व भारतीय गर्भनिरोधक उपायांचा अवलंब करतात. डॉ. आंबेडकरांच्या कुटुंब नियंत्रणाच्या संदर्भात जो दृष्टिकोन आहे, तो आजच्या आधुनिक काळातदेखील महत्त्वपूर्ण आणि प्रासंगिक आहे. हे डॉ. नितीन राऊत यांनी आपल्या या शोध ग्रंथातून सिद्ध केले आहे. •••

# अखिल भारतीय काँग्रेस कोमात जात आहे काय?

एकेकाळी बलाढ्य असलेल्या काँग्रेसला उत्तर प्रदेशच्या निवडणुकीत केवळ दोन जागा मिळाल्या. पंजाब तिच्या हातातून गेले. गोव्यातही फार मोठी मजल मारता आली नाही. याउलट भाजपाचे. भाजपाने सर्व पाचही राज्यांत मुसंडी मारली आणि पंजाब वगळता इतरत्र आपली सरकारे स्थापन केली. हे जरी खरे असले तरी भारतातल्या निम्म्या राज्यांत भाजपाला पायरोव करता आलेला नाही आणि पुढेही करता येईल की नाही, याबाबत शंकाच आहे. काँग्रेसचे प्रचंड खच्चीकरण झाले. जणू काही ती कोमात गेल्यासारखी आहे. १३७ वर्षे वय असलेल्या काँग्रेसची अशी अवस्था का झाली, याचा विचार केवळ काँग्रेसमध्येच नव्हे, तर जगभर चालू आहे. जगभर एवढ्यासाठीच, की काँग्रेस हा जगातला एक जुना पक्ष आहे.

मुंबईत ७२ जणांच्या उपस्थितीत १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. ती स्थापन करण्यात भारतीय नेत्यांचा पुढाकार नव्हता, तर ब्रिटिश राजवटीतील एक निवृत्त अधिकारी म्हणजे आय.सी.एस. अधिकारी ऑक्टेव्हिन व्ह्यूम यांचा पुढाकार होता. प्रारंभापासून ते भारतातील स्वातंत्र्य चळवळीचे सहानुभूतीदार होते. यासाठी त्यांनी इंग्रजांचा रोषही ओढवून घेतला होता. भारतातील शिकलेल्या तरुणांचा इंग्रजी सत्तेशी नागरी सेवेतील नोकऱ्या आणि राजकारणाविषयी संवाद सुरू व्हावा यासाठी काँग्रेसची स्थापना होती. १८५७ च्या उठावानंतर ही गोष्ट तशी आवश्यक झाली होती. सुरुवातीला 'इंडियन नॅशनल युनियन' असे काही तरी नाव घोळत होते. शेवटी २८ डिसेंबरला अखिल भारतीय काँग्रेसची स्थापना झाली. काँग्रेसचा अर्थ महासत्ता. व्ह्यूम यांच्या जोडीला आणखी दोन ब्रिटिश अधिकारी सदस्य होते. विल्यम वेडरबर्न आणि जस्टीस जॉन जार्डाइन, अशी त्यांची नावे होत. याशिवाय इतर महत्त्वाच्या सभासदांमध्ये दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, बद्रुद्दीन तय्यबजी, फिरोजशहा मेहता, एस. रामस्वामी मुदलियार, एस. सुब्रमणिया अय्यर व रोमेश चंदर दत्त आदींचा समावेश होता. सुरुवातीला काँग्रेसचा अध्यक्ष दरवर्षी बदलला जायचा. काँग्रेसच्या मागणीत राजकीय स्वातंत्र्य हा विषय खूप उशिरा आला. तोपर्यंत नागरी हक्क, प्रशासनात नोकऱ्या, घटनेत बदल, अर्थकारण या विषयांवरच मागण्या होत असत. काँग्रेसच्या अध्यक्षांच्या मांदियाळीतही इंग्रज अध्यक्ष होते. जॉर्ज यूल, विल्यम वेडरबर्न, आल्फ्रेड वेब, हेन्री जॉन, ॲनी बेझंट वगैरे होतेच. पहिले अध्यक्ष बॅनर्जी होते. नवाब सय्यद महम्मद (१९१३), सय्यद हसन इम्रान (१९१८), हकीम अजमल खान (१९२१), महम्मद अली जौहार (१९२३), अबुल कलाम आझाद (१९२३), मुख्तार अहम्मद अन्सारी (१९२७), अबुल कलाम आझाद (१९४०-४६) आदी मुस्लिम नेते अध्यक्ष होते. ब्राह्मण, पारशी, मुस्लिम, दलित वगैरे वेगवेगळ्या जाती-धर्मांतील नेत्यांनी अध्यक्षपद भूषवले आहे. महात्मा गांधींनीही १९२४ मध्ये हे पद भूषवले; पण एक वर्षासाठीच. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९२९, ३०, ३६, ३८, ५१, ५२, ५३, ५४ म्हणजे आठ वर्षे. इंदिरा गांधी १९५९, १९७८ ते १९८३ आणि १९८४ मध्ये हत्या होईपर्यंत म्हणजे सात-आठ वर्षे. राजीव गांधी यांनी १९८५ ते १९९१ सहा वर्षे, सोनिया गांधी यांनी १९९८ ते आजतागायत म्हणजे २४ वर्षे अध्यक्षपद भूषवले. गांधी कुटुंबातील चौघांचे मिळून ४६ वर्षे काँग्रेसचे अध्यक्षपद नेहरू-गांधी कुटुंबीयांकडे आहे. मोतीलाल नेहरू यांचे एक वर्ष मिसळले, की वर्षे होतात ४७. नेहरू, इंदिरा आणि राजीव यांच्याकडे पंतप्रधानपद आणि अध्यक्षपद होते, तर सोनिया गांधी यांच्याकडे फक्त अध्यक्षपद आहे. राजीव यांच्या निधनानंतर जवळपास राजकीय संन्यास जाहीर करणाऱ्या सोनियांची पाच-सहा वर्षे काँग्रेसने मनधरणी केली आणि त्यांना अध्यक्षपद घ्यायला भाग पाडले. त्यासाठी अगदी आंदोलनही केले. राजीव गांधी ते सोनिया गांधी यांच्यादरम्यान नरसिंह राव, सीताराम केसरी यांनी अध्यक्षपद सांभाळले होते. काँग्रेसचे वय १३७ वर्षांचे आणि त्यातील ४६ वर्षे अध्यक्षपद नेहरू-गांधी घराण्याकडे म्हणजे ९१ वर्षे ते इतरांकडे होते; पण या एका दीर्घ म्हणजे ४६ वर्षांच्या कालावधीमुळे घराणेशाही असा राजकीय शब्दप्रयोग तयार झाला आणि तो नेहरू-गांधी घराण्याला चिकटला.

काँग्रेसचा स्वातंत्र्यानंतरचा प्रवास काही वर्षे जोरदार चालला. जी काँग्रेस एका वेगळ्या उद्दिष्टासाठी स्थापन झाली होती तिचे राजकीय चळवळीत रूपांतर झाले आणि या चळवळीने एकापेक्षा एक असे सामर्थ्यवान नेते देशाला दिले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेसचे प्रयोजन उरले नाही. ती स्वातंत्र्य चळवळीसाठीच होती. आता ती बरखास्त करावी, असे महात्मा गांधींना वाटत होते. अर्थात, हा त्यांच्या विधानाचा अर्धा भाग. उत्तरार्ध असा होता, की स्वातंत्र्यानंतर वेगळ्या पक्षाची गरज त्यांना वाटत होती; पण हेही खरेच होते, की बासष्ठ वर्षांच्या अतिशय संघर्षशील आणि देशव्यापी कार्यामुळे आणि महात्मा गांधींच्याही प्रभावामुळे काँग्रेस म्हणजे इथल्या सामान्य माणसाचे जीन्स किंवा डीएनएचा भाग बनली होती. सगळे जाती-धर्म, शेठजी, भटजी, अल्पसंख्याक, दलित व स्त्रियांना एकत्रित घेऊन जाणारा पक्ष म्हणजे काँग्रेस बनली होती. सर्व घटक काँग्रेसमध्ये होते, हे खरेच होते; पण या घटकांचा आतल्या आत टकरावही होऊ लागला. सत्ता, विकास, विचारधारा ही कारणे होती. मुस्लिम कधीच बाहेर पडले. हिंदुत्ववादी बाहेर पडले, शेतकरी-कामगारांना डाव्यांनी आत्मसात केले. डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली दलित एकवटला. शेतकऱ्यांच्या स्वतंत्र संघटना उभ्या राहिल्या. प्रांतवाद, भाषावाद यातूनही अनेक गट तयार झाले. ते स्वतंत्रपणे पक्ष म्हणून उदयाला आले. उत्तर भारत, दक्षिण भारत, असेही राजकारण होते. या सर्व विविध घटकांची वीण जी काँग्रेसने तयार केली होती, म. गांधींनी टिकवून ठेवली होती, ती सैल झाली. काँग्रेसच्या नावावर रस्त्यावरचा बैल किंवा टेलिफोनचा खांबही निवडून येतो, ही भाषा मागे पडली. काँग्रेसला एकाच वेळी आतून आणि

बाहेरून धडका बसत होत्या. आव्हाने तयार होत होती. खरे तर धक्का बसण्याची प्रक्रिया स्वातंत्र्याच्या अगोदर २५-२७ वर्षांपासूनच सुरू होती. १९२३ ला डाव्या पक्षांचे आगमन झाले. काँग्रेसमधून एक मोठा गट बाहेर पडून डावा झाला. १९१८ मध्ये काँग्रेसचे अध्यक्ष असलेल्या मोतीलाल नेहरू आणि १९२२ मध्ये अध्यक्ष झालेल्या चित्तरंजन दास यांनी १९२३ मध्ये काँग्रेसबाहेर स्वराज्य पार्टीची स्थापना केली; पण तिचे लवकरच मुख्य काँग्रेसमध्ये विलीनीकरण झाले.

काँग्रेसमध्ये खऱ्या अर्थाने १९२३ ला सुरू झालेली पडझड आजपर्यंत चालू आहे. महाकाय मानल्या जाणाऱ्या पक्षात सर्वच पक्षांचे हितसंबंध एकाच वेळी साध्य करता येत नाहीत, ही मुख्य अडचण झाली. काहीही करून सत्तेला चिकटून बसलेला एक घटक होता आणि आहे, तर पंगतीत बसूनही थाळीत काही पडले नाही म्हणून बंड करणारे अनेक घटक होते. त्यातील काही जण बाहेर पडले. आजही पडताहेत. या घटकांना बाहेर उदयाला आलेले अनेक पक्ष आश्रय देत होते. जणू काही ते वाटच बघत होते. त्यांच्या राजकारणाचा तो एक भाग होता. त्याला गैर मानण्याचे काही कारण नाही. जात, वर्ग, धर्म यावर आपली व्यवस्था उभी आहे आणि तिन्हींचे समाधान करू शकेल, असे सध्या तरी कोणी नाही, तर ही आवक-जावक काँग्रेसमध्ये आजपर्यंत चालू आहे आणि नोंद घ्यावी, अशी सत्तर वेळा फूट पडली आहे. म्हणजे शंभर वर्षांत सत्तर वेळा फूट पडली आहे. सुरुवातीला तिचा वेग कमी होता आणि आता तो वाढला आहे. तोपर्यंत नेहरू-गांधी घराण्यातील पाचवी पिढी आली आहे आणि नव्या पिढीने या पिढीला राजकारणात सर्वांत अधिक दुर्बल नेते कसे ठरवले, हे निवडणूक निकालाने सांगितले आहे.

शार्दूल सिंग आणि सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमधून बाहेर पडलेल्यांचा ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक तयार झाला (१९३९). बोसही काँग्रेसचे अध्यक्ष होते. कृपलानी यांच्या नेतृत्वाखाली किसान मजदूर प्रजा पार्टी पुढे हैदराबाद प्रजा पार्टी, सौराष्ट्र खेडूत संघ, स्वतंत्र पार्टी, केरळ काँग्रेस, ओरिया जन काँग्रेस, बांगला काँग्रेस, भारतीय क्रांती, मणिपूर पीपल्स, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (इंदिरा गांधी), कामराज काँग्रेस, उत्कल काँग्रेस, इंडियन नॅशनल काँग्रेस, देवराज काँग्रेस, अँन्टोनी काँग्रेस, शरद पवार काँग्रेस, जगजीवन राम काँग्रेस, शिवाजी गणेशन पक्ष, राष्ट्रीय समाजवादी काँग्रेस (प्रणव मुखर्जी), बंगाला काँग्रेस, जी.के. मुपनार, ममता बॅनर्जी, माधवराव शिंदे, पी. चिदंबरम, मुफ्ती महम्मद, अशी सत्तरहून अधिक नावे देता येतील. म्हणजे काँग्रेस ज्यावेळी सशक्त होती, देशभर सत्ता होती तेव्हापासूनच पडझडीच्या इतिहासालाही सुरुवात होते. बाहेर पडलेले अनेक जण पुन्हा काँग्रेसमध्ये गेले, पुन्हा बाहेर आले. पुन्हा आत, पुन्हा बाहेर, असे अनेकांच्या बाबतीत घडले. काँग्रेस जर मोठे झाड असेल, तर त्याखाली दुसरे झाड मोठे होत नाही. ज्यांना मोठे व्हायचे होते ते बाहेर पडले. थोडेफार मोठे झाले. पुढे स्वतंत्रपणे काँग्रेसशी तडजोडी करू लागले. शरद पवार त्यापैकी एक. आतच राहून नेतृत्वाला धक्के देणारे आझाद आणि त्यांचे बावीस त्यापैकी एक. चिदंबरम त्यापैकी एक. नंतर काँग्रेसमध्ये गेलेले ग्वाल्हेरचे घराणे त्यापैकी एक.

काँग्रेसला आतून धक्के, बाहेरून धक्के, सशक्त बनलेल्या विरोधकांकडून धक्के आणि बरीच वर्षे टिकवून ठेवलेल्या मतपेट्यांनाही धक्के, अशा अवस्थेत काँग्रेस पोहोचली. हे सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यामुळेच झाले, असे म्हणता येणार नाही. ते होणार होते. मोतीलाल, जवाहरलाल, इंदिरा, राजीव यांच्यावेळीही तसे घडले आहे. समाजाच्या राजकीय जाणिवा जेव्हा मोठ्या प्रमाणात जाग्या होतात, सत्तेचे महत्त्व मोठ्या प्रमाणात कळू लागते, उपेक्षित-दुर्बल घटक जेव्हा जागे होतात तेव्हा ते आपला आपला वाटा मागू लागतात. नाही मिळाला तर बंड करतात. बाहेर आपल्या शत्रूला मित्र बनवतात आणि वाटा मिळवण्यात यशस्वी होतात. सत्तेच्या मार्गावर नैतिक, अनैतिक असे काही नसते. त्यातूनच रामदास आठवले भाजपाबरोबर जातात. मायावती भाजपाच्या मदतीने सत्ता बळकावतात. भाजपा काश्मीरमध्ये मुस्लिम पक्षाच्या मदतीने सत्तेत जातो. कम्युनिस्ट काँग्रेसच्या मदतीला जातात. अरुण गवळीलाही आपल्या पक्षाबरोबर स्थान देणारे कोणी तरी असते. शिवसेना काँग्रेसच्या आश्रयाला जाते, नरेंद्र जाधव भाजपामध्ये जातात, कन्हैया कुमार काँग्रेसमध्ये येतो. अशा कितीतरी जोड्या एरव्ही विचार आणि तात्त्विक पातळीवर अनैतिक वाटाव्यात त्या गळ्यात गळा घालून उभ्या असताना आपण पाहत आहोत.

स्वातंत्र्यानंतर बरीच वर्षे अनेक समुदायांना राजकारणाचे आणि त्यातील सत्तेचे महत्त्व कळत नव्हते. लोकशाहीत स्वतःचा आणि समूहाच्या विकासाचा एक मार्ग सत्तेतून जातो, हेही अनेकांना कळू लागले. संसदबाह्य राजकारण कमी होऊ लागले. काँग्रेसही त्यातून कमी झाली. ज्या काँग्रेसने अनेकदा संसदबाह्य राजकारण करणाऱ्यांना आपलेसे केले होते, तीही त्यापासून दूर झाली होती. डाव्यांनी मार्क्सवादाच्या नावाखाली आणि काँग्रेसने आपल्या बेगडी धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली 'धर्म' या घटकाकडे पार दुर्लक्ष केले होते. आपल्याकडचा माणूस एकाच वेळी लोकशाहीवादी आणि धर्मावादीही असतो, याचाही बोध नीट घेतला नाही. दरम्यानच्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने राजकारणाबाहेर राहून स्वतः आणि भाजपा तयार करून राजकारणात धर्मवादासाठी, राष्ट्रवादासाठी जागा तयार करायला सुरुवात केली. रामाचा विषय भाजपाला सत्तेत नेईल, हे कुणाच्या कल्पनेतही आले नसावे; पण घडले मात्र तसेच. धाकदपटशाच्या जोरावर का होईना; पण मुस्लिम समाज उजव्यांकडे वळेल हेही कोणाच्या लक्षात आले नसावे. परिणाम असा झाला, की काँग्रेसचा हुकमी मतदार कमी होत गेला; पण तो परत मिळवण्यासाठी, त्याला गच्च करण्यासाठी काँग्रेसकडे काही कार्यक्रम नव्हता. काँग्रेस म्हणजे घराणेशाही असे कोलीत वापरायला, म. गांधींची रोज चिरफाड करायला विरोधकांना संधी मिळाली. काँग्रेसने राजकारणात, विकासकार्यात म. गांधी कधीच चालवला नाही. उजव्यांनी तो 'हेट स्टोरी' म्हणून चालवला आणि त्याला प्रतिकार करण्यासाठी काँग्रेसकडे काही राहिले नव्हते. दलितांवरील वाढत्या अत्याचाराला ती प्रतिबंध करू शकत नव्हती. त्यासाठी तिच्याकडे कार्यक्रम नव्हता.

आता प्रश्न राहिला घराणेशाहीचा. जे नेते आणि पक्ष एकाधिकारशहा आहेत किंवा त्याकडे निघाले आहेत, ते घराणेशाहीचा आरोप करतात. म्हणजे कोणी कोणाच्या घरावर दगड फेकावा याचे भान कोणाला नाही. राजकारणाने ते खाऊन टाकले आहे. काँग्रेस वगळता अन्य पक्षांत किंवा घराणेशाहीचा आरोप करणारेही घराणेशाहीत कसे गुंतले आहेत, हे कोणी विचारत नाही. दक्षिणेकडच्या अनेक नेत्यांची घराणेशाही

कधीपासून आहे. त्यात एनटीआर आले, एमजीआर आले, करुणानिधी आले, शरद पवार आले, फारुक अब्दुल्ला आले, मुलायम सिंग आले, लालूप्रसाद यादव आले, गोपीनाथ मुंडे आले, ठाकरे आले, जयपूर, ग्वाल्हेरची घराणी आली. अजून किती उदाहरणे सांगायची? पण हे सगळे आता काँग्रेसच्या घराणेशाहीवर तोंडसुख घेत असतात. भाजपामध्ये एकाधिकारशहा बनलेल्या किती तरी जणांची नावे सांगता येतील. अगदी संघाचेच उदाहरण घ्या. एक सरसंघचालक जाईपर्यंत दुसरा येत नाही. वाजपेयी, अडवाणी, मोदी, सुषमा, गडकरी असे कितीतरी नेते आहेत, की जे चाळीस वर्षांहून अधिक काळ राजकारणात खुर्च्यांवर आहेत. तसे ते डाव्यातही आहेत. एकाधिकारशाही आणि घराणेशाहीत तसा फरक काय? सत्ता एकाच कुटुंबात राहिली काय आणि एकाच व्यक्तीच्या हातात राहिली काय, शेवटी तिचे केंद्रीकरणच होते. गंमत म्हणजे, इथल्या लोकांनी हे स्वीकारले आहे. तेच एकाधिकारशाही तयार करतात आणि घराणेशाहीही. आम्ही एकाच नेत्याला दहा वेळा निवडून देतो, असे सांगत टिऱ्या बडवणारे लोकच असतात. त्यांना जोपर्यंत एकाधिकारशाही आणि घराणेशाहीतून म्हणजे त्या मानसिकतेतून मुक्त करणार नाही, तोपर्यंत हे असेच चालणार. अजूनही जुन्या राजवाड्याला नमस्कार करणारे मतदार आहेत. नव्या नेत्याला राजात पाहणारे लोक आहेत आणि राजाच्या वारसांनाही राजातच पाहणारे लोक आहेत. एकाधिकारशहांनी घराणेशाहीची बात कशाला करायची?

काँग्रेसकडे म्हणजे आजच्या काँग्रेसकडे काँग्रेसचा इतिहास आहे. नेहरू-गांधींचा इतिहास आहे, संचित आहे; पण हेही खरे, की इतिहासातल्या घोषणा ऐकून कोणाला वर्तमान घडवता येत नाही. संचित सांगून कुणाला वाटचाल करता येत नाही. राजीव गांधींनी नव्या जगाचा वेध घेत संगणकीकरणाला प्रारंभ केला होता. नवा मतदार घडवला होता. नव्या जगात लाखो तरुण बेरोजगार बनले होते. त्यांच्यासाठी काँग्रेसकडे अजेंडा नव्हता तर भाजपा त्यांना धर्मवादाच्या वाटेवर नेत होता. गेल्या काही वर्षांत दारिद्र्यरेषा वाढत होती आणि विशिष्ट लोकांची संपत्तीही वाढत होती. खाजगीकरणाला रोखण्यासाठी इंदिरा गांधींनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले होते, आता खाजगीकरण सुरू आहे. या दोन्हींमध्ये जी पोकळी तयार झाली होती तिचा काँग्रेसने विचार केला नाही. भाजपाच्या धर्मवादाला, देववादाला उत्तर कसे द्यायचे, हे भल्याभल्यांना कळत नव्हते. अनेकांप्रमाणे काँग्रेसनेही मंदिरात जाऊन उत्तर देण्याचा प्रयत्न केला. जय श्रीरामला उत्तर जय श्रीरामच आहे, की दुसरे कोणते याचाही काँग्रेसने विचार केला नाही. स्वतःभोवती मोठ्या निष्ठेने आणि दीर्घकाळ असलेला दलित, मुस्लिम, शेतकरी का गोंधळला याचाही काँग्रेसने विचार केला नाही. अशा अनेक गोष्टी आहेत, की ज्या तत्त्वज्ञानापासून ते प्रतीकांपर्यंत सांगता येतील. हिंदुत्ववाद्यांनी गांधी खोडण्यासाठी तो तोंडपाठ केला; पण काँग्रेसच्या कोणत्या कार्यकर्त्याला म. गांधींवर दहा वाक्ये बोलता येतात? आपला पंजाबमध्ये आंबेडकर कळतात, काँग्रेसने कोणता प्रयत्न केला. हे अनेक प्रश्न आहेत त्यांनी काँग्रेसकडे उत्तरे मागितली. कधी बंड करून, तर कधी निष्क्रिय होऊन. काँग्रेसने उत्तरे शोधली नाहीत. ती कोमात गेली आणि पराभवाची धनी झाली. इतक्या महान नेत्यांच्या त्यागातून उभी राहिलेली आणि 'वैष्णव जन तोने कहिए' या प्रार्थनेचा धनी असलेली काँग्रेस कोमात गेली.

कोमात जाणे याचा अर्थ संपणे असाच घेता येईल, असे नाही. ती एक दुर्मिळ अवस्था असते आणि प्रयत्नपूर्वक त्यातून बाहेर पडताही येते. काँग्रेस केवळ एक पक्ष नाही, तर एक परंपरा आहे. एक सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक प्रक्रिया आहे. प्रक्रियांमध्ये बरेवाईट बदल येत असतात. ते समजून न घेता पदाधिकाऱ्यांचे राजीनामे मागणे आणि जहाजात बिघाड झाला म्हणून बाहेर उड्या मारणे, हे योग्य नाही. आज जी-२३ या कथित गटाचे लोक जे करताहेत ते गैरच आहे. या गटाची गांभीर्याने दखल घ्यावी, असे काही नाही, तर ते सत्ता शोधनासाठी तयार झालेले असतात. प्रत्येक पक्षात हे असे असते. कालपर्यंत गांधी घराण्याच्या किचन कॅबिनेटमध्ये धुणी-भांडी करण्यात धन्यता मानणारे आज अचानक आत्मसन्मानाची, सन्मानाची भाषा बोलायला लागतात, हे जरा चमत्कारीच आहे. काँग्रेसचा अध्यक्ष होण्याची कुणाकडे किती ताकद आहे, हे पूर्वाश्रमीच्या झिलकऱ्यांनी थोडे उघडपणे सांगितलेले बरे. प्रश्न असा आहे, की कोमात जाणे ही काही एखाद्या पक्षाबाबत कायमची अवस्था नसते. काही झाले तरी मोदींना आज सर्वांत अधिक धोका वाटतो तो काँग्रेसचाच. एक वेळ ते स्वतःचे नाव विसरतील; पण काँग्रेसचे नाही. रात्रंदिवस, प्रत्येक क्षण मोदींना काँग्रेसनेच का पछाडल्यासारखे वाटते. कोणी नसले तरी काँग्रेसनेच याचा विचार करायला हवा. लोकांना विशिष्ट मानसिक अवस्थेत ठेवणे, हे हिटलरलाही शक्य झालेले नाही. कोणत्या पक्षालाही शक्य झालेले नाही. भ्रम आणि वास्तव यातील फरक कधी ना कधी स्पष्ट होत असतो. चेहऱ्यावरचे बुरखे चेहरा नसतात, ते हलत असतात. २०२४ पर्यंत वाऱ्याचे प्रचंड झोत येणार आहेत. ते बुरखेही हलवणार आहेत आणि कोमाही संपवणार आहेत.

माणूस कोणत्याही स्थितीत कायम राहत नसतो. हे भारतात अनेकदा सिद्ध झाले आहे. आम्हीच पन्नास वर्षे राहणार हे सांगणारे एका अर्थाने लोकशाहीला संकोचीत करत आहेत. काँग्रेसने लोकशाही टिकवण्यासाठीही किंमत चुकवलेली आहे. आज जे धर्मा-कर्माच्या नावाने उदय पावत आहेत, विकास पावत आहेत ते काँग्रेसच्या उदार धोरणाचाच परिणाम आहेत, हेही विसरून चालणार नाही. काँग्रेसने साठ वर्षांत काय केले, असा प्रश्न विचारून काँग्रेसला नाकारता येत नाही. काँग्रेस इतर पक्षांसारखे केवळ एक संघटन नाही, तर लोकेच्छेतून विकास पावलेला तो एक पक्ष आहे. काळाच्या ओघात त्याने वेगवेगळ्या भूमिका केल्या आहेत. इंग्रजांशी संवाद-संघर्ष करणारा, भारतीयांसमोर स्वातंत्र्याची स्वप्ने ठेवणारा, त्यासाठी जनतेला लढायला शिकवणारा आणि शेवटी आम्ही भारतीय लोक म्हणत लोकांच्याच हातात सारे काही ठेवणारा आहे. याचा अर्थ असा नव्हे, की काँग्रेस धुतल्या तांदळासारखी स्वच्छ राहिलेली आहे. सत्ताकारणात तिच्यावरही डाग पडले आहेत. ते धुऊन काढण्याची जबाबदारी आहे. भाजपाशी टक्कर द्यायची असेल, तर भाजपाच बनले पाहिजे, या अट्टहासातून दूर राहिले पाहिजे आणि भाजपाचा पराभव काँग्रेस करू शकते, अशी हाक दिली पाहिजे. या हाकेचे ध्वनी-प्रतिध्वनी, कंप, निर्धार कोमाला दूर करतील, याची खात्रीही काँग्रेसनेच बाळगली पाहिजे.

•••

**– पंक्चरवाला**

## कविता

# नुसताच बोलघेवडेपणा

नुसताच बोलघेवडेपणा
होतो आहे
केवळ तेच ते लिहिले जाताहेत
स्तुतीपाठ

वर्षानुवर्षे
बोलले जाते आहे
तेच ते करून
ठेवलेले पाठ

जेवढे सरकलो होतो पुढे त्याहून कितीतरी
मागे रेटलो गेलो, देईल त्याचे बोट धरून
चढत गेलो

उजवे, डावे, मधले, तिरपे
देईल त्याच्याकडेच
पाऊल

आपसूकच सरके
ना झालो व्हायचे होते ते
ना टिकून राहिलो,
उकळते होते पाणी
तेच थंडगार झालेले पीत राहिलो

घोटभर पाण्यासाठी
पुनः तीच वणवण
पुनः झरे खोदण्यासाठी
खोदणाऱ्यांचीच चणचण

तरी कोरड्या विहीरीतून
कोरडी बेडके गातच आहेत
दिलेल्या जागेत नेमून दिलेले गाणे, गातच
आहेत

त्यांचा आवाजही फक्त
त्यांनाच ऐकू येतो, त्यांच्यातला असा
संपला एक एक की कोणीही त्यांना उचलून
नेतो
विच्छेदनासाठी ते
कामी येतात
त्यावर शिकलेले पुढे
सर्जन होतात

अशी आपली
समूहकथा
अशी आपली
समूहगाथा

कोणीच ऐकत नसते आजकाल
असल्या कथा
असल्या व्यथा

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**

# शेवटचा माणूस

शेवटचा माणूस जो अजूनही तरसतो
आहे
दोन घासासाठी
शेवटचा माणूस जो भटकतोय
अजूनही
रानोमाळ
शेवटचा माणूस ज्याला अजूनही
मिळालेला
नाही घर नावाचा ठिकाणा
शेवटचा माणूस ज्याला कवडीची
सुद्धा किंमत
नाही तुमच्या लेखी
शेवटचा माणूस ज्याची नोंदच नाही
सरकार दरबारी
शेवटचा माणूस ज्याला सोडलंय
तुम्ही चक्क वाऱ्यावर
शेवटचा माणूस जो आजच्या
डिजिटल युगातही
फिरतोय फक्त लंगोटीवर

अशा परिस्थितीत
आता नेमकं
काय करावं माझ्या कवितेनं?
या शेवटच्या माणसाची व्यथा मांडावी
जगासमोर की
तिकडे चक्क काना डोळा करून
निर्लज्जपणे ढोल बडवीत गात सुटावीत
धनदांडग्याची गोड गोड गाणी ताला
सुरात तोंडाला फेस येईपर्यंत?
एकवेळ
मी गायलीही असती गाणी
पण
सामान्य माणसाच्या बाजूने
उभी असणारी माझी कविता
मला या शेवटच्या माणसाशी बेईमानी
कशी करू देईल?

**– डी के शेख**

# तुकारामा

बुडालेल्या गाथा वॉटरप्रुफ असतील काय?
गाथेखाली लाकूड बांधलं होतं काय?
असे प्रश्न विचारणारणारांना
जिभेवर उमटलेली शब्दांची पावले दाखवली
जिभेवर उमटलेली अभंगमाळ
काळजाच्या टाळाला घट्ट मिठी मारून बसलीय

विठ्ठलाच्या कीर्तनात मनातला गोंधळ थांबला नाही
तेव्हा मी फडफडत्या शिरेवर चंदन टिळा लावून शांत झालो
काळा बुक्का सांडलेल्या पाण्यात रक्त दिसत नाही
याचं काय करावं?
याचं उत्तर फुललं नाही अजून...
भयाण रात्रीची पहाट रेंगाळतच आहे

पिंडीवरचा विंचू मारल्यावर
त्यांना मी तुझा संदर्भ दिला
तेव्हा ते कुजबुजले
संदर्भ पोकळ करायला पाहिजे होते
अघोषित बहिष्कार टाकला शेवटी त्यांनी तुझ्या-माझ्यावर

**– देविदास सौदागर**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2020-22
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

With Best Compliments





Sos. Agrotech Pvt.Ltd

